
# युरोसफर

लक्ष्मण लोंढे



REFBK-0029507

*प्रिय अवधूत परळकर,*
*आपला परिचय झाला*
*त्याला सहज वीस वर्षं होऊन गेली*
*हे खरं वाटतंय का तुला?*

*-लक्ष्मण*



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भ्र-प्रवास/२९
ग्रा. क्र. २२५७७
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# युरोपला निघताना...

विमान प्रवासात मला नेहमीच त्रास देणारी आणि टेन्शन आणणारी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे सामानाचं वजन. या बाबतीत आपली झुकु झुकु रेलगाडी किंवा एस.टी. या बऱ्या. प्रवासी सामानाबरोबर प्रवास करत असेल तर त्या त्याचं कितीही सामान बिनतक्रार वाहून न्यायला तयार असतात. विमान, मग ते देशांतर्गत प्रवासाचं असो वा परदेश प्रवासाचं, प्रवाशाबरोबर त्याच्या तिकिटाच्या भाड्यात विमानात फक्त वीसच किलो वजनाचं सामान घेऊन जाता येतं. त्याहून जास्त वजन घेऊन जायचं असेल तर भारी भाडं द्यावं लागतं. काय होतं, बरेच वेळा प्रवासात माझ्याबरोबर जाताना निरनिराळ्या ठिकाणच्या मित्रांना भेट म्हणून द्यायच्या माझ्या पुस्तकांच्या प्रती आणि येताना विविध ठिकाणी विकत घेतलेल्या पुस्तकांच्या प्रती याचंच भारी वजन असतं. वेळोवेळी रद्दीत पुस्तकांची, वृत्तपत्रांची रद्दीवाल्याने केलेली 'किंमत' पाहून दुखावलेलं माझं हळवं मन विमान प्रवासात विमान कंपन्यांनी केलेली माझ्या साहित्याची किंमत पाहून सुखावतं आणि माझ्या साहित्याची ही किंमत माझी मलाच भरायची असल्यामुळे कष्टीही होतं.

घरातून निघताना माझ्या दोन बॅगा झाल्या. त्यातली मोठी सामान म्हणून विमान कंपनीच्या ताब्यात द्यायची आणि दुसरी छोटी, हलकीशी होती ती मी बरोबर ठेवायची असं ठरवलं. विमान प्रवासात प्रवाशाला त्याच्या सामानातली एक वस्तू स्वत:बरोबर ठेवता येते आणि तिचा स्वतंत्र आकार द्यावा लागत नाही. शिवाय माझ्या या बॅगेतच मी तिकीट, पासपोर्ट आदी महत्त्वाचे कागदपत्रही ठेवले होते.

प्रश्न होता बरोबर असलेल्या दुसऱ्या, विमान कंपनीच्या ताब्यात द्यायच्या बॅगेच्या वजनाच्या अंदाजाचा. आणि याबाबतीत प्रत्येकाचं मत निरनिराळं होतं.

''चिंताच करू नका. मी सांगतो ना. ही तुमची बॅग वीस किलोसुद्धा भरणार नाही,'' एक ठाशीव मत.

''मला वाटतं वीस किलोच व्हावी,'' समीक्षकांसारखं विध्यर्थी मत.

''वीस किलोपेक्षा दोन-चार किलो जास्त भरेल कदाचित,'' एक सावध मत. ''- पण त्याची चिंता करू नका हो. दोन-चार किलो इकडे तिकडे झाले ना तर ते लोक नाही चार्ज लावत.'' ही मूळ सावधानतेला ज्ञानीपणाचा आव आणून दिलेली फोडणी.

''घरात काटा आहे का? तुम्हाला सांगतो, तुम्ही आपलं वजन करून बघा. पूर्वीच्या काळी प्रवासी एकमेकांना मदत करत. ज्या प्रवाशाकडे वजन कमी असे तो जास्त वजन असलेल्या प्रवाशाच्या वजनातली एखादी बॅग आपल्या तिकिटावर नोंदवत असे. पण आजकाल ते बॉम्बस्फोट झाल्यापासून कोणी दुसऱ्याचं वजन स्वत:च्या नावावर नोंदवायला तयार नसतो.''

''हो, वजन करा आणि नेमके त्या वजनासाठी लागतील तेवढेच रुपये बरोबर ठेवा. उगीच जरुरीपेक्षा जास्त रुपये बाळगण्यात काय हशील आहे! आपल्या रुपयांना तिकडे परदेशात कुत्रंसुद्धा विचारत नाही.'' एकदाही परदेशात न गेलेले पण उगीचच आपल्या देशाविषयी कायम हेटाळणीच्या स्वरात बोलणारे काही सज्जन असतात त्यापैकी एक.

शेवटी घड्याळाच्या काट्याकडे बघत बघत वजनाच्या काट्याची शोधाशोध सुरू झाली. काही वेळेच्या संशोधनानंतर तो सापडला सुद्धा... पण नादुरुस्त अवस्थेत!

अखेर बॅगेच्या वजनाचं गूढ कायम असलेल्या अवस्थेतच अस्मादिकांची स्वारी एअरपोर्टवर आली. चेक-इन करून बोर्डिंग पास देताना बाईने खंडणी मागितली नाही तेव्हा तिकडे माझं वजन फिरत्या पट्ट्यावर चढलं आणि इकडे माझा जीव भांड्यात पडला.

चेक-इन नंतर कस्टम्स आणि इमिग्रेशन या दोन्ही मांडवांखालून जायचा सोहळा तुलनेने पटकन पार पडला आणि मी लुफ्थांझाच्या वेटिंग लाऊंजमध्ये येऊन तिथल्या कोचावर बसलो. आता करायचं काहीच नव्हतं. विमानात बसण्यापूर्वीचे सगळे सोपस्कार पूर्ण झाले होते. बोहल्यावर चढायची नवरदेव वाट पाहत असतो तशी ही अवस्था असते. करायला काहीच शिल्लक नसतं. नुसती वाट पहायची असते. नवरदेवासारखंच आपण विमानात जाऊन बसायला उत्सुक असतो आणि मुहूर्ताची वेळ विमानकंपनीचे कर्मचारी ठरवत असतात.

''रिकामं मन - सैतानाचं ठाणं'' अशी एक म्हण आहे. कोचावर आडवारल्या आडवारल्या माझ्या मनात चमत्कारिक विचार येऊ लागले. मघा सामान चेक-इन केल्यानंतर फ्लाईटला तसा बराच वेळ असल्यामुळे मी पुन्हा बाहेर येऊन घरचे लोक कुठे दिसतात का हे पाहण्याचा प्रयत्न केला होता पण तोपर्यंत घरची मंडळी निघून गेली होती. चेक-इन काउंटरची लाईन तशी खूपच मोठी होती आणि अगदी विमान सुटेपर्यंत त्यांनी थांबण्यात अर्थही नव्हता. फ्लाईट मध्यरात्र उलटून गेल्यानंतरची होती. सगळ्यांचीच पुरेशी झोपमोड झालेली होती. आणखी झोपमोड करण्यात काहीच हशील नव्हतं. तेव्हा निरोप द्यायला आलेली घरची माणसं निघून जाण्यात विशेषसं काही घडलेलं नव्हतं. पण मनाने एका अशुभ विचाराचा धागा पकडला आणि जाळं विणायला सुरुवात केली. मनात आलं, असंच आणखी एका फार दूरच्या प्रवासाला निघायचं असतं. त्यावेळीही असेच एका विशिष्ट सीमारेषेपर्यंत नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी ''पोचवायला'', ''निरोप द्यायला'' येतात. फार फार तर कोणी आणखी एका पुढल्या क्षणापर्यंत थांबतात. पण सगळी अखेर परत जातात. पुढचा प्रवास एकट्यानेच करायचा असतो.

माझ्याच विचारांनी मी थरारलो. अंगावर सर्रकन काटा आला.

मोठ्या कष्टाने मी ते विचार दूर सारून दुसरे विचार मनात आणण्याचा प्रयत्न करू लागलो.

परीक्षेच्या हॉलमध्ये जाणारे विद्यार्थी दोन निरनिराळ्या मनःस्थितीत असलेले आढळतात. काही बिनधास्त असतात. जेवढा अभ्यास झालेला असतो तेवढ्या अभ्यासाची परत परत उजळणी करून पाहण्याचीही त्यांना आवश्यकता वाटत नाही. याउलट दुसऱ्या काही विद्यार्थ्यांची तऱ्हा असते. पहिल्या प्रकारातल्या विद्यार्थ्यांहून प्रसंगी जास्त अभ्यास झालेला असूनही ते कायम मानसिक दबावाखाली असतात. आपली तयारी झाली की नाही, आपल्याला आयत्या वेळेला सगळं आठवेल की नाही याची त्यांना कायमच काळजी वाटत असते. मी या दुसऱ्या प्रकारात मोडतो. म्हणून ते

अशुभ विचार टाळून मी दुसरे विचार करण्याचा प्रयत्न करू लागलो तेव्हाही माझी पंचाईत झाली. एका मित्राने बजावून सांगितलं होतं - ''व्हिसा असला तरी काही काही वेळेला काही देशांचे अतिउत्साही इमिग्रेशन/कस्टमवाले कशासाठी प्रवास करता आहात याचं प्रूफ दाखवा म्हणून मागतात. तुझ्याकडे सुदैवाने नेदरलँडचं निमंत्रण आहे ते तू ओरिजिनल बरोबर घेऊन ठेव.''

आता वेटिंग लाऊंजमध्ये मित्राच्या या सल्ल्याची आठवण झाली. पण ते निमंत्रण आपण ओरिजिनल स्वरूपात घेतलं आहे का आणि घेतलं असलंच तर नक्की कुठे ठेवलं, हे काही आठवेना.

विचारांच्या या साऱ्या गुंत्यातून सुटण्यासाठी आणि डोळ्यांवर पुन:पुन्हा कोसळणारी झोप टाळण्यासाठी चहा मारावा असा मनात विचार केला आणि कुठे चहाचं दुकान दिसतंय का हे पाहू लागलो. पूर्वी सिंगापूरला गेलो होतो. त्यावेळी एक चहावाला पोऱ्या चहाची किटली घेऊन फिरताना आढळला होता. तो साधारणपणे दोन-तीन रुपयांना कपभर चहा देत होता.

पण सगळ्या चांगल्या परंपरा लवकर नष्ट होतात. तशीच ती किटलीतल्या चहाची थोर परंपरा आता नष्ट झालेली आढळली. आता एअरपोर्टच्या त्या भागात चहा मिळणं अशक्य नव्हतं, पण आपल्याच देशात असून मला त्या चहाची किंमत डॉलरमध्ये द्यावी लागली असती.

आणि या गोष्टीला माझी तयारी नव्हती.

अखेर बोर्डिंगची सूचना मिळाली. पण विमानात वर्णव्यवस्था होती. ''...तेथेही जागा धनिकांस आधी'' ही कविवर्य कुसुमाग्रजांची काव्यपंक्ती आयुष्यात ठिकठिकाणी आठवते, आताही आठवली. प्रथम फर्स्टक्लासवाले पॅसेंजर मग इकॉनॉमी क्लासवाले अशी व्यवस्था होती.

अखेर पट्टे बांधून झाले. सुरक्षिततेच्या सूचना देऊन झाल्या. टॅक्सीइंग करत विमान प्रथम धावपट्टीच्या टोकापाशी पोचलं, धावपट्टीवर त्याने धावायला सुरुवात केली. क्षणाक्षणाला त्याचा वेग वाढत गेला आणि एका विशिष्ट क्षणी त्याने आकाशात झेप घेतली.

होईल की नाही, काय होईल, कसं होईल ही सगळी अनिश्चितता आता संपली होती... माझी युरोपची सफर सुरू झाली होती.

# मुंबई ते फ्रॅंकफर्ट

ॲटलांटिक ॲण्ड पॅसिफिक एक्स्चेंज प्रोग्रॅम या नेदरलॅंडमधील संस्थेच्या निमंत्रणावरून त्या देशाचा पंधरा दिवसांचा सदिच्छा दौरा करण्यासाठी मी लुफ्थांझाच्या फ्रॅंकफर्टला जाणाऱ्या विमानात प्रत्यक्षात जरी २५ सप्टेंबर १९९३च्या पहाटे पाय ठेवला असला, तरी मनाने माझा युरोपचा दौरा साधारणपणे फेब्रुवारीच्या अखेरीसच सुरू झाला होता. योग असला तर सगळं कसं पटापट जुळून येतं हेच खरं, अगदी वर्षभरापूर्वी जरी मला एखाद्या ज्योतिषाने तुम्ही लवकरच युरोपला जाणार आहात असं भविष्य सांगितलं असतं तरी मी त्याच्यावर विश्वास ठेवला नसता.

ही संस्था यावर्षी भारतीय लेखक-कलाकारांना निमंत्रित करायचं ठरवते काय, टाटांच्या लेस्ली सॉहनी फाऊंडेशन या संस्थेचे मानद सचिव अरविंद देशपांडे यांच्याकडे निवडीच्या बाबतीत विचारणा करते काय, ते माझ नाव सुचवतात काय, संस्थेचे एक अधिकारी नेमके त्याच सुमारास मुंबईत बोलावल्यासारखे येतात काय आणि माझी त्यांची मुलाखत होऊन ते ताबडतोब माझी निवड करतात काय - सगळं कसं पूर्वनियोजित, एखाद्या नाटकाचे अंक एकामागोमाग घडत जावेत तसं घडत गेलं होतं.

फेब्रुवारीच्या अखेरीस रीतसर लेखी निमंत्रण आलं. मी ते स्वीकारल्याचं लगेचच त्यांना कळवून टाकलं. आणि मग खरं तर एकामागोमाग महत्त्वाची एक निर्णयपरंपराच सुरू झाली.

मी एवढं दूरवर हॉलंडपर्यंत जायचं तर मग थोडासा आणखी खर्च करून आजूबाजूचे चार देश पाहायला काय हरकत आहे? किंबहुना अशा वेळी फक्त हॉलंडला जाऊन मी परत येणं हा केवळ मूर्खपणा ठरला असता की नाही?

- तेव्हा चार पैसे भले आणखी खर्च झाले तरी हरकत नाही पण तो मूर्खपणा आपण करायचा नाही असं मी ठरवून टाकलं.

- मग प्रश्न उभा राहिला - मला फक्त हॉलंडचं बोलावणं होतं. तिथे मी एकट्याने जाण्यात काहीच गैर नव्हतं. पण पुढे मी आणखी युरोपात भटकणं ही चक्क चैन होती. ती मी एकट्यानेच का म्हणून करावी? घरात कमाई करणारा काही मी एकटा नव्हतो. पती-पत्नी दोघंही कमावत होतो. शिवाय आतापर्यंत ज्या काही सहली केल्या होत्या त्या दोघांनी एकत्रच केलेल्या होत्या. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे वृद्धापकाळी ''आहे मनोहर तरी'' - ही कविता निराळ्या सुरात किंवा निराळ्या शब्दात ऐकायला मिळाली तर? ही दहशत मनात होती.

थोडक्यात काय, माझा हॉलंडचा दौरा संपेल त्या दिवशी शशीने युरोपात यायचं आणि पुढचा प्रवास दोघांनी एकत्रच करायचा असं ठरलं.

युरोपचा प्रवास करायचा हे ठरल्यावर तो कसा करायचा हे ठरवणं हा दुसरा मुद्दा पुढे आला. याबाबतीत नुकत्याच युरोपात जाऊन

आलेल्या आमच्या दोस्तांचा सल्ला पटला. ''युरोपात युरेलची सुंदर सोय आहे, शिवाय सर्व शहरात पब्लिक ट्रान्सपोर्टचीही सेवा उपलब्ध आहे. तेव्हा तुमचा तुम्हीच दौरा आखावा हे उत्तम. काय लागेल ती माहिती आम्ही देतो.''

मला मित्रांचा सल्ला पटला. कारण यापूर्वीही आम्ही आग्नेय आशियातील आमचा सिंगापूर-बँकॉकचा दौरा असाच आमचा आम्ही प्लॅन केलेला होता. अर्थात, तो फक्त सात-आठ दिवसांचा होता. हा दौरा चांगला सव्वा महिन्याचा होता. शिवाय या दौऱ्यात आठ देश म्हणजे आठ दुणे सोळा व्हिसे, आठ निरनिराळी चलनं, सात-आठ भाषा असा सगळा छान गोंधळ होता - आणि त्यामुळेच अर्थात अभ्यास करायलाही चांगला वाव होता. (या वाक्यात मी ''व्हिसे'' हे ''व्हिसा'' या मराठी शब्दाचं बहुवचन वापरलेलं आहे. त्याचा ''व्हिसा'' या फ्रेंच शब्दाच्या बहुवचनाशी काहीही संबंध नाही याची भाषातज्ज्ञांनी कृपया नोंद घ्यावी. मला माझ्या वाचकाला समजेल अशी मराठी भाषा वापरायची इच्छा आहे. जाता जाता : व्हिसा या मराठी आणि त्याच उच्चाराच्या फ्रेंच शब्दाचा अर्थ एकच आहे.) तेव्हा जेहेत्ते कालाचे ठायी आमची स्वारी धडाधड कामाला लागली.

पुस्तकांवरून अभ्यास करून युरोपच्या प्रवासासाठी नोट्स बनवण्याची मजा काही औरच होती. त्या काळात आमचं घर अगदी पाहण्यासारखं झालेलं होतं. (म्हणजे



*लुफ्तांझाचे जम्बो विमान*

एरवी ते नाटकाच्या सेटसारखं नीट नेटकं असतं असं नव्हे - गैरसमज नसावा.) प्रवासाची जंत्री ठरवण्यासाठी मार्गदर्शन व्हावं म्हणून मी इतक्या विविध प्रवास कंपन्यांच्या युरोप सहलींची पत्रकं, परदेशी वकिलातीतून मिळणारी माहिती पत्रकं आणि आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांच्या गुळगुळीत कागदावरच्या रंगीत जाहिराती गोळा केल्या होत्या की, त्या काळात घरी आलेल्या अनोळखी पाहुण्याचा मी पर्यटन व्यवसायात असावा, असा गैरसमज नक्कीच झाला असता.

त्या काळात मी असा जमिनीवर सरसावून बसायचो. आजूबाजूला या रंगीबेरंगी कागदांचा पसारा पसरलेला असायचा आणि मी त्यात रंगून गेलेलो असायचो. ''जेवायला चला'' अशा शशीच्या दोन हाका मारून झालेल्या असायच्या. - त्या अर्थातच मला ऐकू आलेल्या नसायच्या. शेवटी कातावून मोठ्याने मुलाच्या नावाने ओरडायची - ''समीर, बाबा बघ रे कुठे आहेत - दिसतायत त्यांच्या खोलीत की गेले जर्मनीला?''

बायको तणतणली की तेवढं बरोबर नवऱ्यांना ऐकू येतं.

''आता जर्मनीतून ऑस्ट्रियाला जायच्या बेतात आहे. म्युनिचच्या प्लॅटफॉर्मवर उभा आहे. गाडी यायला अजून तीन मिनिटं आहेत.''

''हो ना? मग तेवढ्या वेळात भारतात प्रभादेवीला या. जेवून घ्या आणि मग जा पुढे कुठे जायचं असेल तिथे.''

- असे संवाद रंगायचे.

पण या अभ्यासाच्या काळात आपोआपच मला प्रत्यक्ष युरोपात पाऊल टाकण्यापूर्वीच युरोपचा बराचसा इतिहास आणि भूगोलही समजला. या अभ्यासाचा मला पुढे प्रवासात खूपच उपयोग झाला. शक्य तितक्या कमी खर्चात जास्तीत जास्त स्थळं पाहता आली.

अनेक मित्रांनी अनेक प्रकारे मदतीचा हात पुढे केला. कोणी प्रवासातल्या अडचणी सांगितल्या, कोणी ओळखीच्या व्यक्तींचे पत्ते दिले, कोणी गरम कपडे दिले तर कोणी सामानाची ट्रॉली दिली. युरोपात खाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून नातेवाईकांनी खूप दिवस टिकतील असे खाद्यपदार्थ बनवून दिले. आमच्या प्रवासाच्या तयारीला असे दहा जणांचे हात लागत होते तेव्हा मला जुन्या काळात एखादी व्यक्ती काशीयात्रेला जाऊन आली की मावंदे का घालीत असे याचा अर्थ कळला होता.

सगळी व्यवस्थित तयारी केली तरी एखादा छानसा घोटाळा झाला नाही तर ट्रिप संस्मरणीय होत नाही हेच खरं.

मी २५ सप्टेंबरला निघणार होतो. शशी बरोबर पंधरा दिवसांनी म्हणजे ८ ऑक्टोबरला त्याच फ्लाईटने येणार होती. मी निघण्यापूर्वी आदल्या दिवशी लुफ्थांझाच्या ऑफिसात गेलो. माझं तिकीट तिथल्या अधिकाऱ्याने कन्फर्म केलं, वास्तविक शशीला निघायला अजून बराच वेळ होता. पण सहज तिच्याही तिकिटाची चौकशी केली.

''८ ऑक्टोबरला मिसेस लोंढे या नावाचा कोणी पॅसेंजर आमच्याकडे बुक झालेला नाहीये.'' अधिकाऱ्याने मला शॉक दिला.

''अहो नाही कसा? हे काय माझ्याकडे तुमच्या अधिकृत एजंटने दिलेलं तिकीट आहे तिच्या नावाचं ८ ऑक्टोबरचं,'' मी तिकीट दाखवत म्हटलं, ही काय नसती झंझट म्हणून मी अखेरच्या क्षणी गॅसवर. कारण ही भानगड न मिटवताच मला पुढे जावं लागलं तर -

''कॉम्प्युटर रेकॉर्डप्रमाणे या बाईंचं तिकीट ८ सप्टेंबरचं होतं आणि त्या दिवशी त्यांनी प्रवास केलेला नाही असं दिसतंय. त्या दिवशी त्यांची नो शो पॅसेंजर म्हणून नोंद झालेली आहे.'' शांतपणे

अधिकाऱ्याने खुलासा केला.

अखेर व्हिसासकट सगळे कागदपत्र दाखवल्यावर लुफ्थांझावाल्यांची खात्री पटली. आणि कसलाही जादा आकार वगैरे भरावा न लागता शशीचं ८ ऑक्टोबरचं तिकीट कन्फर्म झालं होतं. अखेर कोणत्याही यंत्रामागचा माणूस महत्त्वाचा असतो! अशा सगळ्या सव्यापसव्यानंतर आता मी आरामात फ्रँकफर्टच्या विमानात बसलो होतो.

•

मुंबई ते फ्रँकफर्ट हा प्रवास काही फारसा आठवणीत राहण्यासारखा खास झाला नाही. विमान सर्व सुखसोयींनी युक्त असं प्रचंड जंबोजेट असूनही असं का व्हावं याचा आज म्हणजे प्रवासानंतर खूप दिवसांनी मी विचार करतोय तेव्हा माणसाला सहज जाणवेल, नव्हे किंबहुना पदोपदी जाणवतंच असं एक सुखी जीवनाचं सूत्र आठवतं. हे सूत्र समजायला इतकं साधं, सोपं असूनही माणूस ते सारखं का विसरतो हे समजत नाही. ते सूत्र असं - जीवनात नुसत्या भाराभर भौतिक सुखसोयी असून पुरत नाही तर त्या सुखसोयींचा आस्वाद घेता येईल असं आरोग्य आणि मन:स्वास्थ्यही असावं लागतं. आरोग्य आणि मन:स्वास्थ्य गमावून पैसे कमावणं हा मूर्खपणा आहे.

या विमानातील माझी सीट गैरसोयीची होती. पुढे पाय पसरायला बिलकुल जागा नव्हती. विमानात दाखवला जाणारा सिनेमा मला मान वाकडी आणि लांब करून पाहिल्याशिवाय दिसत नव्हता. टेप्ड संगीत माझ्या आवडीचं नव्हतं. सीट सोयीस्कर असली तरीही मला बसल्याबसल्या कधीही झोप येत नाही. मला झोप येते ती धरणीमातेला समांतर झालो तरच. इथे तो प्रश्नच नव्हता. शिवाय सीटही गैरसोयीची होती त्यामुळे झोपेचं छान खोबरं होत होतं. त्यात आणखी ती हवाई सुंदऱ्याची इन फ्लाईट सर्व्हिस! एरवी अन्न किंवा जे ड्रिंक खिडकीतून बाहेर दिसणाऱ्या निळ्या आकाशाच्या तुकड्यांकडे पाहत पाहत आनंदाने घेतलं असतं ते असं अंग अवघडलेलं असताना आणि डोळे जडावलेले असताना पहाटे साडेतीन वाजता पुढे आल्यावर फारसं सुखद वाटत नव्हतं. त्यामुळे ते अन्न घ्यायचं टाळून मी तशीच बसल्याबसल्या झोप घेण्याचा अयशस्वी प्रयत्न करत राहिलो.

मध्येच पायलटने माहिती दिली. ''मुंबईहून सुटलेलं आपलं विमान दुबई पार करून अंकारावरून पुढे आता इस्तंबूलच्या दिशेने निघालेलं आहे.'' याचा अर्थ असा होता की आतापर्यंत आम्ही अर्ध्याहून थोडं अधिक अंतर पार केलं होतं. जंबोजेट विमानात अधूनमधून कॉम्प्यूटर ग्राफिक्सच्या सहाय्याने विमानाची त्या विशिष्ट क्षणाची आकाशातली स्थिती दाखवण्याची सोय केलेली असते. माझ्या बसल्या जागेवरून तो पडदा नीट दिसत नसूनही मुद्दाम मान लांब आणि वाकडी करून मी त्या क्षणाची आमच्या विमानाची स्थिती पाहिली. ती अशी होती :-

विमानाचा वेग : ताशी ९२० किलोमीटर्स म्हणजेच ताशी सुमारे ५७५ मैल.

उंची : समुद्रसपाटीपासून १०,७०० मीटर्स म्हणजेच सुमारे ३५००० फूट.

बाहेरचं तापमान : उणे ५० अंश सेल्सियस म्हणजेच सुमारे उणे ५६ अंश फॅरनहाईट.

''आपलं विमान पुढे बुडापेस्टवरून ठरलेल्या वेळी म्हणजे फ्रँकफर्टच्या स्थानिक वेळेनुसार सकाळी साडेआठ वाजता

फ्रँकफर्टला पोहोचेल.'' पायलट अंतर्गत ध्वनिक्षेपकावर सांगत होता.

वास्तविक आमचा मुंबई ते फ्रँकफर्ट हा संपूर्ण प्रवास घड्याळ ॲडजस्ट केलं नाही तर सुमारे साडेदहा तासांचा होता पण फ्रँकफर्ट मुंबईच्या पश्चिमेला असल्यामुळे आता आमच्या आयुष्यात साडेचार तासांची भर पडणार होती. म्हणजेच मुंबईच्या स्थानिक वेळेप्रमाणे जे साडेचार तास अगोदरच जगून झालं होतं ते आम्हाला पुन्हा जगायला मिळणार होतं.

अखेर फ्रँकफर्ट आलं.

# प्रवासातला पहिला धडा

**मा**झी खिडकीजवळची सीट नसल्यामुळे मला उंचीवरून फ्रँकफर्टचा विमानतळ कसा दिसतो हे दिसलं नाही. पण फ्रँकफर्टच्या विमानतळाची भव्यता आणि विस्तार विमान खाली उतरल्यावरही जाणवतात. तिथे एकाच वेळी अक्षरश: शेकडयांनी विमानांमध्ये मालाची किंवा उतारूंची चढउतार चालू असते. आमचं विमान त्याच्या धावपट्टीवरून बाजूला झाल्यावर त्या धावपट्टीवरून उडण्यासाठी खोळंबून राहिलेल्या जवळजवळ सात-आठ विमानांचा क्यू मला दिसला. सकाळचे साडेआठ झालेले असले तरी आकाश अभ्राच्छादित असल्यामुळे विमानतळावर काळोखी होती. नुकताच पाऊस पडून गेला असावा. कारण विमानतळावरचे रस्ते ठिकठिकाणी ओले दिसत होते. धुकंही होतं. कारण दुरून दिसणाऱ्या रस्त्यांवरील वाहनांचे दिवे लावलेले दिसत होते.

फ्रँकफर्ट विमानतळावर सुमारे दीड तासांचा हॉल्ट होता. विमानही बदलायचं होतं. अर्थात, विमान बदलायचं असलं तरी सामान वगैरे बदलण्याचा आम्हा उतारूंना काहीच त्रास नव्हता. मुंबईला जे सामान विमान कंपनीच्या ताब्यात दिलं होतं, ते सामान विमान कंपनी आपण होऊन पुढल्या म्हणजे ॲमस्टरडॅमच्या विमानात नेऊन ठेवणार होती. त्यामुळे हातातली एक बॅग घेऊन पुढल्या फ्लाईटच्या वेटिंग लाऊंजकडे प्रयाण केलं.

वास्तविक आता तास-दीड तास करायचं काय हा प्रश्न होता. ओळखीचं माणूस सापडणं शक्य नव्हतं. एकही भारतीय चेहरा दिसत नव्हता. कोणातरी परकीय माणसाशी बोलायला जावं तर ती व्यक्ती प्रतिसाद देईल की नाही याची खात्री नव्हती. शिवाय भाषेचा प्रश्न होताच. कारण युरोपात सगळ्यांना इंग्लिश भाषा येतेच असं नाही. हातातल्या बॅगेत वजन नको म्हणून पुस्तक वगैरे काही घेतलं नव्हतं. विमानतळावर शोधाशोध केली असती तर इंग्लिश भाषेतलं वर्तमानपत्र मिळालं असतं, नाही असं नाही. पण संपूर्ण रात्र अवघडलेल्या अवस्थेत काढलेली असल्यामुळे तेवढी धावाधाव करायचा उत्साह नव्हता.

पण माझा वेळ कसा घालवायचा हा प्रश्न एका चिमुकल्याने चुटकीसारखा सोडवला.

ते एक वर्ष-दीड वर्षाचं मूल होतं. ते कदाचित कोरियन असावं किंवा चिनी किंवा जपानीही असेल. ते त्याच्या आईच्या अंगाखांद्यावर खेळत होतं. खाली जमिनीवर दुडूदुडू धावत होतं. मोठमोठ्याने खिदळत होतं. त्याची आईही त्याच्याशी 'कुक्कू-हाब्बा'चा खेळ खेळत होती. आई दिसेनाशी झाली की ते कावरंबावरं होत होतं आणि पुन्हा दिसली की एकदम खिलकारत होतं.

एकूणच मला लहान मुलांचे निष्पाप विभ्रम पाहायला आवडतात. त्या क्षणी मला ते अधिकच मोहक वाटलं. मनात विचार आला, मलाही

आता या मुलाशी खेळता येईल. कारण निरनिराळ्या मानव समूहांच्या शब्दांनी बोलायच्या भाषा जरी निरनिराळ्या असल्या तरी आख्ख्या मानवजातीची हास्याची भाषा एकच आहे. आमच्या पुढच्या प्रवासात जेव्हा जेव्हा आम्हाला भाषेची अडचण आली तेव्हा तेव्हा आम्हाला ही हास्याची वैश्विक भाषाच उपयोगी पडली.

फ्रँकफर्ट ते ॲमस्टरडॅम या प्रवासात मला खिडकीची जागा मिळाली होती. ते ७३७ बोइंग जातीचं विमान होतं. फ्रँकफर्ट विमानतळावर अजूनही धुक्याचं कव्हर होतं. त्यामुळे धूसर अंधुकसं फ्रँकफर्ट शहर दिसलं आणि पुढल्या चार-पाच मिनिटात विमान ढगांच्या दाट आवरणात शिरलंसुद्धा! सारा मिळून पाच एक मिनिटांचा खेळ होता तो. पण एक सुरेल स्वप्निल अनुभव देऊन गेला. कारण नंतर विमान ढगांच्या थराच्या वरती गेलं तरी बाहेर स्वच्छ सूर्यप्रकाश पडलाच नाही. एक प्रकारच्या विकरीत, धूसर प्रकाशाने सोबत केली ती पार ॲमस्टरडॅमचा स्किफोल विमानतळ येईपर्यंत.

जसजसा स्किफोल विमानतळ जवळ येऊ लागला तसतशी विमानाने आपली उंची कमी करायला सुरुवात केली. आणि एका क्षणी ते ढगांच्या दाट आवरणाच्या खाली आलं. त्या क्षणी जे दृश्य नजरेला पडलं ते अविस्मरणीय होतं. खाली दिसत होतं ते दृश्य नव्हतंच. ते एक अप्रतिम सुंदर असं चित्र होतं.

खाली जणू मखमलीचा हिरवागार गालिचा अंथरलेला होता. मला वाटतं हिरव्या रंगाला इतर कोणत्याही रंगापेक्षा जास्त छटा असाव्यात. त्या सगळ्या खालच्या चित्रात दिसत होत्या. खाली दिसणाऱ्या दृश्याकडे पाहताना ते चित्र असल्याचा भास होत होता. याचं मुख्य कारण म्हणजे ते दृश्य अतिशय सपाट होतं. आपल्या मराठी नजरेला डोंगराळ दृश्य पाहण्याची इतकी सवय झालेली आहे की सपाट दृश्य आपल्या नजरेला चित्रासारखं वाटतं. आपल्या इथे निसर्गात क्षितिजावर सर्वत्र डोंगर दिसतात. नेदरलँडमध्ये डोंगर जवळजवळ नाहीतच.

कीथ माझ्या स्वागतासाठी स्किफोल विमानतळावर आले होते. ॲटलांटिक ॲण्ड पॅसिफिक एक्स्चेंज प्रोग्राम या संस्थेचं ऑफिस आणि माझी निवासाची व्यवस्था रॉटरडॅम या नेदरलँडमधील दुसऱ्या क्रमांकाच्या शहरात केलेली होती. त्यामुळे ॲमस्टरडॅमहून आता रॉटरडॅम या शहरात जायचं होतं. कीथनी माझ्यासाठी रेल्वेचा पास काढून ठेवला होता.

स्किफोल रेल्वे स्टेशन स्किफोल विमानतळाच्या खाली (अंडरग्राऊंड) आहे. विमानतळ फ्रँकफर्टच्या विमानतळासारखाच प्रचंड आहे. पण सर्वत्र सरकणारे पट्टे, जिने यांची सोय असल्यामुळे तसंच विमानतळावर सामान हलवण्यासाठी ट्रॉलीही उपलब्ध असल्यामुळे दोन बॅगा असल्या तरी फारशी अडचण आली नाही. पण आम्ही स्किफोल रेल्वे स्टेशनच्या हद्दीत शिरलो मात्र. .

...मला युरोपच्या प्रवासातला पहिला धडा शिकायला मिळाला; नव्हे शिकावा लागला.

युरोपात हमाल ही संस्था नाही. युरोपात 'कुणाच्या खांद्यावर... कुणाचे ओझे' देता येत नाही तर तिथे प्रत्येकाने आपापला क्रूस आपापल्या खांद्यावर वाहून न्यायचा असतो. हा धडा मी पुढले पस्तीस-चाळीस दिवस युरोपात रोज गिरवीत होतो. आणि या धड्यावर आधारित दुसरा एक धडा मी आयुष्यातील यापुढील सर्व प्रवासांसाठी कायमचा शिकलो. तो असा :-

'नेहमी कमीत कमी सामान घेऊन प्रवास करावा.'

८२९
भू-प्रवास

१०३७६२

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

| | |
|---|---|
| ९।७।९८ | ७।१२।९८ |
| २।७।९८ | १५।१२।९८ |
| ५।१०।९८ | ३।१।९९ |
| २।५।९८ | ६।१।९९ |
| | ३।२।९९ |
| | २४।२।९९ |
| | २१।५।९९ |
| | ६।७।९९ |
| | १३।१०।९९ |
| | ७।१।२००० |

(कृ.मा.पहा.)

१६०००/११-९५

आता या मुलाशी खेळता येईल. कारण निरनिराळ्या मानव समूहांच्या शब्दांनी बोलायच्या भाषा जरी निरनिराळ्या असल्या तरी आख्ख्या मानवजातीची हास्याची भाषा एकच आहे. आमच्या पुढच्या प्रवासात जेव्हा जेव्हा आम्हाला भाषेची अडचण आली तेव्हा तेव्हा आम्हाला ही हास्याची वैश्विक भाषाच उपयोगी पडली.

फ्रँकफर्ट ते ॲमस्टरडॅम या प्रवासात मला खिडकीची जागा मिळाली होती. ते ७३७ बोइंग जातीचं विमान होतं. फ्रँकफर्ट विमानतळावर अजूनही धुक्याचं कव्हर होतं. त्यामुळे धूसर अंधुकसं फ्रँकफर्ट शहर दिसलं आणि पुढल्या चार-पाच मिनिटात विमान ढगांच्या दाट आवरणात शिरलंसुद्धा! सारा मिळून पाच एक मिनिटांचा खेळ होता तो. पण एक सुरेल स्वप्निल अनुभव देऊन गेला. कारण नंतर विमान ढगांच्या थराच्या वरती गेलं तरी बाहेर स्वच्छ सूर्यप्रकाश पडलाच नाही. एक प्रकारच्या विकरीत, धूसर प्रकाशाने सोबत केली ती पार ॲमस्टरडॅमचा स्किफोल विमानतळ येईपर्यंत.

जसजसा स्किफोल विमानतळ जवळ येऊ लागला तसतशी विमानाने आपली उंची कमी करायला सुरुवात केली. आणि एका क्षणी ते ढगांच्या दाट आवरणाच्या खाली आलं. त्या क्षणी जे दृश्य नजरेला पडलं ते अविस्मरणीय होतं. खाली दिसत होतं ते दृश्य नव्हतंच. ते एक अप्रतिम सुंदर असं चित्र होतं.

खाली जणू मखमलीचा हिरवागार गालिचा अंथरलेला होता. मला वाटत हिरव्या रंगाला इतर कोणत्याही रंगापेक्षा जास्त छटा असाव्यात. त्या सगळ्या खालच्या चित्रात दिसत होत्या. खाली दिसणाऱ्या दृश्याकडे पाहताना ते चित्र असल्याचा भास होत होता. याच मुख्य कारण म्हणजे ते दृश्य अतिशय सपाट होतं. आपल्या मराठी नजरेला डोंगराळ दृश्य पाहण्याची इतकी सवय झालेली आहे की सपाट दृश्य आपल्या नजरेला चित्रासारखं वाटतं. आपल्या इथे निसर्गात क्षितिजावर सर्वत्र डोंगर दिसतात. नेदरलँडमध्ये डोंगर जवळजवळ नाहीतच.

कीथ माझ्या स्वागतासाठी स्किफोल विमानतळावर आले होते. ॲटलांटिक ॲण्ड पॅसिफिक एक्स्चेंज प्रोग्राम या संस्थेचं ऑफिस आणि माझी निवासाची व्यवस्था रॉटरडॅम या नेदरलँडमधील दुसऱ्या क्रमांकाच्या शहरात केलेली होती. त्यामुळे ॲमस्टरडॅमहून आता रॉटरडॅम या शहरात जायचं होतं. कीथनी माझ्यासाठी रेल्वेचा पास काढून ठेवला होता.

स्किफोल रेल्वे स्टेशन स्किफोल विमानतळाच्या खाली (अंडरग्राऊंड) आहे. विमानतळ फ्रँकफर्टच्या विमानतळासारखाच प्रचंड आहे. पण सर्वत्र सरकणारे पट्टे, जिने यांची सोय असल्यामुळे तसंच विमानतळावर सामान हलवण्यासाठी ट्रॉलीही उपलब्ध असल्यामुळे दोन बॅगा असल्या तरी फारशी अडचण आली नाही. पण आम्ही स्किफोल रेल्वे स्टेशनच्या हद्दीत शिरलो मात्र...

...मला युरोपच्या प्रवासातला पहिला धडा शिकायला मिळाला; नव्हे शिकावा लागला.

युरोपात हमाल ही संस्था नाही. युरोपात 'कुणाच्या खांद्यावर... कुणाचे ओझे' देता येत नाही तर तिथे प्रत्येकाने आपापला क्रूस आपापल्या खांद्यावर वाहून न्यायचा असतो. हा धडा मी पुढले पस्तीस-चाळीस दिवस युरोपात रोज गिरवीत होतो. आणि या धड्यावर आधारित दुसरा एक धडा मी आयुष्यातील यापुढील सर्व प्रवासांसाठी कायमचा शिकलो. तो असा :-

'नेहमी कमीत कमी सामान घेऊन प्रवास करावा.'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
ग्रा. क्र. ८२९
२१५०७
ग्रंथ शाखा

भू-प्रवास
८२९
२१५०७

# युरोसफर

लक्ष्मण लोंढे




REFBK-0029507

अक्षर प्रकाशन

**अक्षर प्रकाशन २९**

**प्रथम आवृत्ती,**
मे, १९९८

**© सौ. स्वाती लोंढे**
बी-८४, ओशन गोल्ड, ट्विन टॉवर
लेन, प्रभादेवी,
मुबई - ४०० ०२५

**मुखपृष्ठ**
दिलीप पवार


**अक्षर जुळणी**
मजकूर


**रंगीत छपाई**
मॅग्ना ग्राफिक्स, १०१, सी-टी
गव्हर्नमेंट इंडस्ट्रीयल इस्टेट,
कांदिवली (प.), मुंबई - ४०० ०६७

**कृष्णधवल छपाई**
फातिमा आर्ट्स, टिळकनगर,
साकिनाका, मुंबई - ४०० ०७२

**प्रकाशक**
अक्षर प्रकाशन,
७-८, पाडुरंग बिल्डिंग,
लेडी जमशेदजी रोड,
माहीम, मुंबई - १६

**मूल्य - १०० रुपये**





*ॲमस्टरडॅम रेल्वे स्टेशन*

दोन मिनिटांत ट्रेन आली. समयसारिणीत नोंदलेल्या आणि इंडिकेटरवर दाखवलेल्या वेळेच्या दीड-दोन मिनिटं आधी आली आणि नेमक्या वेळेवर सुटली.

युरोपातील पुढल्या सदतीस दिवसांच्या वास्तव्यात मी रोज सुमारे चार ते पाच वेळा निरनिराळ्या सात देशांच्या आगगाड्यांमध्ये दिवसाच्या निरनिराळ्या वेळी चढलो आणि उतरलो असेन. पण या दीडशेहून अधिक वेळा केलेल्या प्रवासात एकाही देशातली, एकही ट्रेन एकाही वेळेला एकाही मिनिटाने उशिरा आली नाही की उशिरा सुटली नाही. आणि हे लिहिताना मी एका अक्षराचीही अतिशयोक्ती केलेली नाही.

गाडीत गर्दी नव्हती. सेकंड क्लास आणि फर्स्ट क्लासमध्ये फारसा फरक नव्हता. साधारणपणे शंभरच्या आसपास बसण्याच्या जागा आहेत असं मानलं तर चाळीस ते पन्नास माणस बसलेली आढळली. एक लंडन शहर सोडलं तर युरोपात सर्वत्र मला हीच स्थिती

आढळली.

गर्दी नसल्यामुळे मला खिडकीपासची जागा अगदी सहज मिळाली. खिडकीतून दिसणारं बाहेरचं दृश्य अतिशय नेत्रसुखद होतं. क्षितिजाला नजर भिडेपर्यंत दिसणारी, जमिनीवर गालिचा अंथरलेला असावा तशी हिरवीगार कुरणं, त्यातून चरणारी पुष्ट गुरं-ढोरं. मधूनमधून दिसणारी पन्नास शंभर कौलारू घरांची छोटी छोटी गावं, स्त्रीच्या भांगासारखे सरळ आखलेले पाण्याचे कालवे, काही ठिकाणी दिसणारे पवनचक्कीचे पंखे असं सगळं चैत्रगौर मांडून ठेवावं तसं चित्र बाहेर दिसत होतं.... आणि हे डोळे निववणारं दृश्य मला सतत पुढले पंधरा-वीस दिवस पाहायला मिळणार होतं.

रॉटरडॅम शहराच्या ब्लाक या भागातील एका अपार्टमेंटमध्ये माझी राहण्याची सोय करण्यात आली होती. रॉटरडॅम सेंट्रल स्टेशनपासून कीथने मला टॅक्सीने त्या घरापर्यंत नेलं. रस्त्याने जाताना कीथ सांगत होता, 'रॉटरडॅमनजीक ऱ्हाइन नदी उत्तर समुद्राला मिळते. आज रॉटरडॅम हे जगातील एक सर्वोत्कृष्ट बंदर मानलं जातं. पण गेल्या महायुद्धात हिटलरने या शहराचं स्मशान बनवलं होतं. प्रत्यक्ष युद्ध जाहीर न करताच त्याने हॉलंडवर हल्ला केला. त्याच्यापुढे आमचा काय टिकाव लागणार? थोड्या प्रतिकारानंतर आम्ही त्याला शरण गेलो. तो १५ मे १९४० हा दिवस होता. आम्ही शरण यावं म्हणून हिटलरचा एक क्रूर सेनानी हरमान गोअरिंग याने आमच्यावर तुफानी हवाई हल्ल्याचे आदेश दिलेले होते. वास्तविक आम्ही शरण गेल्यावर त्या हल्ल्यांची गरज संपली होती. पण तो म्हणे आदेश मागे घ्यायचे 'विसरला'... आणि त्या हवाई हल्ल्यातून रॉटरडॅममधील फक्त दोन बिल्डिंग वाचल्या. बाकी सारं भुईसपाट झालं. बंदरात तर बुडालेल्या नौकांनी एवढा खच पडला की युद्ध संपेपर्यंत बंदर पुन्हा कार्यान्वित करता आलं नाही. तुम्ही आता आजूबाजूला पाहताय त्यापैकी एकही इमारत युद्धपूर्व काळातली नाही.

विनाशाच्या ढिगाऱ्यावर एक संपूर्ण शहर पुन्हा बांधून काढणं ही सोपी गोष्ट नाही. पण डचांनी ती एक संधी मानली आणि नवं शहर बांधताना नव्या स्थापत्याचे नवनवे प्रेक्षणीय नमुने उभे केले. आज स्थापत्याचे हे नवे नमुने पाहायलाही पर्यटक रॉटरडॅमला येतात.

रॉटरडॅमला निवासस्थानी पोहोचल्यावर त्या दिवशी संध्याकाळी पहिली महत्त्वाची काय गोष्ट केली तर मुंबईला घरी फोन लावला. मी व्यवस्थित पोचल्याचं घरी कळवायचं होतं. घरची माणसं वाट बघणार होती.

आधी इंटरनॅशनल कोड नंबर मग भारताचा आणि मुंबई शहराचा कोड नंबर आणि अखेर आमचा घरचा फोन नंबर अशी केवळ तेरा निरनिराळ्या आकड्यांची तेरा बटणं दाबली आणि थोड्याच वेळात पलीकडली रिंग वाजली. आणि पुढच्याच क्षणी मुलीच्या आवाजात ऐकू आलं, 'हॅलो'.

त्या क्षणी जाणवलं, जेवढं अंतर पार करायला वास्को-द-गामाला सुमारे सात-आठ महिने लागले असते, जे अंतर पार करायला मला स्वत:ला सुमारे बारा-चौदा तास लागले होते, ते अंतर अक्षरश: मिनिटाभरात पार करून माझ्या मुलीचा आवाज माझ्यापाशी येऊन थडकला होता. सारं जग हाकेच्या अंतरावर आणणाऱ्या दळणवळण उपग्रहांची भव्य कल्पना मांडणाऱ्या ऑर्थर क्लार्क या विज्ञान कथाकाराला मनातल्या मनात वदन करून मी उत्तरलो, ''होय ऋचा, मी बाबा बोलतोय.''

# नेदरलँडमधले दिवस

रॉटरडॅमला राहण्याची सोय चांगली होती. म्हणजे असं की एखाद्या कंपनीचं गेस्ट हाऊस असावं तसा ॲटलांटिक ॲण्ड पॅसिफिक एक्स्चेंज प्रोग्रॅम संस्थेचा एक प्रशस्त चार खोल्यांचा फ्लॅट होता. फ्लॅटमध्ये किचनही होतं आणि मी राहायला येणार म्हणून किचनमध्ये दूध, भाज्या, फळं, चीज, बटर, काही कडधान्यं असे पदार्थ आणून ठेवलेले होते. प्रत्येक पदार्थ पॅकबंद स्वरूपातला. त्याशिवाय इतर कितीतरी स्वैपाकाला उपयुक्त अशी उपकरणंही होती. सुक्या मेव्याची पाकिटं होती. खुल्या अर्थव्यवस्थेमुळे यातल्या कितीतरी गोष्टी निरनिराळ्या देशांतून इंपोर्ट केलेल्या दिसत होत्या. मी आपला एखादी तरी माझ्या देशातून 'इंपोर्ट' केलेली वस्तू आढळते का ते उत्सुकतेने पाहत होतो. अर्थातच भारतातून त्या देशात एक्सपोर्ट केलेली वस्तू आढळेल अशी आशा नव्हती.

– पण मला आश्चर्याचा धक्का बसला. भारतातून 'इंपोर्ट' केलेली एक वस्तू मला तिथे आढळली.


भारतीय चहा.

पहिल्या दिवशी मी अभिमानाने तिथे भारतीय चहा प्यायलो.

आश्चर्याचा धक्का देणारी अशीच आणखी एक गोष्ट मला रॉटरडॅममध्ये प्रथमदर्शनीच पाहायला मिळाली. पश्चिम युरोपमधल्या ज्या प्रगत देशात मी आलो होतो त्या देशातल्या सोयी-सुविधा माझ्या देशातल्या सोयी-सुविधांपेक्षा अधिक प्रगत असतील अशा अपेक्षेनं मी आलो होतो – तिथलं जीवन अधिक 'फास्ट' असेल, तिथली वाहनं आपल्या वाहनांपेक्षा अधिक सुसाट वेगाने धावत असतील असं मला वाटलं होतं. किमान माझ्या देशात टाकाऊ ठरलेलं आणि म्हणून रद्दबातल केलं गेलेलं वाहतुकीचं साधन इथे मला पाहायला मिळेल अशी तर माझी बिल्कुल अपेक्षा नव्हती. पण नेमकं असंच एक वाहन तिथे सार्वजनिक वाहन म्हणून सर्रास वापरात आहे.

रॉटरडॅम शहरात अजूनही ट्रामगाड्या आहेत. किंबहुना नेदरलँडच्या सर्वच शहरात अजून ट्रामगाड्या 'धावतात.' (हां, हे क्रियापद बरोबर सापडलं. आपल्या मुंबईला ट्रामगाड्या 'चालायच्या' – खरं की नाही? त्यामुळेच त्या धावत पकडताही यायच्या आणि कुठेही सोडताही यायच्या. या ट्रामगाड्या धावतात – शिवाय त्या कुठेही पकडण्याची सोयसुद्धा नाही – कारण स्टॉपवरून सुटल्याबरोबर त्यांचे दरवाजे बंद केले जातात ते पुढचा स्टॉप येईपर्यंत! आणखी एक लक्षात राहावी अशी गोष्ट – बहुतेक ठिकाणी या गाड्या स्मार्ट डच मुली चालवतात.)

ॲटलांटिक ॲण्ड पॅसिफिक एक्स्चेंज प्रोग्रॅम ही एक ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालवली जाणारी संस्था आहे. तिला नेदरलँड, अमेरिका आणि जपान या देशांतील काही औद्योगिक कंपन्यांचा तसच



*रॉटरडॅमची ट्रॅम*

हे म्हणजे त्या प्रसिद्ध उर्दू शेरासारखंच झालं.

खुदी को कर बुलंद इतना। कि हर तकरीर से पहले।।
खुदा बंदे से पूछे। कि तेरी रज़ा क्या है ?।।

अशी संधी मिळाल्यावर मीही माझ्या विविध आवडी-निवडी त्यांना कळवून टाकल्या होत्या. माझ्या निरनिराळ्या विषयांतील आवडी-निवडी लक्षात घेऊन त्यांनी माझा कार्यक्रम आखला होता. रोज सकाळी आठ वाजल्यापासून माझ्या कार्यक्रमांना सुरुवात होत असे. या माझ्या दोन आठवड्यांच्या वास्तव्यात मी अनेक संस्थांना, स्थळांना आणि व्यक्तींना भेटलो. यात निरनिराळ्या प्रवासी कंपन्या जी प्रेक्षणीय स्थळं दाखवतात अशी ठिकाणं तर होतीच पण अशीही कित्येक स्थळं, घटना आणि प्रसंग आहेत की जी केवळ मलाच पाहायला मिळाली.

आता हेच पाहा ना.

नेदरलँड सरकारचा भरघोस आर्थिक पाठिंबा आहे. १९८१मध्ये ही संस्था स्थापन झाली ती मुख्यत्वे करून या तीन देशांतील लेखक, कलाकार, पत्रकार, राजकारणी इत्यादी व्यक्तींचा एकमेकांशी परिचय करून देण्यासाठी. या वर्षापासून संस्थेने आपल्या कार्यकक्षेत भारताचाही समावेश करायचं ठरवलं होतं. संस्थेची कार्यपद्धती अगदी अनौपचारिक स्वरूपाची असल्यामुळे सुरुवातीला प्राथमिक निवड झाल्यावर त्यांनी मलाच विचारलं होतं, 'समजा आपली निवड झाली तर आपणास नेदरलँडमध्ये काय काय पहायला आवडेल?'

मी एके दिवशी नेदरलँडमधल्या ब्रेडा या गावी एक सांस्कृतिक महोत्सव पाहायला गेलो. हा त्या देशात दरवर्षी घडणारा एक उत्सव होता आणि गेली ९ वर्ष तो सतत साजरा होत होता. मिलिटरीतून रिटायर झालेले एक जनरल हा महोत्सव घडवून आणत होते. वास्तविक मिलिटरीतल्या काय किंवा सरकारातल्या इतर कोणत्याही डिपार्टमेंटमधल्या काय, रिटायर झालेल्या उच्च पदस्थाने रिटायरमेंटच्या दुसऱ्या दिवशी लगेच एखाद्या खाजगी कंपनीत मोठ्या

पगाराची जनसंपर्काधिकाऱ्याची नोकरी पत्करायची असते की नाही? आपल्या जुन्या नोकरीतल्या अनुभवाचा (म्हणजेच ओळखी पाळखींचा) त्या उद्योगसमूहाला फायदा करून द्यायचा आणि त्याच्या बदल्यात आपलाही फायदा करून घ्यायचा की नाही? पण ते करायच्या ऐवजी हे महाशय सांस्कृतिक महोत्सव घडवतात. ठीक आहे, मी म्हणतो असते एखाद्याला सांस्कृतिक कार्याची आवड. पण ते करतानाही माणसाने काय करावं? एखाद्या मोठ्या सांस्कृतिक संस्थेचं थेट डायरेक्टर होऊन जावं, मोठमोठ्या कलाकारांच्या संगतीत वावरावं, राष्ट्रपती वगैरेंना बोलवावं, मोठमोठ्या रकमांची तिकिटं लावता येतील असा काहीतरी कार्यक्रम घडवून आणावा. नावही होतं आणि चार पैसेही सुटतात.

पण त्याच्याऐवजी हे सज्जन अपंगांचा राष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सव घडवत होते. आणि तो भव्य व्हावा म्हणून वयाच्या सत्तराव्या वर्षी एखाद्या पंचविशीच्या तरुणासारखे झटत होते.

पण जनरल साहेबांनी संपूर्ण कार्यक्रमाचं आयोजन मात्र खरोखरच दृष्ट लागावं इतकं सुंदर केलं होतं.

सारा सोहळा आपल्या वरळीच्या नेहरू सेंटरच्या तिप्पट आकाराच्या वास्तूत चालला होता. मी तेथे पोहोचलो तेव्हा कार्यक्रमाच्या उद्घाटनाचा सोहळा संपून गेला होता. स्टेडियमसारख्या त्या जागेत बांधलेल्या तात्पुरत्या ऑफिसमध्ये जनरल साहेबांनी माझं स्वागत केलं आणि मग मला कार्यक्रम दाखवायला सुरुवात केली. आम्ही एकामागोमाग दालनं फिरू लागलो.

पहिल्याच दालनात एक मोठा गायक मोठ्या रंगात येऊन रॉक संगीत गात होता. सगळं वातावरण एका तालाने, ठेक्याने, वाद्यांच्या आवाजाने, त्याच्या सुरांनी भारलं गेलं होतं. आणि त्या ताला-सुरावर जवळ जवळ चार-पाचशे अपंग त्यांना जमेल तसं नाचत होते. प्रश्न ते कसं नाचत होते हा नव्हता. ते देहभान विसरून, आपलं अपंगत्व विसरून नाचत होते. त्यांना नाचावंसं वाटत होतं असं त्या ठिकाणी वातावरण होतं आणि त्यांना मनसोक्त नाचण्यासाठी जनरल साहेबांनी स्टेज उपलब्ध करून दिलं होतं हे महत्त्वाचं होतं. त्यांना नाचावसं वाटावं असं वातावरण त्या गायकाच्या सुरांनी निर्माण केलं होतं. कित्येकांनी त्या गायकाच्या स्वरात आपलाही स्वर मिसळला होता. आपल्या अपंगत्वामुळे ज्यांना नाचणं अगदीच अशक्य होतं ते टाळ्या वाजवून भाग घेत होते. सर्वांनी सणासुदीला घालावेत तसे नवे कपडे घातले होते. स्वत: त्या गायकाने विदुषकासारखा वेष केला होता. तो बहुधा एखादं विनोदी गाणं गात असावा. कारण मधूनच हास्याची जोरदार कारंजी फुटत होती. सारं वातावरण आनंदी, उत्साही आणि चिंता काळजी यापासून मुक्त होतं. माझं लक्ष हॉलच्या कोपऱ्यात व्हील चेअरवर बसलेल्या एका दोन्ही पायांनी पांगळ्या असलेल्या अपंगाकडे गेलं. एक मुलगी त्याचे दोन हात आपल्या हातात घेऊन वाद्यांच्या तालावर ते नाचवत होती आणि त्याला नाचल्याचा आनंद देत होती.

आम्ही हॉलमध्ये प्रवेश केल्यावर कोणीतरी स्टेजवर जाऊन ती बातमी त्या गायकाला सांगितली. आपलं गाणं मध्येच थांबवून त्याने ती बातमी सर्वांना सांगितली. त्याच्या बोलण्यातलं एक अक्षरही कळलं नाही फक्त 'इंडिया' हा शब्द समजला आणि त्या नंतरच्या टाळ्या समजल्या. मी त्या स्वागताने भारावून गेलो.

मी आयुष्यात कधी नाचलो नाही पण त्या दिवशी जर एखाद्या अपंग मुलीने हात पुढे केला असता तर नक्की नाचलो असतो याबद्दल मला शंका वाटत नाही. ते वातावरणच तसं होतं. आणि जी गोष्ट त्या

नाचाच्या हॉलची तीच शेजारच्या हॉलमध्ये चाललेल्या नाटकाची. हे नाटक बहिऱ्या आणि मुक्या मुलांसाठी होतं. प्रत्येक 'कानाने बहिरी व्यक्ती मुकी नसते.' हे आपल्या दूरदर्शनवरून हल्ली अनेक वेळा सांगितलं जात असलं तरी अजूनही या दोन बाबतीत अपंग असलेल्या व्यक्ती एकत्रित विचारात घेतल्या जातात हे खरं आहे.

बहिऱ्या आणि मुक्या आणि त्यातून बाल प्रेक्षकांसाठी नाटक लिहिणं आणि समर्थपणे सादर करणं अतिशय कठीण आहे. सगळं कथानक फक्त दृश्य माध्यमाच्या सहाय्याने सादर करायचं. पण ते नाटक इतकं समर्थपणे सादर केलं गेलं की मीही रंगून गेलो. साधं पण अतिशय नव्या विषयावरचं कथानक. एका घरात एक रोबो शिरतो. प्रथम सगळी त्याच्या विचित्र आकाराला घाबरतात. मग अनेक छोट्या-छोट्या घटना घडतात आणि अखेर तो सर्वांचा आवडता होतो. शेवटी तो जायला निघतो. तेव्हा सर्वांना वाईट वाटतं. घरातली छोटी मुलगी त्याला निरोपाचा पुष्पगुच्छ देते आणि तो हात हलवत हलवत विंगमध्ये जातो. अखेर सर्वजण नाचत नाचत, टाळ्या वाजवत विंगेत जातात.

शेवटच्या दालनात अपंगांचं हस्तकला-चित्रकला प्रदर्शन आणि विक्री हा विभाग होता. गावातल्या अपंग नसलेल्या कितीतरी व्यक्ती या प्रदर्शनाला भेट देत होत्या. वस्तू खरेदी करीत होत्या. आपल्या कलेचं कोणी कौतुक केलं तर त्या अपंगांचे चेहरे उजळत होते. ते उजळलेल्या चेहऱ्यांवरचं हास्य सुदृढ माणसांच्या चेहऱ्यावरच्या हास्याइतकच गोड होतं. ते दुर्दैवामुळे शरीराने अपंग झाले होते पण ते मनानं अपंग होऊ नयेत यासाठी जनरल साहेब करत असलेली धडपड वाया जात नव्हती हे त्या चेहऱ्यांवरच्या हास्यात स्पष्ट होत होतं.

'खूप बरं वाटतं हो हा उत्सव आयोजित करताना, आता दोन दिवसांनी हा या वर्षीचा सोहळा संपेल. यातला प्रत्येक अपंग आता पुढल्या वर्षाच्या सोहळ्याची अतिशय आतुरतेने वाट पाहील - आणि खरं सांगायचं तर मीही.' जनरल साहेब म्हणाले.

त्या सगळ्या कार्यक्रमात तीन तास कसे निघून गेले कळलंच नाही. मी जायला निघालो. जनरल साहेब गेटवर मला पोचवायला आले. तेवढ्यात आपली व्हीलचेअर ढकलत ढकलत एक लहान मुलगी पुढे आली आणि तिने माझे दोन्ही हात हातात घेतले. ती डच भाषेत काहीतरी बोलत होती. तिच्या घशात आवंढा दाटून आला होता आणि डोळ्यात पाणी तरारलं होतं. मला काय झालं ते समजत नव्हतं. मी भांबावून गेलो. जनरल साहेबांनी खुलासा केला.

'महाराष्ट्रातल्या भीषण भूकंपाची दृश्यं सी.एन.एन. वर पाहिली आणि मी पांगळी असल्याचं खरं दु:ख मला झालं. मी ही अशी नसते ना, तर आता तुमच्या देशात भूकंपग्रस्तांच्या मदतीला धावले असते.' ती सांगत होती.

हे ऐकलं आणि मी उभा थरारलो. तो क्षण मला खूप काही देऊन गेला, श्रीमंत करून गेला.

# मुक्काम पोस्ट रॉटरडॅम

कायद्याचा अभ्यासक म्हणून हॉलंडमध्ये माझ्या काही महत्त्वाच्या स्थळांना आणि व्यक्तींशी गाठीभेटी ठरलेल्या होत्या. त्यात हेगमधील आंतरराष्ट्रीय कोर्टाला भेट आणि रॉटरडॅम बंदराच्या पोर्ट ट्रस्टच्या कायदाविषयक सल्लागारांशी बातचीत या प्रमुख होत्या. आंतरराष्ट्रीय कोर्टाची भेट ही इमारतीची भेट ठरली. कारण मी तिथे होतो तेव्हा कोर्ट बंद होतं. पोर्ट ट्रस्टच्या सल्लागारांशी मात्र आंतरराष्ट्रीय सागरी कायद्याच्या काही महत्त्वाच्या तरतुदींसंबधी चांगली तासभर चर्चा झाली. चर्चा संपता संपता ते सहज म्हणाले, 'मग काय, आमचं बंदर पाहणार की नाही?'

'अर्थात,' मी म्हटलं. मला बंदर पाहायची इच्छा होतीच. रॉटरडॅम हे जगातील सर्वात मोठ्या चार-पाच बंदरांपैकी एक बंदर आहे असं ऐकून होतो. सहा देशातून वहात येणारी ऱ्हाईन नदी रॉटरडॅमपाशी उत्तर समुद्राला मिळते. ही नदी म्हणजे मालाची प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाहातूक करणारा युरोपचा एक निसर्गनिर्मित द्रव हमरस्ताच आहे.

मला अगदी थाटात बंदर पाहता आलं. कारण खास पाहुण्यांना बंदर दाखवण्यासाठी असलेली पोर्ट ट्रस्टच्या मालकीची एक छोटीशी लॉंचच त्या दिवशी माझ्यासाठी पाण्यात उतरवण्यात आली. सुदैवाने लॉंचचा कप्तानही बडबड्या निघाला.


'रॉटरडॅम बंदर बेचाळीस किलोमीटर्सपर्यंत आत पसरलेलं आहे.' विविध डॉक्सच्या बाजूनं मला फिरवताना कप्तान सांगत होता. मी पहात होतो. निरनिराळ्या देशांच्या कितीतरी प्रचंड बोटी तेथे नांगरून पडल्या होत्या. प्रत्येक बोटीवर त्या त्या देशाचा झेंडा फडकत होता. एखाद्या आंतरराष्ट्रीय परिषदेला विविध देशांचे प्रतिनिधी आलेले असावेत, त्यांच्या प्रत्येकाच्या टेबलावर त्यांच्या-त्यांच्या देशाचा झेंडा लावलेला असावा, तसं स्वरूप होतं.

'या बंदरातून दरवर्षी पंधरा कोटी टनांपेक्षा जास्त मालाची चढउतार होते - म्हणजे दर सेकंदाला सुमारे चार ते पाच टन, असं वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस आणि दिवसाचे चोवीस तास!' कप्तान सांगत होता. आणि मला ते दिसतच होतं. डॉक्समधून अव्याहतपणे प्रचंड क्रेन्सचे यांत्रिक हात आकाशात उंच उभारले जात होते, क्षणभर त्यांचे बळकट पंजे बोटींमधल्या मोठमोठ्या पेटाऱ्यांवर विसावत होते, पकड घट्ट होत होती. क्रेन्स माना वळवत होत्या. झोका खाल्ल्यासारखे पेटारे बोटीच्या पोटातून उचलले जात होते आणि बाजूच्या छोट्या बोटीत किंवा ट्रक्समध्ये बसून युरोपच्या पुढच्या प्रवासाला निघत होते. माल जवळजवळ धक्क्यांवर उतरतच नव्हता.

'आम्ही दर सतराव्या मिनिटाला एक जहाज रिकामं करतो. हो! बंदरावर माल उतरून घेऊन मग सावकाश लॉरीमध्ये भरण्याइतकी सवड आहे कोणाला?' कप्तान सांगत होता.

दिसतच होतं - वारुळात मुंग्यांचं काम ज्या पद्धतशीरपणे चाललेलं असतं, तसं तिथे माणूस आणि मशीन्स यांचं एकमेकांशी संपूर्ण तादात्म्य होऊन काम चाललं होतं.

नेहमीच्या सर्वसाधारण प्रवासात न येणारा आणि मला माझ्या विशिष्ट प्रकारे आयोजित केल्या गेलेल्या दौऱ्यामुळेच केवळ मिळालेला हा आणखी एक अनुभव.



*पोर्ट ऑफ रॉटरडॅम*

प्रवासाला निघण्यापूर्वी केलेल्या अभ्यासावरून कळलं होतं की नेदरलँडमध्ये वृध्दांची खास करून खूपच चांगली काळजी घेतली जाते. नेदरलँड हा आधीच अतिशय छोटासा देश. आजही त्या संपूर्ण देशाची लोकवस्ती जेमतेम दोन मुंबई शहरांएवढी आहे. पन्नास वर्षांपूर्वी दुसऱ्या महायुद्धाच्या सुमारास तर ती याहूनही कमी असावी. युद्धात देशाचं आर्थिक नुकसान तर झालंच पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे अख्खी तरूण पिढी कापली गेली. राहता राहिली म्हातारी कोतारी माणसं. युरोपच्या अनेक देशात युद्धाच्या अखेरीस असंच चित्र जाणवलं असलं तरी नेदरलँडमध्ये ते अधिकच विदारक होतं.

पण युद्धानंतर या देशाने त्या वृध्दांची चांगली काळजी घेतली. किंबहुना तेव्हापासून नेदरलँडचे वृध्दाश्रम जगाच्या कौतुकाचा विषय झाले. मला असा वृध्दाश्रम बघायची, त्यात राहणाऱ्या वृध्दांना भेटायची इच्छा होती. कीथनी तशी एक संधी मला दिली.

श्रीमती मोलेन नावाच्या एका सत्तावन्न वर्ष वयाच्या बाई मला वृध्दाश्रमात घेऊन गेल्या.

''आमच्या देशात माझ्या वयाच्या व्यक्तीला वृध्द म्हणत नाहीत हो... मी सत्तावन्न वर्षांची तरुण स्त्री आहे असं म्हटलं पाहिजे. कारण तुमच्या देशात साठ टक्क्यांहून अधिक व्यक्ती चाळीसपेक्षा कमी वयाच्या आहेत. आमच्याकडे साठ टक्क्यांहून अधिक व्यक्ती पन्नाशीच्या पुढल्या आहेत. त्या दृष्टीने पाहिलं तर तुमच्या देशासारखे अप्रगत देशच लोकसंख्येचं सरासरी वय लक्षात घेतलं तर 'तरुण' देश आहेत. युरोप आता म्हातारं झालंय.''

उत्कृष्ट वैद्यकीय सेवा उपलब्ध असलेल्या आणि त्यामुळे आयुर्मर्यादेत वाढ झालेल्या आणि लोकसंख्या नियंत्रित करण्यात

आलेल्या समाजाची प्रतिनिधी हे बोलत होती! मात्र त्या समाजात समृद्धी एवढी होती की तिथे एकेका वृध्दाला त्याने केवळ वयाची विशिष्ट मर्यादा गाठली म्हणून दरमहा सुमारे ३५००० ते ३७००० रुपये एवढं पेन्शन सरकारकडून मिळत होतं. त्या काळात एवढा पगार रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनाही मिळत नव्हता.

एक परदेशी पाहुणा आपल्याला भेटायला आला आहे याचं त्या संस्थेतील वृध्दांना अप्रूप वाटलं. मी एका वृध्दापाशी त्याच्या कुटुंबाची चौकशी केली. त्याला दोन मुलगे होते. दोघेही त्याच शहरात राहत होते. त्यांना मुलंबाळं होती - पण हा त्यांच्यापैकी कोणाकडे राहत नव्हता. त्याची पत्नी होती तोपर्यंत दोघं म्हातारा-म्हातारी एकमेकांना सांभाळून राहत होती. पत्नी वारल्यावर त्याने वृध्दाश्रमाचा रस्ता सुधारला होता.

''तुम्ही नातवंडांना, मुला-सुनेला भेटायला जाता? - किंवा ती तुम्हाला इथे भेटायला येतात?''

''हो भेटतात अधूनमधून,'' त्याने सांगितलं.

''माझ्या देशात अजूनही वृध्द आई-वडील आपल्या मुलांच्या घरी राहतात,'' असं मी म्हणताच आपलं काय हरवलं आहे याची जणू त्या वृध्दाला जाणीव झाली.

हळूहळू सर्वांनीच माझ्याभोवती कोंडाळं केलं. कारण माझं ते वाक्य सर्वांनीच ऐकलं होतं. सर्वांनाच माझ्या बोलण्याचं कौतुक वाटलं होतं.

''माझ्या भाषेत वृध्दापकाळाला दुसरं बालपण म्हणतात. दोन पिढ्यांमध्ये नेहमीच जाणवणाऱ्या फरकामुळे - जनरेशन गॅपमुळे - कदाचित तुमचं तुमच्या नंतरच्या पिढीशी पटत नसेलही पण या वयात तुमचं त्या नंतरच्या म्हणजे नातवंडांच्या पिढीशी नक्कीच पटेल. आजोबा आजीचे दात पडल्यामुळे आणि नातवंडांना दात अजून न फुटल्यामुळे दोघांनाही बोबडं बोलावं लागतं की नाही?''

माझ्या तोंडचं हे वाक्य ऐकताच एका म्हातारीने डोळे पुसले - आणि मला जाणवलं, मानवाच्या भावनिक गरजा सर्वत्र सारख्याच आहेत.

त्या म्हातारीच्या डोळ्यांतले अश्रू पाहून मला अल्बेर काम्यू या एका जगप्रसिद्ध अल्जेरियन लेखकाच्या ''आऊटसाईडर'' या जगप्रसिद्ध कादंबरीतील पहिलंच वाक्य आठवलं. त्या कादंबरीतील निवेदकाची आई अशीच वृध्दाश्रमात राहत असते. एके दिवशी त्या वृध्दाश्रमाच्या संचालकाची, आई वारल्याबद्दल तार येते आणि तो निवेदनात लिहितो - ''मदर डाईड यस्टरडे ऑर मे बी डे बिफोर यस्टरडे.'' या निवेदनातील थंडगार अलिप्तपणाने किंवा खरं तर कॅज्युअलपणाने माझ्या मनावर त्यावेळी जबरदस्त आघात केलेला होता. - आणि आता आज मी त्या निवेदकाच्या आईसारख्याच अवस्थेत असलेले कितीतरी आई-बाप प्रत्यक्ष पाहत होतो. अगदी लहान मुलांसारखीच वृध्द मंडळीही विभक्त कुटुंबांमुळे प्रेमाला मुकतात हे किती खरं आहे! वृध्दाश्रमातील राहण्याच्या जागांमध्ये प्रत्येकाला अगदी टी.व्ही., फ्रीजपासून सगळं फर्निचर संस्थेतर्फे मोफत दिलं गेलेलं होतं. सगळी समृद्धी असली तरी त्या वृध्दांना नातवंडांचा स्पर्श मिळत नव्हता. आणि मी त्याची जाणीव करून दिल्यावर त्यांच्या हृदयात कुठेतरी लकलकलं होतं हे मला स्वच्छ दिसत होतं.

त्या क्षणी मी त्या वृध्दांचा दोस्तच होऊन गेलो. प्रत्येकजण मला मोठ्या उत्साहाने आपल्या खोलीवर चहा, बीअर प्यायला यायचा आग्रह करू लागला.

मी कॅथ मीडर नावाच्या एका वृध्देच्या खोलीवर गेलो. ती ८५ वर्षांची होती पण तब्येतीने अजून चांगली टुणटुणीत होती.

''या खोलीत जे जे जमिनीवर अंथरलेलं आहे किंवा भिंतीवर टांगलेलं आहे ते सर्व मी स्वत: बनविलेलं आहे - या माझ्या हातांनी!'' म्हातारीने मला मोठ्या अभिमानाने सांगितलं.

कॅथबाईची खोली खरोखर दृष्ट लागावी एवढी स्वच्छ, सुंदर आणि रसिकतेने सजवलेली होती. जमिनीवरच्या नक्षीदार सतरंजीपासून भिंतीवरच्या गालिचेवजा भरतकामापासून ते पेंटिंग्जपर्यंत सगळं सगळं कॅथबाईंने स्वत: केलं होतं. ती खरोखरच एक उत्कृष्ट कलाकार होती.

फक्त आयुष्यात तिच्या कलेचं चीज झालं नव्हतं. तिला आपलं असं कोणीच नव्हतं.

लहानपणीच कॅथबाई पोरकी झाली होती आणि म्हणून तिचं बालपण अनाथाश्रमात गेलं होतं. शिक्षण धड न झाल्यामुळे कोठे चांगली नोकरीही मिळाली नव्हती. 'घरगुती नोकर' म्हणून तिने काही श्रीमंत कुटुंबात नोकरी केली होती. त्यातल्याच एका घरमालकिणीचं बघून बघून ती या विविध कला शिकली होती आणि आता आयुष्याच्या अखेरीस वृध्दाश्रमात येऊन राहिली होती. बालपणी आई-बापाचं कौतुक मिळालं नाही की बहीण-भावंडाचं सुख नाही. मोठेपणी नवरा किंवा मुलाबाळांचं प्रेम आणि माया नाही - कॅथबाई आयुष्यभर एकटीच होती.

''एकदाच फक्त आयुष्यात एकजण भेटला होता. तो म्हणाला होता, 'कॅथ, तू कोणाही माणसाचं आयुष्य सुखी केलं असतंस - पण त्याने असं म्हणेपर्यंत खूप उशीर झाला होता - एकट्याने राहायची संवय लागून गेली होती.'' हे बोलताना कॅथबाईच्या चेहेऱ्यावर दु:ख दिसत नव्हतं. पण तरीही मला तो चेहरा कसासाच वाटत होता. तो निर्विकार होता. सगळं काही होतं तसं मूकपणे आणि एकाकीपणे सहन करण्यात असतं ते कारुण्य त्या चेहेऱ्यावर साकळलेलं दिसत होतं.

कॅथबाईची केस अनकॉमन म्हणून सोडून दिली तरी आर्थिकदृष्ट्या प्रगत अशा समाजातली मला तिथे आढळलेली वृध्दांची दु:खं कोणालाही विचार करायला लावतील अशीच होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जन्माला आलेल्या संस्कृतीला ऑल्विन टॉफलर ''सुपर इंडस्ट्रियल सिविलायझेशन'' म्हणतो, या औद्योगिक संस्कृतीचं प्रतीक आहे - ''बॉल पेन''. या संस्कृतीत उदयाला आलेल्या उत्पादनांचं वैशिष्टयच असं आहे की या वस्तू दुरुस्त करण्याचा खर्च नव्या वस्तूच्या किंमतीपेक्षा जास्त आहे. म्हणून या युगाचा महामंत्र झालाय, ''वापरा आणि निरुपयोगी झालं की फेकून द्या. हवं तर नवं घ्या. पण जुन्याचा मोह धरू नका.'' जुनं म्हणजेच टाकावू, निरुपयोगी. वास्तविक लिंबाच्या लोणच्यासारख्या काही गोष्टींची जुन्या झाल्यामुळे, मुरल्यामुळे चव वाढते, किंमत वाढते हे मुळी या नव्या संस्कृतीला पटतच नाही. आणि ही संस्कृती हे वस्तूंचं तर्कशास्त्र आता माणसांनाही लावू लागलीय. या आश्रमातला एक वृध्द मला सांगत होता, ''आम्ही म्हातारी माणसं बाजारातून काही नवी वस्तू खरेदी करायलाही घाबरतो. आजच्या या तरूण पिढीतले काहीजण आम्हाला चक्क विचारतात - ''यू वॉंट टू बाय? व्हाय डोण्ट यू डाय?'' उपयुक्ततावादाचं हे विकृत स्वरूप ही त्या वृध्दांची खरी व्यथा होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र. ८२९
२९५०७
प्रा७८८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# डोकं असलेलं घर

नेदरलँडला येण्याचं हे निमंत्रण देण्यापूर्वी या संस्थेचे एक अधिकारी कीथ जेव्हा मला मुंबईत भेटले होते तेव्हा आमच्या विविध विषयांवर गप्पा झाल्या होत्या. त्या गप्पांमध्ये त्यांना मी विज्ञान कथा लिहितो हे सांगितलं होतं. माझ्या त्या छंदाशी सुसंगत असा एक खास कार्यक्रम त्यांनी माझ्यासाठी आयोजित केला होता.

नेदरलँडमधील सुमारे १०० ते १५० विविध कंपन्यांनी एकत्र येऊन 'भविष्यातलं घर आणि भविष्यातलं ऑफिस' अशा नावाचा एक प्रकल्प उभा केला होता. अतिशय वेगाने बदलणाऱ्या आजच्या जगात मानवाच्या गरजा बदलत आहेत आणि त्या गरजा पूर्ण करणारं नवनवीन तंत्रज्ञान उदयाला येत आहे. अशा बदलत्या पार्श्वभूमीवर या कंपन्यांनी एकविसाव्या शतकातील घर आणि ऑफिस कसं असेल याचा अंदाज बांधण्याचा केलेला सामूहिक प्रयत्न म्हणजेच हा प्रकल्प. या प्रकल्पाचं सर्वात महत्त्वाचं वैशिष्ट्य हे की या साऱ्या कंपन्या त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात जे जे काही नवं घडत जातं ते ते ताबडतोब या प्रकल्पात आणून समाविष्ट करीत असतात.

आता साधी भविष्यातल्या घराचीच गोष्ट घेऊ या. या घराच्या म्हणजे खरं तर ते घर वापरणाऱ्या भविष्य काळातील मानवांच्या नेमक्या गरजा काय असतील? घराचा उपयोग कुटुंबाने राहण्याची जागा असाच राहील असं मानलं आणि त्या प्रमाणात भविष्यातही घरात बसायची खोली, स्वैपाकघर, बेडरूम, लहान मुलांसाठी स्वतंत्र खोली, न्हाणी या सगळ्या गोष्टींची गरज राहिली तरी त्यांचं स्वरूप आजच्यासारखंच राहील का? अशा सर्व गोष्टींचा विचार करून बनवली गेलेली ही वास्तू. या प्रकल्पाची संकल्पना क्रिएट टिटचूलर यांची. त्यांना विविध उद्योजकांनी मदतीचा हात दिला.

असं काय आहे या भविष्यातल्या घरात?

अलिबाबाच्या गुहेचे दरवाजे 'तिळा तिळा दार उघड' हा मंत्र म्हटल्यावर उघडायचे. या घराचे दरवाजे विशिष्ट नंबरांचं मॅग्नेटिक कार्ड जवळ नेलं तर आणि तरच उघडतात.

याच्या छतावर सौरशक्ती गोळा करणारे सेल्स आहेत. छत जरूरीप्रमाणे कमी किंवा जास्त प्रकाश आणि उष्णता गोळा करतं. हवं असेल तेव्हा हे छत कमळाच्या उमलणाऱ्या पाकळ्यांप्रमाणे उघडताही येतं.

हे बांधायला फक्त सहा महिने पुरतात आणि बाहेरची फ्रेम तशीच ठेवली तरी आतल्या भिंती हव्या तशा हलवता येऊन गरजेनुसार खोल्यांचे आकार लहान मोठे करण्याची यात सोय आहे. घराच्या आतल्या भिंती जरूरीप्रमाणे पारदर्शक वा अपारदर्शक करता येतात.

जमीन म्हणून वापरलेल्या लाद्या इतक्या टणक आहेत की अडीच लाख माणसं त्यांच्यावर चालली तरी त्या पाव मिलीमीटरही झिजणार नाहीत याची गॅरंटी.

बेडरूममध्ये दिवा नाही तर या बेडरूममधल्या भिंतीच हव्या तेव्हा प्रकाशमान करता येतात.

किचनमधल्या ओटद्याची उंची काम करणाऱ्या स्त्रीच्या उंचीनुसार कमीजास्त करता येते. तेथे असलेल्या कॉम्प्युटरच्या टर्मिनलवर गृहिणीला घरात विविध पदार्थांचा किती स्टॉक आहे, त्यांचे आजचे लेटेस्ट बाजारभाव काय आहेत यांची माहिती मिळत होती. अन् तिला एखादी वस्तू हवी असेल तर तिला त्या वस्तूची किचनमधून थेट सुपर स्टोअरला ऑर्डर देता येत होती कारण हा कॉम्प्युटर सुपर स्टोअरच्या कॉम्प्युटरला जोडला होता. या शिवाय याच टर्मिनलवर विविध खाद्यपदार्थांच्या कृतीही नोंदलेल्या असतील. एक किलोच्या मटणात मसाला किती घालायचा हे लक्षात ठेवायची गरज नव्हती. फटकन कॉम्प्युटर तिला ते सांगत होता. या किचनमधल्या सुऱ्या सिरॅमिकच्या होत्या - त्या गंजणारही नव्हत्या की त्यांना धारही लावावी लागणार नव्हती.

हे घर 'इंटेलिजंट' घर होतं. म्हणजे शॉर्ट सर्किट वगैरे होऊन दुर्दैवाने या घरात कुठे आग वगैरे लागली असती तर घरातल्या माणसांना कळायच्या आधीच ते कॉम्प्युटरला कळेल अशी सोय होती. ताबडतोब, आपोआप मेन इलेक्ट्रिक कनेक्शन बंद केलं जाईल, फायर ब्रिगेडला संदेश जाईल, गॅसचा पुरवठा तोडला जाईल आणि घराची खिडक्या-दारं सताड उघडली जातील अशीही सोय होती. आग वगैरे लागेल तेव्हाच हे घर हुषारीने वागेल असं नाही. एरवीच्या वेळीही घरातलं तापमान, आर्द्रता ही सगळी बाहेरच्या तापमानाच्या प्रमाणात कायम बदलत ठेवून घर चोवीस तास सुखद ठेवलं जाईल अशीही सोय होती. घरात एक 'वर्क प्लेस' होती. तिथला कॉम्प्यूटर थेट भविष्यातल्या ऑफिसातल्या कॉम्प्यूटरला जोडलेला होता.

एक ना दोन. आधुनिक 'सुखसोयीं'ची घरात रेलचेल असेल.

घराचा अनुभव घेऊन मी मग 'भविष्यातल्या' ऑफिसात गेलो.

भविष्यातलं ऑफिसही भविष्यातल्या घरासारखंच 'इंटेलिजंट' इमारतीत होतं. अंतराळातल्या एका उपग्रहाद्वारे ते जरूरीप्रमाणे साऱ्या जगाशी किंवा जगातल्या कोणत्याही ठिकाणाशी अगदी समुद्रावर तरंगणाऱ्या जहाजाशीही जोडता येईल अशी त्याला सुविधा होती. व्हिडीओ कॉन्फरन्सची सोय होती. व्हिडीओ फोनच्या टर्मिनलवरून मी भविष्यातल्या घरातल्या एका कर्मचाऱ्याशी बोललो सुद्धा! फोनशेजारच्या टीव्हीच्या पडद्यावर मला ती कर्मचारी मुलगी दिसत होती आणि तिलाही मी तसाच घरातल्या व्हिडीओ फोनवर दिसत होतो.

भविष्यातल्या ऑफिसचं सगळं रेकॉर्ड कॉम्प्युटरच्या स्मृतिकोषात बंदिस्त केलेलं होतं. आणि म्हणूनच हवा तो रेफरन्स क्षणार्धात मिळतही होता.

ऑफिसातल्या लायब्ररीतलं कोणतंही पुस्तक वाचण्यासाठी मला माझी जागा सोडून तसूभरही हलावं लागणार नव्हतं. लायब्ररीतील कोणत्याही पुस्तकातलं कोणतंही पान मला माझ्या कॉम्प्यूटरच्या पडद्यावर घेता येत होतं. इतकंच नव्हे तर मला त्याची कॉपीही काढता येणं शक्य होतं. अगदी रंगीत स्वरूपात. अशा व्हिडीओ कॉपी प्रोसेसरवर मी स्वत: लायब्ररीत असलेल्या एका पुस्तकातील व्हेन गॉग या चित्रकाराच्या चित्राची कॉपी घेऊन पाहिली.

अशा प्रकारचा व्हिडीओ प्रोसेसर वृत्तपत्राच्या कचेरीतल्या फोटोग्राफरच्या कॅमेऱ्याशी थेट जोडलेला असेल तर?

तर एखादी घटना प्रत्यक्ष घडत असताना तो जे फोटो घेईल ते

थेट तसे वृत्तपत्राच्या कचेरीत नाही उमटणार? भविष्यातल्या ऑफिसात हेही शक्य होतं! तिथल्या एका कर्मचाऱ्याने असा माझा स्वत:चा एक फोटो कॉम्प्युटरवर चालू असलेल्या मॅटरमध्ये ताबडतोब छापून मला दाखवला.

भविष्यातल्या ऑफिसात काम करणाऱ्या व्यक्तीला त्याच्या कारमधून त्याच्या घराशी आणि ऑफिसशी संपर्क ठेवता येईल. अशा प्रकारची एक कारही या प्रकल्पात तयार केलेली आहे. ही कार पेट्रोलऐवजी छतात असलेल्या सौर बॅटऱ्यांवर चालेल अशीही सोय होती.

जवळजवळ दिवसभर मी ही भविष्यातली रूपं पाहत होतो. विज्ञान कथांच्या विश्वात प्रत्यक्ष प्रवेश केल्यासारखी माझी स्थिती झाली होती. मला हे सर्व दाखविणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आभार मानून आणि तिथल्या व्हिजिटर्स बुकात ठराविक ठशाचा कौतुकाचा अभिप्राय नोंदवून मी जेव्हा त्या इमारतीतून बाहेर पडलो तेव्हा सूर्य अस्ताला जात होता. पाठीमागून सूर्याचे किरण त्या भविष्यातल्या घराच्या व ऑफिसच्या इमारतीवर पडले होते. आणि आजूबाजूला काळोख दाटू लागला होता. मी पाठमोरा होऊन पुन्हा एकदा त्या इमारतींकडे पाहिलं आणि क्षणभर मला ते सगळं दृश्य स्वप्नवत, असत्य - आभासमय - वाटू लागलं.

वास्तविक मी पाहिलं त्यात खोटं काही नव्हतं. पण मला तो सगळा तंत्रज्ञानाचा अतिरेक वाटू लागला. पृथ्वीवरच्या माणसाला सुखी होण्यासाठी असल्या घरांची आणि ऑफिसांची खरंच गरज आहे का या प्रश्नाला 'हो' असं ठाम होकारार्थी उत्तर द्यायला माझं मन सहज तयार होईना. या संदर्भात मला आमच्या घरी टांगलेलं आमचं सर्वांचं आवडतं एक भित्तीचित्र आठवलं. त्या चित्रात छोट्याशा झऱ्याकाठी असलेलं एक लाकडाचं केबिनवजा घर दाखवलेलं आहे. शेजारी फरची दोन झाडं आहेत. चित्रावर लिहिलेलं आहे - 'अ हाऊस इज बिल्ट बाय हँडस्, बट अ होम इज बिल्ट बाय हार्ट्स'.

हॉलंडमधल्याच नव्हे, एकूणच युरोपात दिसणाऱ्या एका दृश्याने आमच्या मनाला जबरदस्त चटका दिला होता. तेथे वर्ष-दीड वर्षाच्या, स्वतंत्रपणे दुडूदुडू चालू शकतील अशा मुलांना जेव्हा त्यांच्या आया रस्त्याने चालवत असत तेव्हा त्यातल्या बऱ्याच स्त्रियांनी त्या मुलांच्या गळ्यात कुत्र्यासारखा पट्टा बांधलेला आम्हाला पाहायला मिळालेला होता. त्याहून लहान वयाच्या मुलांना या स्त्रिया बाबा गाडीतून फिरवीत होत्या. वास्तविक या वयात मुलांना मायेच्या स्पर्शाची जास्त गरज असते. त्यांची भावनिक आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या स्पर्शाचं फार महत्त्व असतं. पण प्रत्यक्ष आपल्या पोटच्या गोळ्याला स्वत:च्या शरीराची, मायेची ऊब नाकारणाऱ्या समाजाचं नुसतं अधिकाधिक तंत्रज्ञानाच्या पाठीमागे धावत राहण्यात काहीतरी चुकत तर नाहीये ? तंत्रज्ञान हवं, पण ते मिळवता मिळवता काही मानवी मूल्यंही त्याच्याबरोबर टिकवायला हवीत ती विसरली तर जात नाहियेत ? तसं होत असेल तर 'हाऊसेस' खूप अद्ययावत होत जातील पण 'होम्स' मात्र उत्तरोत्तर दुर्मिळ होत जातील.

# ॲन फ्रँकच्या घरात

**ने**दरलँडला मी भविष्यातलं ऑफिस आणि घर पाहिलं तशीच एक भूतकाळातली वास्तू पाहिली. किंबहुना ॲमस्टरडॅमला येणारा प्रत्येक प्रवासी विशेषत: युरोपियन प्रवासी श्रद्धेने एखाद्या धार्मिक स्थळाला भेट द्यावी तशी या वास्तूला भेट देतो.

वास्तविक या वास्तूत बघण्यासारखं काही नाही. खरंच काही नाही. ती वास्तू एखाद्या राजाचा राजवाडा नाही की ते एखादं मंदिर नाही. या वास्तूला भव्यता नाही की सौंदर्य नाही. या वास्तूशी एखाद्या थोर विभूतीचं नावही जोडलं गेलेलं नाही की या वास्तूत एखाद्या महत्त्वाचा प्रसंग घडलेला नाही. तरीही या वास्तूला दरवर्षी सुमारे पाच लाख लोक भेट देतात. या वास्तूत तुमच्या माझ्यासारखा एक मध्यमवर्गीय, कुटुंबवत्सल माणूस पन्नास वर्षांपूर्वी राहत होता. त्याच्या कुटुंबात त्याची पत्नी आणि दोन मुली राहत होत्या. त्याच्या धाकट्या मुलीचं नाव होतं - ॲन. होय हेच ते ॲन फ्रँकचं घर.

ॲन फ्रँकचं घर हे विसाव्या शतकातल्या मानवाचं एक तीर्थक्षेत्र आहे. तीर्थक्षेत्री जाऊन पापक्षालन करायचं असतं. या शतकातल्या मानवाच्या हातून घडलेल्या पापाची इथे जाऊन प्रत्येक सुबुद्ध माणसाने आठवण करायची असते आणि पुन्हा तसं पाप घडू दिलं जाणार नाही अशी जणू प्रतिज्ञा करायची असते, शपथ घ्यायची असते. हे घर अगदी अलीकडेच मानवाच्या इतिहासात मानवतेला काळिमा लावणाऱ्या घटनेची आठवण करून देतं आणि तिथलं वातावरण जणू मनाचं विरेचन करतं, मलीन झालेलं मन पुन्हा एकदा पवित्र करतं.

फ्रँक कुटुंब ज्यू होतं. हिटलरच्या नाझी तत्वज्ञानाप्रमाणे ज्यू म्हणून जन्माला येणं हे एक पाप होतं. गुन्हा होता आणि तो या कुटुंबाने केला होता. १९४० साली हिटलरने नेदरलँडवर कब्जा केला आणि लवकरच तेथील ज्यूंच्या छळाला प्रारंभ झाला. ज्यूंवर एकामागोमाग असे आणि इतके निर्बंध घातले जाऊ लागले की त्यांना जगणं कठीण झालं. या छळापासून सुटण्याचा एकच उपाय होता - भूमिगत होणं. फ्रँक कुटुंब या घरात भूमिगत होऊन लपून राहिलं. ॲन त्यावेळी फक्त तेरा वर्षांची होती.

तेरा वर्षांचं वय म्हणजे वास्तविक खेळा-बागडायचं, शाळेत-सहलीला जायचं, स्वप्न पाहायचं, आईपाशी हट्ट करायचं आणि लाड पुरवून घ्यायचं वय. त्या वयात ॲनला स्वत:च्याच घरात बंदी व्हावं लागलं, दिवाभीताचं जीवन जगावं लागलं. मित्र-मैत्रिणींशी संबंध ठेवणं शक्य नव्हतं. केव्हाही पकडले जाऊन कॉन्संट्रेशन कँपमध्ये म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यात रवानगी केली जाईल अशी भीती होती. अशा, मृत्यूची भयाण काळी सावली पडलेल्या अवस्थेत ॲनने मनाला विरंगुळा म्हणून अखेर डायरी लिहायला सुरुवात केली. जे कोणाशी

तरी बोलावंसं वाटत होतं पण जे अशा भयाण राजकीय अवस्थेत बोलणं शक्य नव्हतं ते त्या कोवळ्या जीवाने अखेर लिहून ठेवायला सुरुवात केली.

ज्या भयग्रस्त वातावरणात ॲनला आयुष्य घालवावं लागलं त्याचं तिच्या डायरीतलं वर्णन अंगावर काटा आणेल असं आहे. रोज रात्री झोपताना आपण आज ओळखले गेलो नाही याबद्दल देवाचे आभार मानायचे आणि उद्याच्या दिवसासाठी प्रार्थना करायची. आज ही व्यक्ती पकडली गेली. उद्या त्याला उचलून नेलं अशा रोज बातम्या यायच्या. अशा वातावरणातही ॲनने वेळोवेळी स्वत:च्या भावी आयुष्याबद्दल, इतकंच नव्हे मानवाबद्दल जो आशावाद व्यक्त केला आहे तो वाचून तिचं कौतुक वाटतं.

दुर्दैवाने अखेर एके दिवशी ॲनच्या कुटुंबाचा जर्मनांना ठावठिकाणा लागलाच. ॲनच्या कुटुंबाची एका कॉन्संट्रेशन कँपमध्ये रवानगी झाली आणि १९४५ मध्ये ॲन, तिची बहीण आणि आई या तिघींचा तिथेच दु:खद अंत झाला. पुढल्या केवळ काही आठवड्यांतच दोस्त सैन्याच्या फौजांनी त्या कॉन्संट्रेशन कँपमधील ज्यूंची मुक्तता केली. - वाचले होते फक्त ॲनचे वडील. त्यांना ही ॲनची डायरी मिळाली आणि त्यांनीच ती नंतर प्रसिद्ध केली.


ॲनच्या डायरीने मानवतेलाच खडबडून जागं केलं. मानवाच्या सदसद्विवेकबुद्धीला तिने कायमची टोचणी लावली.

ज्या व्यक्तीने ॲनची डायरी वाचलेली असेल त्या प्रत्येकाला घरातून फिरताना त्यातला एकेक प्रसंग आठवू लागतो आणि मनाला घरं पाडत जातो. ज्या व्यक्तीने ते पुस्तक वाचलेलं नसेल त्यांच्यासाठी घरात शिरल्याबरोबर पहिल्या छोट्याशा व्हरांडावजा खोलीत ॲनच्या जीवनावर आधारित एक लघुपट दाखविला जातो आणि मगच आपली घराची फेरी सुरू होते. त्या बारा-तेरा वर्षाच्या निरागस, निष्पाप मुलीने भिंतीवर लावून ठेवलेली चित्रं पाहून, तिची उंची दिवसेंदिवस कशी वाढते हे कळावं म्हणून तिच्या आईने भिंतीवर तिच्या उंचीवर मारलेल्या पेन्सिलीच्या रेघा पाहून आणि आपल्या बंद घराच्या खिडकीच्या बाहेर स्वच्छ सूर्यप्रकाश पडतो पण आपण केवळ जन्माने ज्यू आहोत म्हणून आपल्याला तो पाहता येत नाही याची खंत वाटणारं तिच्या डायरीतलं वाक्य वाचून आपलं मन सुन्न होऊन जातं.

ॲमस्टरडॅमला गेल्यावर ॲनचं घर पाहायचं असतं, ते त्या घरात काही पाहण्यासारखं आहे म्हणून नव्हे, तर ते न पाहता आपण गेलो तर आपल्यातल्या 'माणूस'पणाचा अपमान होतो म्हणून! आपल्यातला माणूस जपण्यासाठी आपण अशा ठिकाणी जायचं असतं.

युरोपातील जर्मनीसारखे अगदी कमी किनारा असलेले अगदी थोडे देश सोडले तर बाकी बहुतेक देशांना समुद्रकिनारे आहेत आणि त्यांच्या शतकानुशतकांच्या दर्यावर्दी परंपराही आहेत. नेदरलँड देशही या नियमाला अपवाद नाही. पंधराव्या शतकापासून समुद्रमार्गाने लांब लांबच्या मोहिमा काढून व्यापार आणि त्याच्या पाठोपाठ साम्राज्य स्थापन करणाऱ्या युरोपीय सत्तांमधीलच एक महत्त्वाची सत्ता म्हणजेच हा देश. ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीसारखीच डचांचीही ईस्ट इंडिया कंपनी होती. फक्त तिला इंडियात पाय रोवता आले नाहीत. तिने आपला व्यापार श्रीलंका, जावा, इंडोनेशिया या देशांत वाढवला. इंडोनेशियावर तर डचांचं या शतकातही राज्य होतं.

पंधराव्या शतकातल्या युरोपातल्या या धाडसी दर्यावर्दी नाविकांचं मला लहानपणापासूनच खूप कौतुक वाटत आलेलं आहे. पृथ्वीचा आकार नक्की केवढा आहे, आपल्याला दिसतोय या समुद्राचा पलीकडला किनारा नक्की किती दूर आहे याची काहीही खात्रीशीर माहिती नसताना या दर्यासारंगांनी आपल्या नौका अज्ञातात सोडून दिल्या. ॲम्स्टेल नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या ॲमस्टरडॅम या शहरातूनही त्या काळात असे कितीतरी दर्यावर्दी उत्तर समुद्राच्या पल्याड जायला निघाले. त्यांच्या धाडसी जीवनाशी अविभाज्यपणे निगडित झालेलं एक ऐतिहासिक महत्त्वाचं पण कारुण्याने भरलेलं छोटंसं स्मारक ॲमस्टरडॅममध्ये आहे. त्याचं नाव आहे – 'टॉवर ऑफ टियर्स'. जेव्हा अशा तरुण, धाडसी खलाशांच्या नौका क्षितिजापलीकडे नाहीशा होत त्या दिवसापासून दिवसेंदिवस आणि महिनोंमहिने अशा नाविकांच्या प्रेयसी, बायका, बहिणी आणि आया या दीपस्तंभापाशी प्रतिदिनी गोळा होत आणि त्यांची वाट पाहत, अश्रू ढाळत बसत – ती ही जागा 'टॉवर ऑफ टियर्स'



*ॲमस्टरडॅम मागे पेन्सिल बिल्डिंग*

काहींचे प्रियकर, पती, भाऊ आणि मुलगे परत येत. काहींना मात्र कायमच या स्तंभाच्या पारावर अश्रू ढाळत वाट पाहत बसावं लागे. कारण चिवट आणि अमर असा आशावाद, तो कधीच परत येणार नाही हे सत्य स्वीकारायला तयार होत नसे!

डचांच्या दर्यावर्दी जीवनाशी संबंधित असं आणखी एक प्रेक्षणीय स्थळ म्हणजे 'पॅनोरमा मेस्दांग'. हे दोन-तीन शतकांचं जुनं स्थळ नाही. गेल्या शतकातलंच आहे.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धात हेंड्रिक मेस्दांग नावाचा एक डच चित्रकार होऊन गेला, त्याने निर्माण केलेली ही एक अविस्मरणीय कलाकृती आहे. काही चित्रकार जमिनीवर दिसणाऱ्या निसर्गाची चित्रं काढतात. झाडं, पानं, फुलं, ओढे, नद्या, नाले, ढग, पर्वत हे सारे निसर्गाचे आविष्कार हे त्यांच्या चित्रांचे विषय असतात. अशा चित्रांना इंग्लिशमध्ये लँडस्केप्स असं म्हणतात. लँडस्केपसारखाच ''सीस्केप'' म्हणजे समुद्राची दृश्यं असाही एक निसर्गदृश्याच्या चित्रांचा प्रकार रूढ आहे.

शांत समुद्र, खवळलेला समुद्र, रोरावत पुढे झेपावत येणारं वादळ, समुद्रकिनारे, बोटी, ढग अशी समुद्राशी संबंधित निर्सगाची विविध रूपं या सीस्केप्समध्ये चितारलेली असतात. मेस्दांग त्याच्या काळातला असा एक नावाजलेला समुद्रांची चित्रं काढणारा चित्रकार होता. अनेक वर्षं अशी चित्रं काढल्यावर मात्र त्याला त्या प्रकारची चित्रं काढायचा कंटाळा आला. आणि मग त्याला एक भव्य, दिव्य कल्पना सुचली.

तो हेगच्या समुद्रकिनाऱ्यावर गेला. तिथल्या एका वाळूच्या छोट्याश्या ढिगावर तो उभा राहिला आणि त्याने आजूबाजूला पाहिलं. त्यावेळी त्याला हेगच्या समुद्रकिनाऱ्यावर चारी बाजूला जे दृश्य दिसलं ते त्याने निरनिराळ्या सोळा अँगल्समधून जसं दिसलं तसं स्केचेसच्या स्वरूपात आपल्या स्केचबुकात काढून घेतलं.


आणि घरी येऊन तो, त्याची चित्रकार पत्नी सीना आणि त्याचे काही सहकारी चित्रकार मित्र कामाला लागले. नक्षत्रालय - प्लॅनेटेरियम - जसा एक कॅनव्हासचा प्रचंड घुमट असतो तसा त्यांनी १२० मीटर्स (३९४ फूट) परिघाचा, १४ मीटर (४६ फूट) उंचीचा आणि १६८० मीटर्स (१८००० चौ. फूट) क्षेत्रफळाचा एक भव्य कापडी अर्धगोलाकार घुमट बनवला आणि त्यावर त्या सोळा स्केचेसच्या सहाय्याने मेस्दांगला दिसलेलं त्या दिवशीचं किनाऱ्यावरील दृश्य चित्रबद्ध केलं. एखाद्या तंबूसारखा तो प्रचंड घुमट कोठेही उभारता येत असे. त्याच्या मध्यभागी उभ्या राहाणाऱ्या कोणाही प्रेक्षकाला आपण प्रत्यक्ष हेगच्या किनाऱ्यावरील त्या वाळूच्या ढिगावरच उभे आहोत असं वाटावं इतकी ती स्केचिस् परिणामकारक आणि हुबेहूब होती.

मेस्दांगने ती घुमटाकार भव्य कलाकृती घेऊन त्या काळात युरोपभर दौरे काढले. युरोपभर त्याचं खूप कौतुक झालं. सिनेमा आणि फोटोग्राफी यांच्या शोधापूर्वी एक अख्खं निसर्गदृश्य चिरंतन करण्याचा मेस्दांगचा प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद होता. आज तो मेस्दांगचा तंबू एक कायम स्वरूपाचं प्रदर्शन म्हणून हेगमध्ये ठेवलेला आहे. मेस्दांगची चित्रकला इतक्या उच्च दर्जाची आहे की तंबूत शिरलं की आजही आपल्याला एकदम भूतकाळात गेल्यासारखं वाटू लागतं. बराच वेळ आपण एक चित्र पाहत आहोत हे मनाला पटतच नाही इतका तो सत्याभासाचा (Virtual Reality) प्रकार अप्रतिम उमटला आहे. आपण पॅनोरमामधून बाहेर पडतो ते मनाच्या एका भारावलेल्या अवस्थेतच.

अशीच आणखी एक आपण रंगून जावं अशी ॲमस्टरडॅममधली जागा म्हणजे मदुरोडॅम - मिनी ॲमस्टरडॅम. समजा ॲमस्टरडॅम शहरात एखादा जादूगार आला आणि त्याने शहराच्या मध्यावर आकाशात खूप उंचीवर तरंगत राहून आपली जादूची कांडी संपूर्ण शहरावर फिरवत मंत्र म्हटला -

आजू मंतर - जाजू मंतर - कोल्हा मंतर - फू

आणि त्याच्या जादूने अख्खं शहर एकदम १/५० **आकाराचं** झालं तर कसं दिसेल ? अख्खं शहर म्हणजे अगदी अख्खं हं - म्हणजे शहरातल्या बागा, चर्चेस, राजवाडे, बंदरातल्या डॉक्स, बोटी, विमानतळ, रेल्वे मार्ग, खेळांची स्टेडियम्स - सगळं-सगळं! आणि अशा रीतीने आकाराने लहान झाल्या तरी आगगाड्या धावतच राहिल्या, बंदरात बोटी येतच राहिल्या तर ? आणि शहराच्या त्या त्या भागातले आवाजही येत राहिले तर ? - तर जे तयार होईल त्याचं नाव मदुरोडॅम असं असेल.



वास्तविक असं काही तरी आपणही करतो. चैत्र गौरीपुढली आरास, चौपाटीवर लहानपणी वाळूत बांधलेले किल्ले किंवा गणपतीत अथवा दिवाळीत आपण करतो तसल्या सजावटीचंच हे एक रूप. पण मदुरोडॅममध्ये ते इतक्या नेमकेपणे, इतक्या कलापूर्ण रीतीने, इतक्या सुबकपणे आणि इतक्या भव्य स्केलवर केलेलं आहे की ते ॲमस्टरडॅमचं एक खास टूरिस्ट आकर्षण बनलं आहे. शिवाजी पार्कहून मोठ्या मैदानावर ही गौर कायम मांडून ठेवलेली आहे. संध्याकाळ झाली, काळोख पडला की ही मिनी नगरी छोट्या लुकलुकणाऱ्या दिव्यांनी झगमगून जाते आणि आपण विमानातून खूप उंचीवरून रात्रीच्या वेळी ॲमस्टरडॅम शहर तर पाहत नाही ना असं आपल्याला वाटू लागतं. मदुरोडॅम पाहत असताना आपण लहानतलं लहान मूल होऊन जातो. पाचसहा तास कसे निघून जातात कळतही नाही. आपलं वय विसरायला लावणारा हा प्रकार मी प्रथम एकट्याने, मग शशी आल्यावर तिच्याबरोबर असा दोनदा पाहिला आहे. पण अजूनही संधी मिळाली तर मी तिसऱ्यांदा तिथे पहिल्याइतक्याच उत्साहाने रमून जाईन याबद्दल माझ्या मनात बिलकुल शंका नाही.

हॉलंडमध्ये मी सलग अठरा दिवस राहिलो. त्या वास्तव्यातले किती तरी छोटे, छोटे प्रसंग मनात अजून ताजे आहेत. तिथल्या शाळेतल्या मुलांसमोर विज्ञान कथा या वाङमय प्रकारावर दिलेलं भाषण, त्या मुलांनी सुनील गावसकरविषयी कौतुकाने केलेली चौकशी, तिथल्या आर्मीमधल्या स्त्री मेजरच्या हातचा खाल्लेला स्वैपाक. ''तुम्हाला ब्रिटिशांविषयी द्वेष वाटत नाही मग इंडोनेशियन लोकांना मात्र आमच्याविषयी का वाटतो ?'' या प्रश्नाच उत्तर देताना महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाविषयी तिथल्या पार्लमेंटच्या सभापतींशी झालेली चर्चा, काऊ बॉय टाईप पँट घालून पार्लमेंटच्या अधिवेशनाला

आलेली विशी-बाविशीची तरुण एम. पी. मुलगी, तिच्याशी स्त्री मुक्ती आणि तरुण मुलांच्या समस्यांविषयी मारलेल्या गप्पा - अशा कितीतरी गोष्टी नेदरलँड म्हटलं की माझ्या मनात गर्दी करतात. त्या सगळ्यांनाच या लिखाणात न्याय देणं शक्य नाही.

कारण अठरा दिवस झाले आहेत - आता हॉलंडचा मुक्काम हलवायचा आहे. पॅरिसची गाडी वाट पाहतेय.

आणि हो, उशिरा येणं युरोपातल्या गाड्यांना माहीतच नाही.

# पॅरिस... पॅरिस...

**अ**ठरा-वीस दिवसांचा माझा हॉलंडचा मुक्काम संपला होता. आता आम्ही खऱ्या अर्थाने 'टूरिस्ट्स' होणार होतो. युरोपातला पहिलाच संपूर्ण रात्रीचा प्रवास होता म्हणून आम्ही आदल्याच दिवशी रिझर्वेशन चार्जेस भरून रॉटरडॅमहून रात्री साडेअकराच्या सुमारास निघणाऱ्या गाडीवर आमच्या सीट्सही रिझर्व केलेल्या होत्या. सीट्स रिझर्व करणाऱ्या बाईला आम्ही आमचा युरेल पास नुसता दाखवलेला होता. त्यामुळे तिने फक्त रिझर्वेशन चार्जेस घेऊन आमच्या सीट्स कायम केल्या होत्या. आता फक्त युरेलचा पास व्हॅलिडेट करणं बाकी राहिलं होतं. ते प्रवासापूर्वी अर्धा तास केलं की आम्ही पॅरिसच्या गाडीत झोपायला मोकळे होणार होतो.

रात्री ठीक अकरा वाजता कीथने आम्हाला रॉटरडॅम स्टेशनवर आणून सोडलं आणि आमचा निरोप घेऊन तो निघून गेला.

युरेलचा पास विशिष्ट दिवसांच्या मुदतीचा असतो. आमचा सेव्हर पास पंधरा दिवसांचा होता. दिवस रात्री बारापासून मोजायचा असतो. ज्या दिवशी आपण आपला प्रवास सुरू करू, त्या दिवशी त्या पहिल्या ठिकाणच्या स्टेशनवरच्या रेल्वेच्या ऑफिसातून त्या दिवसाची तारीख सही शिक्क्यानिशी मारून त्या पासाची मुदत सुरू करून घेणं याला पास व्हॅलिडेट करणं म्हणतात.

''सर, तुम्ही आजच्याऐवजी उद्या सकाळच्या गाडीने का जात नाही? आताच्या, या रात्री साडेअकराच्या गाडीने गेलात तर मला तुमचा पास आजच्या दिवसासाठी व्हॅलिडेट करावा लागेल आणि फक्त अर्ध्या तासासाठी तुम्ही एक दिवसाचा पास गमवाल!''

''काय हो ? - उगीच एक दिवसाचा पास फुकट का घालवायचा?'' शशी म्हणाली ती शब्द जरी एवढेच बोलली असली तरी त्याचा अर्थ - 'हे तुमच्या आधी लक्षात आलं नव्हतं? - मग कसला तुम्ही केलात अभ्यास?' हे सगळं गृहीत होतं. पण असं होऊ नये याची मी काळजी घेतली होती हे मला पक्कं आठवत होतं.

''छे छे! असं कसं शक्य आहे? प्रवाश्याने प्रवासाची सुरुवात जर रात्री अकरानंतर सुटणाऱ्या गाडीने केली तर रेल्वे अर्ध्या तासाची सवलत प्रवाश्याला देईल आणि त्याचा प्रवास दुसऱ्या दिवसापासून सुरू झाला असं गृहीत धरलं जाईल, असं मला भारतात मिळालेल्या युरेलच्या प्रसिद्धीपत्रकात वाचल्याचं आठवतंय,'' मला खरोखरच असं वाचल्याचं आठवत होतं.

''ती सवलत युरेलच्या फ्लेक्झिपास या प्रकारच्या पासांवर दिली जाते, सेव्हर पासवर नाही. तुमचा सेव्हर पास आहे.''

काऊंटरवरच्या मुलीने नम्रपणे सांगितलं.

आता आली का पंचाईत? ठरविलेल्या रात्रीच्या गाडीने जावं तर पासाचा एक अख्खा दिवस फुकट जात होता. तेरा हजार रुपयांहून

जास्त किंमत मोजून घेतलेल्या पासाची मुदत अशी पंधरावरून चौदा दिवसांवर आणणं म्हणजे जवळजवळ हजार रुपयांचं नुकसान; बरं, पासाचे सगळे पंधरा दिवस वसूल करण्यासाठी दुसऱ्या दिवशी जावं तर आजच्या रात्री राहायचं कुठे ? स्टेशनवर राहणं सुरक्षित नव्हतं. म्हणजे एका रात्रीसाठी हॉटेल करणं आलं. शिवाय रिझर्वेशन चार्जेस हे एका विशिष्ट गाडीतील सीटसाठी भरलेले होते. ते फुकट जाणार होते. ते निराळेच.

''हे बघ, तू पुन्हा चेक करून बघ. हवं तर तुझ्या वरिष्ठांना विचार.'' मी त्या मुलीला सुचवलं. निर्णय लौकरही घेण्याची गरज होती कारण साडेअकराची गाडी सुटायची वेळ जवळ येत होती. त्याहीमुळे हवालदिल व्हायला होत होतं. अगदी 'प्रथमग्रासे मक्षिकापात' व्हायची वेळ आली होती.

माझ्या समाधानासाठी ती मुलगी आपल्या वरिष्ठांना विचारायला गेली. मीही पटापट माझे कागदपत्र उपसून मला भारतात मिळालेलं युरेलचं माहितीपत्रक काढलं.

त्या मुलीने सांगितलेलंच बरोबर होतं. ती विशिष्ट सवलत फक्त फ्लेक्झिपासवाल्यांनाच होती. आता ती मुलगी येऊन काय सांगणार, हे मला समजलं होतं. माझं कमी नुकसान कशात आहे, याचा विचार करायला माझ्या मनाने सुरुवातही केली होती.

''सर, मी चेक केलं. तुम्हाला ती सवलत उपलब्ध नाही,'' मुलीने पुन्हा एकदा नम्रपणे, पण ठामपणे सांगितलं. ''पण मी तुम्हाला एक सुचवू का ? तसं केलंत तर तुमची ही गाडीही जाणार नाही आणि तुम्हाला उद्यापासून पूर्ण पंधरा दिवसही मिळतील. ही गाडी रात्री बारा वाजता ज्या स्टेशनला पोहोचेल, त्या स्टेशनपर्यंतचं तिकीट तुम्ही माझ्याकडून रोख पैसे देऊन घ्या. आणि मी तुमचा पास उद्यापासून त्या स्टेशनापासून सुरू झाला असा इथे तुमच्या तिकिटावर शेरा मारून देते.''

मुलीने सुचवलेला मार्ग मी अनुसरला आणि पुढल्या पाच मिनिटांत गाडीत जाऊन बसलोसुद्धा !

मला आजही या साऱ्या प्रकाराचं कौतुक वाटतं. याला म्हणायचं कस्टमर सर्व्हिस. आम जनतेशी जिथे संबंध येतो, अशा काऊंटरवर काम करण्याच्या संदर्भात त्या डच मुलीचं वागणं आदर्श होतं. पहिली गोष्ट म्हणजे जे काम ती करत होती त्याचं तिला पूर्ण ज्ञान होतं. तरीही मी तिला पुन्हा चेक कर म्हटलं तेव्हा तिने माझ्या मनाची कदर केली होती आणि चेक करण्याचं सौजन्य दाखवलं होतं. त्याच वेळी तिचं मन माझ्या समस्येवर विचारही करत होतं. माझी समस्या ही स्वत:ची समस्या समजून, कोणताही नियम न मोडता, मला कमीत कमी खर्चात पाडून, माझं काहीही नुकसान न होता माझी सर्व सोय होईल असा तोडगा तिने मला सुचवला होता... आणि हे सगळं कपाळावर एकही आठी न आणता. उलट हसतमुखाने तिने मला 'तुमचा प्रवास सुखाचा होवो' असंही म्हटलं होतं आणि ती तितक्याच तत्परतेने पुढल्या गिऱ्हाईकाकडे वळली होती.

अर्थातच, मला पॅरिसच्या गाडीत शांत झोप लागली.

''अहो, उठा. बहुतेक पॅरिस आलेलं दिसतंय. सगळे प्रवासी उतरले आहेत. गाडी रिकामी झालीय,'' मला शशी सांगत होती. डोळे चोळत बाहेर बघितलं. बाहेर एक मोठं स्टेशन आलं होतं. पण स्टेशनचं नाव कुठे दिसत नव्हतं. अखेर ट्रेनच्या कंडक्टरबाबूंनाच विचारलं, ''हे गार द्यु नॉर्द आहे का हो ?''

''वी'' तो म्हणाला.

... आणि मी बॅगा उचलायला सुरुवात केली. आम्ही पॅरिसला पोचलो होतो.

पॅरिसमध्ये पोचण्यापूर्वी आपण पॅरिससंबंधी काहीतरी ऐकलेलं, वाचलेलं असतंच. पॅरिसच्या सौंदर्याची आपल्यापाशी कोणीतरी स्तुती केलेली असते. 'रंगल्या रात्री अशा' असं कोणीतरी लिहिलेलं आपण वाचलेलं असतं. फ्रेंच राज्यक्रांती अगदी दोन परिच्छेदात का होईना, आपल्याला भेटून गेलेली असते. किमान आयफेल टॉवरचं तरी चित्र आपण पाहिलेलं असतं आणि फ्रेंच सेंट्सच्या सुगंध कधी तरी आपल्या नाकात दरवळलेला असतोच. अशा विविध अंगांनी खुणावणाऱ्या पॅरिसला पोचल्यावर पॅरिसचा आस्वाद घ्यायला कुठून सुरुवात करावी हा प्रश्न पडला.

असा प्रश्न पडला की मी त्यावर सोपा उपाय करतो. प्रेक्षणीय स्थळं दाखवणारा नकाशा काढायचा, त्यात जास्तीत जास्त प्रेक्षणीय स्थळं कोणत्या भागात आहेत ते पाहायचं आणि त्या भागाकडे धूम ठोकायची. कितीही मोठं शहर असलं तरी ते आपोआप आपल्यापुढे उलगडत जातं.

आताही पॅरिसचा नकाशा काढला. आणि जाणवलं, सीन नदीच्या काठावर खूप काही पाहण्यासारखं आहे. एका टोकाचं एक महत्त्वाचं ठिकाण निवडलं आणि कूच केली.

## ऑपरेशन नॉत्र देम

११६३ साली बांधायला सुरुवात झालेली आणि तब्बल दोनशे वर्षांनी बांधकाम पूर्ण झालेली ही चर्च गोथिक शैलीच्या बांधकामाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या चर्चनंतर या चर्चच्या बांधकामाची जगातल्या अनेक ठिकाणी चर्चेस बांधताना कॉपी करण्यात आली. या चर्चवर अनेक पुस्तकं लिहिली गेली. ती अनेक कथांचा आणि कवितांचा विषय झाली. अनेक सिनेमांमध्येही तिचा वापर केला गेला.

नॉत्र देम हे एक संगमरवरातलं काव्य आहे. नॉत्र देम भव्य आहे. तिच्या मुख्य गाभाऱ्याचा कळस ११० फूट उंच आहे. तिच्यामध्ये एका वेळी सुमारे नऊ हजार भाविक प्रार्थना करू शकतात. पण आकाराने एवढी मोठी असूनही ती अतिशय नाजुक, कोमल दिसते. कारण ती अखेर 'नॉत्र देम'ची म्हणजेच 'आमच्या पुरंध्री'ची चर्च आहे.

या चर्चच्या बाहेरच्या आणि आतल्या भिंतींवर अप्रतिम चित्रं आहेत. सुंदर कोरीव काम आहे. नक्षी आहे. प्रत्येक खांबावर ख्रिस्ती संतांचे पुतळे आहेत.

येशू ख्रिस्ताच्या जीवनावर आधारित चित्रं आहेत एवढं सांगितलं तर नॉत्र देमचं वर्णन पूर्ण होत नाही. नॉत्र देमच्या चर्चमध्ये विजेच्या दिव्यांच्या प्रकाशाची सोय केलेली नाही. या चर्चच्या उंच सुळक्यांमध्ये असलेल्या तीन भव्य खिडक्यांतून चर्चमध्ये प्रकाश पाझरतो, या खिडक्या जवळजवळ चाळीस-पंचेचाळीस फूट व्यास असलेल्या भव्य, वर्तुळाकृती आहेत. आणि त्यांना रंगीबेरंगी काचांचे तुकडे बसवून त्यात सुंदर कमळासारखं डिझाईन तयार केलेलं आहे. नॉत्र देम अनुभवायचं तर त्या चर्चमधला रंगीत काचांच्या कमळाकृतीतून झिरपलेला गूढ, अंधुक, अगदी ओलसर वाटणारा प्रकाश अनुभवायला मिळावा लागतो.

...आणि त्याच वेळी जर चर्चमधल्या पुरातन ऑर्गनवर प्रार्थनेचे सूर छेडले गेले तर देवळाच्या गाभाऱ्यात उदबत्तीचा सुगंध दरवळल्यासारखा वाटतो. ते स्वर वातावरण एकदम पवित्र करून सोडतात, त्यावेळी मिळणारा अनुभव आध्यात्मिक स्तरावरचा असतो

आणि म्हणूनच तो अविस्मरणीयही असतो.

हा आध्यात्मिक अनुभव घेऊन आम्ही जवळच्याच सीन नदीवरच्या पुलावर आलो. अजून काळोख पडायला बराच वेळ होता. खालून नदीचं पाणी वाहत होतं. नदीच्या दोन्ही बाजूला तीरांवर असंख्य प्रेक्षणीय स्थळांची आरास मांडून ठेवलेली होती. दूर नदी वळत होती तिथे क्षितिजावर आयफेल टॉवरची आकृती रेखाटल्यासारखी दिसत होती. ठरवलं, नदीच्या किनाऱ्याकिनाऱ्याने रेंगाळत रेंगाळत आयफेल टॉवरपर्यंत पोचायला आपल्याला फार वेळ लागणार नाही.

..पण दूरवर दिसणाऱ्या उंच इमारतींचे शेंडे आपल्याला मृगजळासारखेच फसवतात हा शोध लागायला थोडे कष्ट आणि वेळ लागला. अखेर आम्ही बोटीने आयफेल टॉवरपर्यंत जायचं ठरवलं.

बोट सीनच्या संथ पात्रावर तरंगत होती. बोटीवरचा कर्मचारी रनिंग कॉमेंटरी देत होता. ''हा या नदीवरचा सर्वात जुना पूल. हा १५९६ साली बांधला गेला. गंमत म्हणजे या पुलाला पॉट न्यूफ म्हणजे नवा पूल म्हणतात... हा फलाणा पूल १८९० मध्ये रशियन सम्राट तिसरे अलेक्झांडर यांनी फ्रान्सला भेट दिली त्यावेळी बांधण्यात आला. इतिहासात आख्यायिका बनून राहिलेला फ्रान्सचा सम्राट नेपोलियन याची समाधी त्या तिकडे, पलिकडे आहे... हा स्वतंत्रता देवीचा पुतळा पहा. अमेरिकन राज्यक्रांतीनंतर फ्रेंचांनी अमेरिकनांना भेट म्हणून दिलेल्या न्यूयॉर्कच्या बंदरातील स्वतंत्रता देवीचा पुतळा या मॉडेलवरून बनवला गेला...''

माझे कान ती कॉमेंटरी ऐकत होतेही आणि नव्हतेही. मनात विचार येत होते... 'संथ वाहते कृष्णामाई। तीरावरल्या सुखदु:खांची जाणीव तिजला नाही। ही ओळ जगातल्या सगळ्याच कृष्णामाईंच्या बाबतीत किती सार्थ आहे नाही! अगदी आपल्या देशाच्या नजीकच्या भूतकाळात आपल्या डोळ्यांसमोर वावरलेल्या त्या-त्या काळात खूप पॉवरफुल आणि थोर वाटलेल्या व्यक्तीही यमुनामाईच्या तीरावर चिरविश्रांती घेतायत. यमुनामाईला त्याची कुठे जाणीव आहे?

बोट थांबली आणि माझं विचारचक्रही थांबलं. समोर अवाढव्य आकाराचा आयफेल टॉवर उभा होता.

नॉत्र देम आणि आयफेल टॉवर - सीन नदीच्या दोन टोकांवर उभ्या असलेल्या या दोन भव्य वास्तू मानवाच्या दोन प्रवृतींची टोकं होती.

पोलादाच्या १२००० प्रीफॅब्रिकेटेड आकारांना अडीच लाख ठिकाणी रिबिटांनी एकत्र जोडून १८८९ साली पॅरिसमध्ये भरवण्यात आलेल्या जागतिक व्यापारी प्रदर्शनासाठी घाईघाईने बनवण्यात आलेली ही 'टेंपररी' कमान आज फ्रान्सचा एक मानबिंदू ठरलेली आहे. ही कोणा एका सम्राटाच्या विजयाची कमान नाही - हा मानवी तंत्रज्ञानाच्या विजयाचा विजयस्तंभ आहे! टॉवरच्या दोन्ही बाजूला असलेल्या विस्तीर्ण हिरवळीच्या बागांनी त्या कमानीला सुरेख कोंदण केलेलं आहे. दुरून आपण जसजसे टॉवरच्या जवळ जवळ जाऊ लागतो तस तशी त्याची भव्यता, त्याचा प्रचंड आकार आपल्या मनावर दडपण आणू लागतो. आपण क्षुद्र आणि लहान लहान वाटू लागतो.

आयफेल टॉवरमध्ये लिफ्टने तीन निरनिराळ्या उंचींवर जाता येतं. या तिन्ही पातळ्यांवर लिफ्टमधून बाहेर पडून बाहेरचं दृश्य पाहायला उघड्या गॅलरीत येता येतं. आम्ही सर्वात उंचीवरच्या


गॅलरीचं तिकीट काढलं होतं.

आम्ही आयफेल टॉवरच्या टोकावरच्या गॅलरीत बाहेर आलो तेव्हा पूर्ण काळोख पडला होता.

सभोवार दिसणारं दृश्य अजूनही स्मरणात राहिलंय. खाली चारी दिशांना पॅरिस शहर लक्ष लक्ष दिव्यांनी झगमगत होतं. ताऱ्यांनी खचून भरलेलं आकाश खाली उतरल्याचा भास होत होता. वास्तविक रात्रीच्या वेळी कोणत्याही मोठ्या शहरातल्या विमानतळावर विमान उतरत असेल तर मिनिट-दोन मिनिटांसाठी असा दिव्यांचा झगमगाट दिसतो. आणि तो अनुभव मी यापूर्वी सहज शंभरएक वेळा तरी घेतलेला असेल. पण तो अनुभव दोन मिनिटात संपतो. आपले पाय पृथ्वीला लागतात. आपली भावसमाधी भंग पावते. पण आता आयफेल टॉवरवरून खालच्या पॅरिसकडे पाहताना ती स्वप्नावस्था भंगच पावत नव्हती. खालच्या सर्व महत्त्वाच्या संगमरवरी वास्तूंवर प्रकाशझोत टाकलेले असल्यामुळे एवढ्या उंचीवरून त्या अधिकच अपार्थिव वाटत होत्या.

आयफेल टॉवरच्या सर्वात वरच्या पातळीवर एका खोलीत या वास्तूच्या निर्मात्याच्या, म्हणजे गुस्ताव्ह आयफेल यांच्या अभ्यासिकेचं मॉडेल तयार केलेलं आहे. त्यात खुद्द आयफेल जणू आपली टॉवरची संकल्पना त्या काळच्या त्यांच्याच एवढ्या उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या दुसऱ्या व्यक्तिमत्वाला, थॉमस

*एफेल टॉवर*



आल्वा एडिसनला समजावून सांगतायत असं चित्रण केलेले पुतळे आहेत. ते खरे वाटावेत, इतके सुंदर आहेत. मी तर येता येता त्या दोन्ही व्यक्तींना सलाम करूनच खाली उतरलो.

खुद्द आयफेल टॉवरवरही रात्रीच्या वेळी खालून प्रकाशझोत टाकलेले असतात. काही वेळापूर्वी काळोख पडण्यापूर्वी दिसलेला आयफेल टॉवर आणि आताचा काळोखातला आयफेल टॉवर यात जमीन अस्मानाचं अंतर असतं. आता रात्रीच्या प्रकाशात दिसणारा आयफेल टॉवर तुम्हाला भिववीत नाही. तुमच्या अंगावरही येत नाही.

फक्त तो 'स्थित पृथिव्यामिव मानदंड।' असा तुमच्या मनात घर करून राहतो.

आयफेलांच्या प्रतिभेसारखाच!

पॅरिसला आम्ही दोनच दिवस राहणार होतो. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी प्रथम हॉटेल सोडणं, ते सामान स्टेशनवरच्या लॉकरमध्ये नेऊन ठेवणं, त्या रात्रीच्या पुढल्या प्रवासाचं तिकीट रिझर्व करणं अशी बरीच कामं पटापट उरकायची होती. रात्रीच्या गाडीने पुढच्या प्रवासाला निघायचं असेल तर सकाळी हॉटेल सोडून सामान स्टेशनवर नेऊन ठेवण्यात खूपच फायदा होतो. एक दिवसाचं हॉटेलचं भाडं वाचतं. शिवाय सामान स्टेशनातच ठेवलेलं असल्यामुळे गाडी सुटण्याच्या वेळेच्या अगदी पाच मिनिटं आधी

स्टेशनवर पोचलं तरी गाडी चुकणार तर नाही ना, असं टेन्शन नसतं. युरोपात सर्व स्टेशन्सवर ऑटोमॅटिक लॉकर्समध्ये हॉटेलच्या दिवसाच्या आकारापेक्षा खूपच कमी दरात सामान सुरक्षित राहतं.

लांब पल्ल्याच्या गाड्या सुटणारी पॅरिसमध्ये सहा स्टेशनं आहेत. मुंबईत जसं दिल्लीला जाणारी गाडी किती वाजता सुटते एवढं कळून पुरत नाही, तर ती व्ही.टी., दादर, मुंबई सेंट्रल आणि कुर्ला यातील कोणत्या स्टेशनवरून सुटते हे कळणं आवश्यक असतं तशातलाच हा प्रकार आहे. रॉटरडॅमहून आलेली आमची गाडी 'गार द्यु नार्द'ला आली होती आणि झुरिचची गाडी 'गार द्यु लीस्ट' वरून सुटणार होती. दोन्ही स्टेशन तशी एकमेकांपासून फार लांब नव्हती.

आमच्याबरोबर असलेल्या छोट्या ट्रॉलीवर सामान टाकून ती ढकलत ढकलत आम्ही गार द्यु लीस्ट स्टेशनकडे जात होतो. आमच्या समोरच एक चिनी मुलगी अशीच तिचं सामान ढकलत नेताना दिसली. तिची ट्रॉली आमच्या ट्रॉलीपेक्षा अधिक भक्कम वाटली. म्हणून मी तिला विचारलं, ''कुठे घेतलीस ग ही ट्रॉली ?''

''इथे नाही, इटालीत घेतली'' तिने मला सांगितलं आणि मोठ्या अभिमानाने ती पुढे म्हणाली - ''चायनीज आहे.''

मला मोठी गंमत वाटली. मनात आलं, एवढीशी ट्रॉली ती काय आणि ती आमच्या देशाची आहे म्हणून अभिमान तो काय बाळगायचा! असा तोरा मिरवायचा आणि अभिमानाने छाती फुगवायची असेल तर आजच्या प्रत्येक जपानी माणसाची छाती फुगून फुगून फुटून जाईल. जगाच्या कानाकोपऱ्यात सगळ्या महत्त्वाच्या होर्डिंगच्या जागांवर सोनी आणि नॅशनलच्या निऑन साइन्स झळकतायत! एके काळी ब्रिटीश लोक मोठ्या अभिमानाने म्हणत असत, 'आमच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही,' दुसऱ्या महायुद्धात टक्केवारीने सर्वात जास्त मनुष्यहानी झालेला हा चिमुकला देश आज तेच वाक्य थोडंसं बदलून तितक्याच अभिमानाने म्हणू शकेल, 'आमच्या आर्थिक साम्राज्यावर सूर्य मावळत नाही.'

अर्थात मला त्या चिनी मुलीला हसण्याचा काडीमात्र अधिकार नव्हता. जागतिक आर्थिक व्यवहारात माझ्या खंडप्राय देशाला काडीचीही किंमत नव्हती.

# इतिहासाच्या खुणा

**फ्रा**न्सच्या इतिहासात सतराव्या शतकात एक बलाढ्य राजा होऊन गेला. त्याचं नाव चौदावा लुई. त्याने फ्रान्सवर तब्बल बहात्तर वर्षं राज्य केलं. त्याच्या कारकीर्दीत अनेक युद्धं झाली. आणि त्या युद्धात अनेक सैनिक वेळोवेळी जखमी होऊन फ्रान्सला परत आले. या सगळ्या जखमी सैनिकांना आसरा मिळावा म्हणून त्याने एक भव्य वास्तू उभारली. त्या वास्तूचं नावच मुळी 'हॉटेल दास इनवॅलिड्स' म्हणजे 'अपंगाश्रम केंद्र' असं आहे.

आयताची एक छोटी बाजू पुसून टाकली तर जसा आकार होईल तसा इमारतीचा आकार आहे. मात्र इमारतीच्या छोट्या विंगेच्या पाठीमागच्या बाजूला इमारतीचा भाग म्हणूनच एक वास्तू आहे. ही वास्तू म्हणजेच फ्रान्सचा जगज्जेता सम्राट नेपोलियन याची समाधी. वास्तविक ही जागा म्हणजे नेपोलियनची समाधी नव्हे. कारण नेपोलियनला या ठिकाणी पुरलेलं नाही. या जागेला फार फार तर नेपोलियनचं स्मारक म्हटलं पाहिजे. कारण या ठिकाणी त्याचे फक्त अवशेष आणून ठेवलेले आहेत. ते सुद्धा त्याच्या मृत्यूनंतर तब्बल वीस वर्षांनी. जिंकायला जग उरलं नाही म्हणून रडलेला नेपोलियन अखेर सेंट हेलिना बेटावर एकाकी अवस्थेत मेला आणि तिथेच त्याचा मृतदेह पुरला गेला. ज्या सम्राटाच्या विजयी फौजांनी फ्रान्सचं साम्राज्य पश्चिमेला माद्रिदपासून पूर्वेला मॉस्कोपर्यंत फैलावलं, त्या, फ्रान्सवर निरतिशय प्रेम करणाऱ्या फ्रान्सच्या सुपुत्राला मेल्यावर पुरण्यापुरेशी साडेतीन हातांची जागाही नाकारली जावी आणि त्याचे अवशेष अखेर युद्धात अपंग, बेवारशी झालेल्या सामान्य सैनिकांसाठी बांधलेल्या 'अनाथाश्रमा'त ठेवले जावेत याला नशिबाचा खेळ नाही तर काय म्हणायचं?

नेपोलियनच्या स्मारकात मध्यभागी वरच्या भव्य घुमटाच्या बरोबर खाली एक कबरीसारखं बांधकाम केलेलं आहे. त्याच्या भोवती वर्तुळाकार सज्जा आहे. सज्जाच्या आजूबाजूच्या भिंतींवर नेपोलियनच्या जीवनावर आधारित अशी चित्रं कोरलेली आहेत.


याच इमारतीच्या दुसऱ्या विंगमध्ये फ्रेंच आर्मीच्या इतिहासावर आधारित असं एक म्युझियम आहे. या म्युझियममध्ये पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धातील फ्रेंचांची कामगिरी दाखवणाऱ्या घटनांवर आधारित चित्रं आणि फोटोग्राफ्सचं प्रदर्शन आहे. ते पाहण्यासारखं आहे. दुसऱ्या महायुद्धातील फ्रेंचांचा हिटलरने केलेला दारुण पराभव, फ्रेंचांनी पत्करलेली शरणागती, जर्मनांनी केलेले अत्याचार, हळूहळू फ्रान्समध्ये संघटित झालेली भूमिगत चळवळ, त्या चळवळीच्या वेळी अखेरच्या पर्वात जनरल द गॉल यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा विजयी फौजांचं फ्रान्सच्या भूमीवर अवतरणं या सर्व चढउतारांचं सुरेख चित्रण केलेलं आहे.

नेपोलियनच्या स्मारकापासून अक्षरश: हाकेच्या अंतरावर

नेपोलियनने उभारलेली विजयाची कमान आहे. जवळजवळ सर्व युरोप जिंकून परतणाऱ्या आपल्या विजयी सैनिकांच्या स्वागतासाठी नेपोलियनने ही कमान उभारली. जुन्या रोमन सम्राटांची ही पद्धत होती. इसवी सनाच्या चौथ्या शतकात कॉन्स्टंटाइनने उभारलेली अशी भव्य कमान आजही रोममध्ये पाहायला मिळते. त्या सम्राटांच्या पावलांवर पाऊल ठेवून, त्यांच्या इतक्याच विस्तृत भूभागावर आपली सत्ता स्थापन केल्यावर आपल्या सैनिकांचं कौतुक करावं आणि त्या निमित्ताने फ्रान्सच्या इतिहासातल्या एका सुवर्णक्षणाची स्मृती चिरंतन करावी असं नेपोलियनला वाटलं असल्यास त्यात गैर काहीच नव्हतं. स्थापत्यदृष्ट्या रोमन सम्राटांच्या कमानी आणि नेपोलियनने बांधलेली कमान यात एक महत्त्वाचा फरक आहे. रोमन डिझाईनमध्ये एकाला एक अशा जोडलेल्या तीन कमानी असत. ही एकच कमान आहे.


एकशे सत्तेचाळीस फूट उंचीच्या या कमानीनेही नंतर इतिहासाचे खूप चढउतार पाहिले. या रस्त्याने प्रथम नेपोलियनच्या विजयी फौजांनी मार्चिंग केलं. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीच्या काळात जेव्हा हिटलरच्या फौजांनी फ्रान्सचा पाडाव केला तेव्हा फ्रेंचांचा जास्तीत जास्त अपमान व्हावा म्हणून हिटलरने आपल्या फौजांचा मार्च पास्टही याच रस्त्याने याच कमानीखालून काढला आणि युद्धाच्या अखेरीस जनरल द गॉलच्या विजयी फौजांनी शरण आलेल्या जर्मन युद्धकैद्यांना पुढे घालून याच कमानीखालून संचलन केलं.

*शापित सम्राटाची समाधी*



आज या कमानीच्या खालच्या चौकात मध्यभागी एक ज्योत अखंडपणे तेवती ठेवलेली आहे. युद्धात धारातीर्थी पडलेल्या सर्व अनाम फ्रेंच सैनिकांची स्मृती म्हणून ती तेवत ठेवलेली आहे.

कमानीत लिफ्टने वरती जाता येतं. वरून फार सुंदर दृश्य दिसतं. ही कमान हा मध्यबिंदू धरून त्याच्या सभोवती आठी दिशांना त्रिज्यांसारखे सरळ लांबपर्यंत जाऊन क्षितिजाला भिडणारे आठ रस्ते आहेत. कमानीवरच्या एका छोटेखानी ऑडिटोरियममध्ये कमानीच्या



आर्क द त्रायफ

संदर्भात घडलेल्या सर्व ऐतिहासिक घटनांचं चित्रण असलेला एक लघुपट दाखविला जातो.

इतिहासाच्या चढउताराच्या या खुणांपासून जवळच चाळीस एकरांच्या विस्तीर्ण जागेत बांधलेलं लुवर या नावाचं एक प्रचंड म्युझियम आहे. कलेच्या अभ्यासकांच्या दृष्टीने हे स्थान म्हणजे मक्काच. ग्राउंड, मेझेनिन, पहिला आणि दुसरा अशा चार मजल्यांवर पसरलेलं हे म्युझियम जगातील एक सर्वात मोठी आर्ट गॅलरी आहे. वास्तविक हाही मूळचा राजवाडाच, पण आता त्याचा म्युझियमसाठी वापर करण्यात आला आहे. असं म्हणतात की या म्युझियममध्ये ठेवलेली प्रत्येक वस्तू फक्त पाचच मिनिटं पाहायची असा नियम करून एखादा रसिक रोज सकाळी म्युझियम उघडताक्षणी प्रवेश करून बंद होईपर्यंत ते पाहत राहिला, तरी त्याला अख्खं म्युझियम पाहायला तब्बल दहा वर्षं लागतील!

पॅरिसमधील वास्तव्याच्या अखेरच्या दिवशी आम्ही तिथे गेलो. आपल्याला लुवर म्युझियमच्या सौंदर्याची प्रचिती त्या म्युझियमपाशी असलेल्या मेट्रोच्या स्थानकावर आपण उतरतो त्या त्या क्षणापासूनच येऊ लागते. या स्टेशनच्या प्लॅटफॉर्मच्या भिंतीवरही इतक्या

कलाकृती कोरलेल्या आहेत, की त्या पुढे येणाऱ्या अविस्मरणीय आनंदाची नांदी गातायत असं वाटतं.

आम्हाला दहा वर्षं काय, दहा तासही म्युझियमसाठी देणं शक्य नव्हतं. त्यामुळे गाइडेड टूरला शरण जाणं भाग होतं. आम्ही सव्वा तासांची इंग्लिश कॉमेंटरी असलेली टूर घेतली.

गाईड आम्हाला एकामागून दुसऱ्या दालनात नेत होता. रत्नामाणकांनी भरलेल्या गुहेत प्रवेश केल्यानंतर अलिबाबाची काय अवस्था झाली असेल, याची आम्हाला त्या क्षणी कल्पना आली.

इजिप्त, आशिया खंडातले देश, ग्रीस, इटाली अशा जगातल्या विविध देशातल्या पुरातन काळापासून अगदी गेल्या शतकापर्यंतच्या नावाजलेल्या आणि कित्येक अनामिक कलाकारांच्या कलाकृतींचा समुद्रच आमच्या भोवती पसरला होता. त्यात चित्रं होती, कापडावरचं कशिदाकाम होतं, मातीची, ब्रॉन्झची, तांब्याची भांडी होती, संगमरवराचे पुतळे होते, अगदी इजिप्तमधल्या ममीसुद्धा तिथे ठेवलेल्या होत्या.

या साऱ्या कलाकृती तिथे होत्या याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे अतिशय कलापूर्ण रीतीने त्यांची मांडणी केलेली होती. मोठमोठी विस्तीर्ण दालनं, डोळ्यांना अतिशय सुखद वाटेल अशी प्रकाश योजना, कमालीची टापटीप यामुळे सारं वातावरण रसास्वादाला अतिशय पोषक असंच होतं, ऐतिहासिक महत्त्वाचा आणि कलेच्या क्षेत्रात ज्यांचं अपार कौतुक झालेलं आहे, अशा 'विंग्ड व्हिक्टरी', 'मोनालिसा', 'व्हीनस'चा पुतळा अशा कलाकृती तर तिथे होत्याच, पण खुद्द लुवर म्युझियम हीच तिथली एक सर्वात मोठी कलाकृती होती. यापैकी 'विंग्ड व्हिक्टरी' ही कलाकृती समुद्रस या नावाच्या ग्रीसजवळच्या एक बेटावर सापडली, असं गाईड सांगत होता. ही कलाकृती इसवी सनाच्या पहिल्या शतकातली असावी असा अंदाज आहे. गाईडने दिलेल्या माहितीपैकी समुद्रस या त्या बेटाच्या नावाचा मला अचंबा वाटला. बेटाचं हे नाव खास संस्कृत असावं असं नाही वाटत?

'व्हीनस' म्हणजे शुक्र देवतेचा अर्धावृत पुतळा. हीसुद्धा अशीच समुद्रात सापडलेली एक अनामिक कलाकाराची अजरामर कलाकृती. ते शिल्प संगमरवरासारख्या पाषाणाने बनवलेलं असलं, तरी त्या देवतेच्या चेहेऱ्यावरचा गोडवा, अंगावरून खाली ओघळणारं झुळझुळीत वस्त्र खाली पडू नये म्हणून तिने गुडघ्यात किंचित वाकवलेला पाय हे सारे तपशील अप्रतिम आहेत. ही कलाकृती शिल्पकलेचा एक जागतिक मानबिंदू मानली जाते.

आणि अशा कलाकृतीच्या कर्त्यांनी आपली नावंही मागे ठेवली नाहीत!

आजकालच्या नावाचा हव्यास बाळगणाऱ्या जमान्यात हे कलाकार, वेरूळ, अंजिठा, घारापुरीचे कलाकार किती थोर वाटतात!

लिओनार्दो-द-व्हिन्सीची 'मोनालिसा' आणि तिच्या चेहऱ्यावरचं खानदानी हास्य हा साऱ्या जगाचा कौतुकाचा विषय आहे. वाईट एवढ्याचंच वाटतं, की मोनालिसाला आता एक बुलेट प्रुफ काचेच्या कपाटात बंदिवान होऊन राहावं लागत आहे.

लुवर म्युझियमच्या रम्य वातावरणात सर्वात खटकणारी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे म्युझियमच्या प्रवेशद्वारापाशी बांधण्यात आलेला काचेचा भव्य पिरॅमिड. पिरॅमिड ही एक खास भौमितीय आकृति आहे. त्यात कोन आहेत, गोलाकार नाहीत. म्युझियमच्या बाहेरचा हा पिरॅमिड प्रचंड मोठा आहे; अत्याधुनिक

साधनसामुग्रीनं बनविलेला आहे. या पिरॅमिडला स्वत:चं असं एक सौंदर्य आहे हे मान्य असूनही तो त्या ठिकाणी अतिशय विसंगत वाटतो. म्युझियमची बिल्डिंग तीन-साडेतीन शतकांपूर्वीच्या खानदानी, राजेशाही थाटाची आहे. तिच्या प्रांगणात एखाद्या विज्ञान-तंत्रज्ञानाला वाहिलेल्या म्युझियमसमोर शोभेल असा पिरॅमिड उभा करण्यात काय अर्थ आहे? अगदी टोप पदराचा नऊवारी रेशमी साडी नेसलेल्या, कपाळावर चंद्रकोर कोरलेल्या, हातात निरंजनाचं तबक घेतलेल्या पुरंध्रीच्या अंगातला ब्लाऊज स्लीवलेस असला तर किती विसंगत दिसेल ? तसाच तो पिरॅमिड तिथे दिसत होता. अगदी भारी कापडाचा फॅशनेबल स्कर्ट-ब्लाऊज घातलेल्या मुलीच्या नाकात कितीही चांगली असली तरी नथ नाही का विसंगत दिसणार?

लुवर म्युझियममधून बाहेर पडलो तेव्हा शहरावर हळूहळू अंधार उतरू लागला होता. पुन्हा एकदा सीन नदीच्या किनाऱ्यावर आलो आणि लुवरबाहेरच्या एका पुलावर येऊन उभा राहिलो. नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवरच्या सुंदर सुंदर वास्तूंवर दिवे लागले होते आणि त्यांची प्रतिबिंबं पाण्यात पडली होती. नदीत फिरणाऱ्या बोटींवरही रोषणाई केली होती. सर्वत्र दीपावली साजरी केल्यासारखं वाटत होतं. देखावा रमणीय होता, पण आता पॅरिसचा निरोप घ्यायची वेळ जवळ आली होती.

चालत चालत एका नजीकच्या बसस्टॉपवर आलो. बसचा छोटासा डेपोच होता तो. आता आम्हाला गार द्यु लीस्ट स्टेशनवर जायचं होतं. आम्ही काही बस ड्रायव्हर-कंडक्टर, प्रवासी यांच्यापाशी चौकशी करण्याचा प्रयत्न केला. पण इंग्लिशमध्ये विचारलेल्या प्रश्नांना कोणीही धड उत्तर देत नव्हतं. आम्हाला फ्रान्समध्ये एकूणच हा अनुभव आला होता. इंग्लिशमध्ये विचारलेल्या प्रश्नांना फ्रेंच माणूस उत्तरं देत नाही. काही वेळा प्रश्न विचारलेल्या व्यक्तीला इंग्लिश भाषा येत नसल्याची शक्यता मी अमान्य करत नाही पण अनेक वेळा तर असं स्पष्ट जाणवायचं की प्रश्न विचारलेल्या व्यक्तीला आपण विचारलेला प्रश्न समजला आहे. तरीही ती व्यक्ती सरळ खांदे उडवून चालू लागत असे. पोलीस मात्र इंग्लिश प्रश्नालाही सरळ उत्तरं देत असत.

इतिहास काळात फ्रेंचांनी ब्रिटिशांशी व्यापारात, साम्राज्य कमावण्यात स्पर्धा केली. एकमेकांशी शंभर वर्ष चाललेलं युद्ध खेळलं, आजही ते इंग्रजांपेक्षा आपली भाषा, कला, संस्कृती श्रेष्ठ मानतात. हे सगळं खरं असलं तरी त्यांनी इंग्लिश भाषेशी असा वैरभाव दाखवणं तद्दन बालिश आणि अपरिपक्वपणाचं वाटतं. फ्रेंचांना आवडो किंवा न आवडो, न पुसल्या जाणाऱ्या इतिहासाचा एक परिणाम म्हणून इंग्रजी खऱ्या अर्थाने जागतिक भाषा बनलेली आहे ही वस्तुस्थिती नाकारण्यात काय शहाणपणा आहे? इंग्रजांचा भले तुम्ही आजही द्वेष करा पण इंग्रजी भाषेचा करू नका. शिवाय इंग्लिश ही काही फक्त ब्रिटिशांची भाषा नाही. ती अमेरिकेची म्हणजेच आजच्या जगातल्या सर्वात बलाढ्य राष्ट्राचीही भाषा आहे. तिचा द्वेष करण्यात काय हशील आहे ? काहीही असो, त्या दिवशी ती फ्रेंच मंडळी मला धड उत्तरं देत नव्हती.

'अंकल, तुम्हाला गार द्यु लीस्टला जायचंय ना ? मग तुम्हाला ही बस चालेल. चला मीही तुमच्याबरोबर येतो. एका भारतीय तरुणाने आम्हाला पुढे होऊन सांगितलं आणि तो स्वत:च समोरच्या एका बसमध्ये चढला. त्याच्याबरोबर त्याची फ्रेंच गर्ल-फ्रेंड होती.

'अंकल तुम्ही भारतीय आहात ना?'

बसमध्ये त्या तरुणाने मला विचारलं.

'हो, तू पण भारतीय आहेस ना?'

'हो, मूळचा भारतीयच पण गेल्या दोन पिढ्या आपल्या देशाशी संपर्क तुटलेला.' त्याने काहीसं दुखावलेल्या स्वरात उत्तर दिलं.

आणि त्यानंतर 'आपल्या मातृभूमीतली माणसं' या एका घट्ट भावनिक धाग्याने तो आम्हाला चिकटलाच. त्याचं नाव मोहम्मद आलम. आलमने त्या दिवशी आम्हाला आमचं सामान लॉकरमधून ट्रेनमध्ये चढवायला मदत केली, आणि नको नको म्हणत असताना आम्हाला स्टेशनवरच्या रेस्टॉरंटमध्ये खायला घातलं. तो पॅरिसला इंटिरियर डेकोरेशनचं शिक्षण घेत होता. त्याला तीन मोठे भाऊ होते, वडील होते, आई नुकतीच वारली होती. त्याच्या वडिलांचा लंडनला व्यापार होता. त्याच्या तिन्ही मोठ्या भावांनी युरोपियन मुलींशी लग्नं केली होती. त्या घरात एकत्र कुटुंबासारख्या राहत नव्हत्या. वडील आता थकले होते. ते नेहमी आलमच्या आईची आठवण काढत आणि विव्हळत.

'अंकल, म्हणून मी ठरवलंय, मी भारतीय मुलीशीच लग्न करणार आहे. तिने माझ्याबरोबरच माझ्या वडिलांचीही काळजी घेतली पाहिजे. बरोबर आहे की नाही अंकल?' आलम मला विचारत होता.

'मग ही कोण रे तुझी?' त्याच्या बरोबरच्या फ्रेंच मुलीकडे बोट दाखवत शशीने विचारलं.

'ही माझी मैत्रीण आहे. मी भारतीय मुलीशी लग्न करणार आहे हे तिलाही माहीत आहे.' आलम उत्तरला.

आलम गेल्या वर्षी फक्त एकदा भारतात आला होता. शशीने त्याला आणि त्याच्या मैत्रिणीला पुरणाची पोळी दिली.

'माझी आई होती तेव्हा असेच सुंदर सुंदर भारतीय खाद्यप्रकार बनवायची. आता आमच्या कुटुंबात असं अन्न कोणीच बनवत नाही.' गहिवरून आलम म्हणाला.

'ठीक आहे. तुझ्या भारतीय बायकोलाही ते खाद्यपदार्थ येत नसले तर माझ्याकडे पाठव. मी शिकवीन.' शशीने त्याला आश्वासन दिलं.

'आज मुझे एक अंकल और आँटी मिल गये.' आलम म्हणाला.

'हां, और हमे एक बेटा.' शशी म्हणाली.

आम्ही आलमचा आणि पॅरिसचा एकदमच निरोप घेतला.

झुरिचच्या गाडीत स्थानापन्न झालो. गाडी सुटली. रात्रीचे अकरा वाजून गेले होते. दोघांसाठी असलेला छोटा स्वतंत्र डबाही आम्हाला मिळाला होता. दिवसभराच्या प्रवासाचा थकवाही होता. पण झोप येत नव्हती. मनात आलमचे आणि त्याच्या फ्रेंच मैत्रिणीचेच विचार येत होते. त्याला उद्देशून शशी निघताना म्हणाली होती – 'हां, और हमे एक बेटा मिल गया.' स्टेशनवर आमचं सामान उचलणं, आमचा डबा शोधून द्यायला मदत करणं, आम्हाला गाडी सुटताना हात हलवून निरोप देणं, इतकंच नव्हे तर आमच्या पुढच्या लंडनच्या मुक्कामात मदत व्हावी म्हणून आपल्या बहिणीचा लंडनमधला फोन नंबर देऊन ठेवण्याची काळजी घेणं हे आलमचं वागणं खरोखरीच्या मुलासारखंच होतं. आमचा मुलगा आणि सून नेमकं असंच वागतील.

आणि एवढं सगळं करणारा आलम नावाचा कोणी मुलगा या पृथ्वीवर अस्तित्वात आहे याची अगदी तासा–दीड तासापूर्वीपर्यंत आम्हाला कल्पनाही नव्हती! आणि त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे नातं अतिशय क्षणभंगुर होतं. माझी जवळजवळ खात्रीच होती की हा आलम आणि ती फ्रेंच मुलगी आम्हाला आयुष्यात पुढे भेटणारही

नव्हते.

दोन ओंडक्यांची होते, सागरात भेट!

एक लाट तोडी दोघां, पुन्हा नाही गाठ!

हे किती खरं आहे हे अशा प्रवासात घडलेल्या अतिशय थोड्या वेळाच्या पण उत्कट मैत्रीसंबंधात कळून येतं. अशा स्नेहात हिशेब नसतात. परतफेडीची अपेक्षा नसते. म्हणूनच अपेक्षाभंगाचं दुःख नसतं. असते फक्त शुद्ध, सात्विक मैत्री. त्या तेवढ्या छोट्याश्या प्रवासाच्या काळात कोणी ऐन उकाड्यात स्वतःकडे फार नसूनही आपल्या थर्मासमधलं पाणी आपल्याला दिलेलं असतं, आपलं लहान मूल रडत असतं आणि पहिलटकरीण असलेल्या आपल्या बायकोला त्याला झोपवावं कसं हे समजत नसताना पुढल्या बाकावर बसलेल्या कोणा अनामिक आजीनं त्याला स्वतःच्या मांडीवर घेऊन झोपविलेलं असतं किंवा बाजूच्या बाकावरच्या कोणा ताईनं त्याच्यासाठी खुळखुळा वाजविलेला असतो.

अशा मैत्रीत आपल्या आजूबाजूला असलेल्यांचं आयुष्य आपल्या परीने आपल्या कुवतीनुसार थोडं सुखद करण्याचा, ते चार क्षण दोघांच्याही दृष्टीने सुगंधी व्हावे यासाठी केलेला एक अतिशय प्रामाणिक मानवी प्रयत्न असतो.

मनात विचार येत होता, अशीच वृत्ती माणसं आयुष्यभर का ठेवत नाहीत? इथे कोण लेकाचा कायमचा राहायला आलाय? पण प्रवासात असं वागणारी माणसं 'स्थिर' जीवनात मात्र आपली खुर्ची, आपली जायदाद आणि अखेर ही सारी पृथ्वी ईश्वराने आपल्याला कायमची आंदण देऊन टाकली आहे - असं का वागतात?

# स्वित्झर्लंड नावाचं नंदनवन

युरोपात प्रत्यक्ष पोहोचण्यापूर्वी कोणत्या देशाबद्दल जर मला कमालीचं औत्सुक्य असेल तर ते स्वित्झर्लंडसंबंधी होतं.

काश्मीरला भारताचं नंदनवन म्हणतात तर स्वित्झर्लंडला जगाचं नंदनवन म्हणतात! अर्थात, 'भारत कधी कधी जेव्हा माझा देश' असतो त्या देशप्रेमाने भारलेल्या क्षणी मनात वाटून जातं की हे विधान काही फारसं खरं नाही. युरोपियन लोकांनी दोन शतकं जगावर राज्य केलं म्हणून हे विधान जगावर लादलं गेलं. तीच दोन शतकं जर जगावर भारताचं राज्य असतं - केवढं भव्य स्वप्नरंजन! - तर सर्वांनी काश्मीरला 'जगाचं नंदनवन' आणि स्वित्झर्लंडला 'युरोपचं काश्मीर' किंवा फारफार तर 'युरोपचं नंदनवन' म्हटलं असतं.

काही असो, ही कमालीची सुंदर यक्षभूमी पाहण्याची खूप उत्सुकता होती.

शिवाय ही यक्षभूमी असणार - कमालीची सुंदर असणार - याबद्दल तिथल्या विविध स्थळांच्या सुंदर फोटोग्राफ्सशिवाय आणखीही एक सज्जड पुरावा होता. - किती तरी जागतिक ठराव, करार, परिषदा आणि कन्व्हेन्शन्स या स्वित्झर्लंडला झालेल्या आहेत. - होत असतात. जगाचं राजकारण जरी देशोदेशीचे पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष असे राजकारणी पुरुष करत असले तरी त्याला आकार देतात ते त्या देशांचे सनदी अधिकारीच. सनदी अधिकारी ही प्रत्येक देशातली हुशार जमात असते. या ठरावांवर चर्चा करायला ज्या अर्थी साऱ्या जगातले नोकरशहा हटकून जिनिव्हा, बर्न अशा स्वित्झर्लंडमधील शहरांची निवड करतात त्या अर्थी स्वित्झर्लंड खरोखरच सुंदर असलं पाहिजे, अशी मी मनाशी खूणगाठ बांधली होती.

आणि अख्ख्या जगातील सर्व 'थोर' राजकारणी, व्यापारी, उद्योजक यांचा काळा पैसा आपल्या पोटात साठवणाऱ्या त्या तितक्याच 'थोर' स्विस बँका! त्यांचा हा देश!

आल्प्स पर्वत वास्तविक युरोपातील तीन-चार देशात पसरला आहे. पण याचा पर्यटनासाठी सर्वात चांगला उपयोग स्वित्झर्लंडने करून घेतला आहे. त्यामुळे स्वित्झर्लंड आणि आल्प्स यांचं एक अतूट नातं तयार झालेलं आहे. - त्या आल्प्सचा हा देश!

पंडित नेहरूंनी तिसऱ्या जगातल्या देशांना अलिप्ततेचा कानमंत्र देण्यापूर्वीच दोन्ही महायुद्धात तो आचरणात आणणारा हा देश.

- किती किती कौतुकाची वलयं स्वित्झर्लंड या चार अक्षरांभोवती माझ्या मनात तयार झालेली होती.

झुरिचला सकाळी सहाला पोहोचलो. कोणत्याही नव्या शहरात भल्या पहाटे पोहोचलो की आमची ठराविक कवायत असे. प्रथम सर्व सामान एखाद्या सोयीस्कर ठिकाणी म्हणजे वेटिंग रूम किंवा

प्लॅटफॉर्मवरच्या बाकापाशी नेऊन ठेवणं. तिथे शशीने बसणं आणि सामानाची देखभाल करणं. मग मी चलन बदलून नव्या देशाच्या चलनाची काही रक्कम बँकेतून घेणं. नंतर पहिली गोष्ट म्हणजे दोघांनी चहा पिणं. त्या देशात राहायचं नसेल तर सामान थेट रेल्वे प्लॅटफॉर्मवरच्या लॉकर्समध्ये नेऊन ठेवणं. राहायचं असेल आणि एखाद्या परिचिताचा पत्ता मिळालेला असेल तर त्या परिचिताला फोन करणं आणि राहायचं असेल आणि परिचित बिरिचित कोणी नसेल तर मी हॉटेल्सच्या चौकशीसाठी बाहेर पडणं. शक्य तितकं रेल्वे स्टेशनच्या जवळचं हॉटेल बुक करणं आणि स्टेशनवर येऊन सामान आणि शशीला घेऊन हॉटेलात जाणं.

झुरिचचा एक पत्ता, फोन नंबर आमच्याकडे होता.

करन्सी बदलली, चहा घेतला आणि त्या व्यक्तीला फोन ठोकला. सुदैवाने फोन लागला सुध्दा.

– पण कोणी उचलला नाही. एकदा, दोनदा, तीनदा.

परदेशच्या प्रवासातला हा सर्वात वैतागाचा क्षण असतो.

'अमुक ठिकाणी जाताय ना? – बिलकुल चिंता करू नका. मी मित्राचा फोन नंबर देतोय – तुम्ही फोन केलात की तो स्टेशनवर कार घेऊन येईल! इ.इ.' असं भरघोस आश्वासन मिळालेलं असल्यामुळे आपण त्या ठिकाणच्या हॉटेल्सची पुरेशी चौकशीही केलेली नसते. आता दोन दिवस कोणाच्या का होईना 'घरी' राहायला मिळेल, 'घरचं' अन्न खायला मिळेल असे आपण मनात मांडे खाल्लेले असतात आणि अशा वेळी त्या इसमाने फोन उचललाही नाही की – की भगवद्गीतेत श्रीकृष्णाने वर्णन केलेला 'स्थितप्रज्ञपणा' हा गुण अंगी बाणविणं किती कठीण आहे याचा प्रत्यय येतो.

आता हॉटेल शोधणं आलं.


झुरिच स्टेशनच्या मुख्य हॉलमध्ये हॉटेल बुकिंगची एक सुंदर सोय आहे. तिथे एक भव्य फलक आहे. त्या फलकावर सुमारे पन्नास-साठ हॉटेल्सची नावं, पत्ते, स्टेशनपासूनचं अंतर, त्या हॉटेलचा पुढून दिसणारा फोटो आणि दर अशी सर्व माहिती दिलेली आहे. शिवाय त्या फलकाला जोडूनच एक टेलिफोन आहे. आपण फक्त फोनचा रिसीव्हर उचलायचा आणि आपल्याला हव्या असलेल्या हॉटलच्या चित्रावर बोट ठेवायचं. त्या स्पर्शाने आपोआप आतली इलेक्ट्रॉनिक मंडलं पूर्ण होऊन फोन हॉटेलला जोडला जातो. मग आपण त्या हॉटेलात खोली उपलब्ध आहे का वगैरे चौकशी करायची. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे या फोनचे पैसे तुम्हाला द्यावे लागत नाहीत. तुम्ही हॉटेल बुक केलं तरी – न केलं तरी!

चार्टवर नजर फिरवली. स्टेशनजवळची हॉटेलं महाग होती. स्वस्त होती ती अर्थातच स्टेशनपासून दूर होती.

मला 'अल्पमोली-बहुगणी' असं स्टेशनजवळचं, स्वस्त हॉटेल हवं होतं. – ते कोठून मिळणार? अखेर स्टेशनपासूनचं अंतर आणि दर, दाम या सगळ्या बाबींचा विचार करून 'फोटो'वरून हॉटेल निवडलं. मुलगी 'पाहून' लग्न ठरवावं तसाच हा प्रकार होता.

हा हॉटेल निवडण्याचा सोहळा पार पाडून आम्ही आमच्या हॉटेलातल्या खोलीवर जायला मध्यान्ह झाली होती. आम्ही ऑक्टोबरात युरोपात गेलेलो असल्यामुळे दिवस छोटे होते. संध्याकाळी पाच-साडेपाचला काळोख पडून रात्र सुरू होत होती. त्यामुळे शक्य तितक्या लवकर शहर पाहायला बाहेर पडायचं होतं. स्वित्झर्लंड पाहण्याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. त्यामुळे पटकन काहीतरी पोटपूजा करून आम्ही हॉटेलबाहेर पडलो.

अजेंडावरचा पहिला आयटेम 'झुरिच लेकमध्ये बोटिंग करणं' हा होता. झुरिच लेक प्रचंड आहे. अडीच-तीन तासांची बोट-टूर घेतली तरी पूर्ण प्रदक्षिणा होत नाही, एवढं मोठं आहे. अडीचच्या सुमारास बोट-टूर सुरू होणार होती. आम्ही अगदी नेमके म्हणजे सव्वा दोनच्या सुमारास तेथे पोहोचलो. तिकिटं काढली आणि पंधरा मिनिटं लेकच्या कठड्यापाशी रेंगाळत राहिलो. आपल्या गेट वे ऑफ इंडियाच्या आसपास धक्का आहे, बाकडी मांडलेली आहेत, तशी एकूण व्यवस्था आहे.



स्वित्झर्लण्डच सौंदर्य

बाकावर बसलो आणि एकदम मला आठवण झाली. आम्ही युरेलचा पास काढलेला असल्यामुळे वास्तविक झुरिच लेकवरची बोट-टूर आम्हाला फुकट होती. पण मी तर तिकिटं काढून चुकलो होतो. पुन्हा तिकिटाच्या खिडकीपाशी गेलो. माझा युरेल पास दाखवला आणि विनंती केली.

आणि इथे मला स्वित्झर्लंडने पहिला सुखद धक्का दिला.

तिकिटांच्या खिडकीवरच्या 'बाबू'ने माझ्या अंगावर न खेकसता 'तिकीट घेताना कुठे गेलीवती हो अक्कल - आयला आम्हाला फुक्कटचा त्रास - आता काय ते जमायचं नाय' असं न म्हणता उलट सुहास्य मुद्रेने तिकिटं परत घेतली आणि पैसे परत दिले. 'ठीक आहे हो - होते अशी गफलत. तुमच्या जागी असतो तर माझीही झाली असती. बरं झालं तुमचं नुकसान टळलं. आणि म्हणा अगदी टूर करून परत आल्यावर तुम्ही मला तुमचा पास दाखवला असता तरी मी तुम्हाला तुमचे पैसे परत दिलेच असते हो.' असा काहीसा भाव त्या तिकीट बाबूच्या चेहऱ्यावर होता. 'तुम्ही पर्यटक आहात - आम्हाला तुम्ही हवे आहात - तुम्हाला आम्ही जी सवलत देऊ केलीये, ती केवळ तुम्ही घ्यायला विसरलात या सबबीवर द्यायची टाळणं हे अगदी गैर आहे, ते मी करणार नाही, खरं तर तुम्ही परदेशी पर्यटक आहात हे दिसल्यावर तुमच्याकडे युरेलचा पास आहे का, असं मीच विचारायला हवं होतं. तुमचं नाही, माझच चुकल.' असं काहीसं तो जर्मन भाषेत पुटपुटल्याचा मला भास झाला!

स्वित्झर्लंडमध्ये तुमची खरोखरच काळजी घेतली जाते. आपण तर बुवा स्विस लोकांच्या आदरातिथ्याला सलाम ठोकला.

झुरिच लेकवरची पुढली अडीच-तीन तासांची सफर हा एक अनिर्वचनीय आनंद होता.

बोटीच्या डेकचा अर्धा भाग उघडा होता. अर्धा भाग काचेच्या खिडक्यांनी बंद केलेला होता. तो विजेने उबदारही केलेला होता. दोन्ही भागात खुर्च्या-टेबलं मांडलेली होती. वातावरण ढगाळ होतं. म्हटलं, बोटीच्या खुल्या भागात बसावं. इतर बरेच प्रवासीही खुल्या भागातच बसले होते.

बोट सुरू झाली. आधीच तापमान खूप कमी होतं. आठ-दहा अंश सेल्सियस असावं. त्यात बोट सुरू झाल्यावर लेकवरून येणारा गार वारा अंगाला झोंबू लागला आणि एकेक करून उघड्या भागातले प्रवासी एकमेकांकडे पाहू लागले. तसं प्रत्येकालाच उठून आतल्या सुरक्षित भागात जावंसं वाटत होतं. पण आता इतरांच्या आधी आपण उठून जाणं म्हणजे आपण थंडी सहन न होण्याइतपत म्हातारे झालो आहोत, असं सगळ्यांसमोर कबूल करण्यासारखं आहे, असं प्रत्येकाला वाटत होतं. आणि प्रत्येक जण हा कबुलीजबाब द्यायला लाजत होता. इज्जत का सवाल था ना ? एवढंच सांगतो की, पुढल्या पंधरा मिनिटात एकेक करून सगळे आतल्या उबदार केबिन्समध्ये गेले.

या तळ्यातल्या बोट-टूरमध्ये आजूबाजूला सौंदर्याचा जो सडा शिंपलेला दिसत होता, त्याने आम्ही दोघं पूर्ण भारावून गेलो होतो. त्या क्षणी आम्ही घेत असलेल्या सौंदर्यानुभवात आपण आणखी कोणाला तरी सामावून घ्यावं, असं आम्हां दोघांना अतिशय तीव्रतेने वाटू लागलं आणि त्या मूडमध्ये मी घरी पत्र लिहायला घेतलं. माझा 'तो' मूड, ती भावस्थिती समजायची, तर त्या पत्रातील उताराच इथे देणं अधिक सयुक्तिक ठरेल.

तलावात बोट मंथर गतीने पुढे पुढे सरकत्ये. टेबलावर एक बीयरची बाटली ठेवून मधून मधून त्या कडवट पेयाचे छोटे छोटे घुटके घेत मी टिंटेड काचेच्या खिडकीतून बाहेर पाहतोय. तलावाच्या दोन्ही किनाऱ्यांवर हिरवी गर्द वनराजी पसरलीय. प्रथम पोपटी गवताचा गालिचा, त्या पलिकडे मुद्दाम वाढवलेली काळपट हिरव्या रंगाची दाट झाडी, त्या पलिकडे छोटीशी जांभळी डोंगरांची रांग आणि त्यावर आकाशाचा निळा पट्टा. चारी बाजूंनी रंगांनी आम्हाला वेढून टाकलंय. आकाश धूसर अभ्राच्छादित आहे. पण मधूनच सूर्याचा एखादा किरण त्या ढगांमागून डोकावतोय. चारी बाजूच्या डोंगरांवर ठिपक्या ठिपक्यांनी घरं विखुरली आहेत आणि त्या घरांच्या घोळक्यातून मध्येच एखादा सोळाव्या-सतराव्या शतकातील चर्चचा उंच सुळका वर मान करतोय. उतरणाऱ्या सूर्याचं ऊन त्याच्यावर पडलंय. पाण्यात ठिकठिकाणी बदकं तरंगतायत आणि आकाशात अधूनमधून बगळे उडतायत. आम्ही दोघं हे दृश्य नजरेने पिऊन घेतोय आणि हृदयात साठवतोय. निसर्ग किती सुंदर असतो आणि माणसाने मनात आणलं तर किती सुंदर ठेवता येतो, याचं झुरिचचं तळं आणि त्याच्या काठचा परिसर हे एक सुंदर उदाहरण आहे.

बोट मंथर गतीने पुढे चाललीय पण तिची गती जाणवत नाहीये. काळ थिजल्यासारखा वाटतोय. मनात विचार येतायत - आज आपण इथे आहोत, उद्या आपण कुठे असू ? तसंच आज आपण इथे आहोत, उद्या इथे कोण असेल ? हे विचार फिजूल आहेत. हे जग सुंदर आहे आणि मी जन्माला आलो त्यावेळी ते जितकं सुंदर होतं, त्यापेक्षा या जगाचा कायमचा निरोप घेताना मी ते थोडंसं तरी अधिक सुंदर करून जाईन, एवढीच जीवनाची फिलॉसॉफी खरं तर अख्ख्या मानवजातीला पुरेशी आहे. तेवढी प्रत्येकाने बाळगली तर धर्म नको, जात नको, अभिमान नको, दुःस्वास नको, दुरावा नको, स्पर्धा नको, काही काही नको. सुंदर वातावरणात फक्त सुंदरच विचार मनात

येतात का ? तसंच बहुधा असावं, कारण इथे झुरिचच्या तलावाच्या काठी तर सौंदर्याचा सडा पडला होता. इथे सर्वत्र टुमदार घरं, टवटवीत फुलं, गोंडस-गुटगुटीत मुलं, तारुण्याने मुसमुसलेल्या तरुण-तरुणीच दिसत होत्या. वाटत होतं, इथे कुरूपपणाला मज्जाव केलेला आहे... अगदी मनातल्या कुरूप विचारांना सुध्दा!'

बोट-टूर संपली आणि आम्ही परत धक्क्यावर आलो. एखाद्या सुंदर स्वप्नातून जागं व्हावं तसं वाटलं. पण नाही, तिथे दुसरा एक तितकाच गोड, अविस्मरणीय प्रसंग घडणार होता.

धक्क्यावरच्या बाकावर आम्ही दोघं जण थोडा वेळ बसलो. आम्ही आपापसात काही बोलत होतो. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाबद्दल ठरवत होतो, तेव्हा आमच्या असं लक्षात आलं की थोड्या दूर अंतरावरून दोन चिनी-जपानी वाटाव्या अशा स्त्रिया आमच्याकडे विशेषतः शशीकडे पाहत होत्या आणि आपापसात काहीतरी कुजबुजत होत्या.

शशीने त्यावेळी साडी नेसलेली होती आणि तिथं तळ्याच्या किनाऱ्यावर वावरणाऱ्या जवळजवळ दीड-दोनशे स्त्रियांमध्ये साडी नेसलेली ती एकटीच होती. तिच्या पेहरावातील या वैशिष्ट्यामुळे ती भारतीय आहे हे सहज ओळखता येत होतं.

अखेर त्या दोन स्त्रिया आमच्यापाशी आल्या. त्या दोघींपैकी जी पन्नाशीच्या आसपासची होती तिने शशीला विचारलं, ''इंडियन ?''

''होय.'' शशीने उत्तर दिलं.

मग ती पन्नाशीची बाई काहीतरी जर्मन भाषेत बोलली. आम्हाला ते समजेना. आम्हाला जर्मन समजत नाहीये हे त्या स्त्रीच्या मैत्रिणीच्या ध्यानात आलं. त्या मैत्रिणीला तोडकं-मोडकं का होईना इंग्लिश येत होतं. तिने शशीला विचारलं - 'हिला तुझ्याबरोबर एक फोटो काढायचा आहे - काढू दे का ?''

आम्हाला तिच्या मागणीचा अर्थच समजेना. आजूबाजूला वास्तविक कॅमेरे क्लिक होत होते आणि त्यातल्या कित्येकांच्या फोटोत आम्ही येतही असू, पण मग हिने असं खास विचारलं कशाला ? आणि आपल्याबरोबर खास खांद्यावर हात वगैरे ठेवून फोटो काढायचा असला तर त्याचं प्रयोजन काय ? आपल्या फोटोचा दुरुपयोग तर केला जाणार नाही ? पण बाई तर साधीसुधी सज्जन वाटत होती. आमच्या चेहऱ्यावरचा गोंधळ तिच्या ध्यानात आला.

ती म्हातारी बाई हातवारे करत जर्मन भाषेतून काहीतरी सांगू लागली. लगेच मैत्रिणीने आमच्यासाठी अनुवाद केला. ''गैरसमज करून घेऊ नको. हिचे वडील मद्रासकडले भारतीय आणि आई थाय होती. तिचं वडिलांवर खूप प्रेम होतं. ती भारतात कधीच गेली नाही. तिला तू मद्रासकडली इंडियन वाटलीस. म्हणून ती विनंती करतेय. नाही म्हणू नको.''

अनुवाद संपला. आमचं लक्ष म्हातारीच्या चेहेऱ्याकडे गेलं. तिचा चेहरा एकच शब्द बोलत होता, 'प्लीज'. त्या बाईने आम्हाला 'वरलिया रंगावरून' अगदी बरोबर ओळखलं होतं, आम्ही दोघं वर्णानं अगदी अस्सल साउथ इंडियन वाटावे असेच आहोत. आम्हाला तिची विनंती प्रामाणिक वाटली. शशीने अखेर तिला होकार दिला.

आणि म्हातारी एवढी आनंदली! पटापट तिने दोन-तीन फोटो काढले. एक फक्त शशीचा. एक शशीचा आणि तिचा. एक आम्हा दोघांबरोबर तिचा.

'तुम्हालाही पाठवीन हं कॉपी,'' ती म्हणाली आणि आमचे पुनः पुन्हा आभार मानत त्या दोघी दुसऱ्या दिशेने जायला निघाल्या.

माझ्या मनात आलं - खरंच कुठे कुणाच्या भावना गुंतलेल्या असतील हे सांगणं किती कठीण आहे! म्हातारीचं वडिलांवर प्रेम, म्हणून वडिलांच्या देशावर प्रेम, म्हणून त्या देशातल्या लोकांवर प्रेम; ममत्वाचा वास्तविक हा किती नाजुक धागा! पण हे असले धागेही किती चिवट असतात! मागे थायलंडला गेलो होतो तेव्हा मी फक्त 'आय ॲम ॲन इंडियन - फ्रॉम द लँड ऑफ बुद्धा'' एवढं सांगितल्यावर माझी बरीच कामं पटापट झाल्याचं मला आठवलं.

त्या दोघी थोड्या दूर गेल्या होत्या. आम्हाला भूक लागलेली असल्यामुळे आम्ही आमच्याबरोबर डब्यात आणलेली पुरणपोळी बाहेर काढली होती आणि ती खाण्याच्या विचारात होतो. पोळीचा पहिला घास तोंडात घालण्यापूर्वी मला काय वाटलं कुणास ठाऊक - मी शशीला म्हटलं, ''शशी, त्या म्हातारीला आपल्याकडली पुरणपोळी द्यायला हवी होती, नाही? - तिला किती बरं वाटलं असतं!''

माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आतच शशी उठली, धावत त्या दोघींपाशी गेली आणि तिने त्याना आमच्यापाशी परत बोलावून आणलं, ''ही स्वीट इंडियन डिश - तुझ्यासाठी,'' तिच्या हाती पुरणपोळीचा तुकडा देत शशी म्हणाली.

म्हातारीचे डोळे एकदम पाणावले. तिने पोळीचा तुकडा मोठ्या प्रेमाने खाल्ला आणि एकदम आपल्या गळ्याला गुंडाळलेला एक भारी किंमतीचा स्कार्फ काढून शशीच्या गळ्याभोवती गुंडाळत ती म्हणाली, ''ही माझी तुला भेट, आठवण.'' मैत्रीण अनुवाद करून सांगत होती. ''तिला म्हणावं कोराच आहे. कालच मी तो इथे घेतलाय. जुना, वापरलेला नाही देणार तुला.''

स्कार्फला लावलेल्या किंमतीचं लेबल अजून तिथेच लटकत होतं.

भाषेचं माध्यम एक नसताना, एकमेकींचा एकही शब्द कळत नसताना, फक्त नजरेने आणि स्पर्शाने पुढली दहा मिनिटं ती म्हातारी आणि शशी एकमेकींचा निरोप घेत होत्या.

केवळ सहा-साडेसहा वाजले असले तरी आता बराच काळोख पडला होता म्हणून आम्ही हॉटेलकडे परतायचं ठरवलं.

सकाळी आम्ही 'फोटो' पाहून हॉटेल पसंत केलेलं होतं. सकाळी त्या हॉटेलची झुरिच स्टेशनवरच्या फलकावर जी जुजबी माहिती वाचलेली होती त्या व्यतिरिक्त आम्हाला काहीच माहिती नव्हती.

आणि आता संध्याकाळ झाल्यानंतर आम्ही जसजसे हॉटेलच्या जवळ येऊ लागलो तसतसं जाणवू लागलं की आपल्या हॉटेलच्या आजूबाजूचा परिसर सूर्योदयाबरोबर जागा होणारा नाहीये तर सूर्यास्तानंतर 'जागा' होणारा आहे - सकाळी आम्हाला हे जाणवलं नव्हतं.

म्हणजे हॉटेल अगदी 'रेड लाईट' एरियामधलं होतं अशातला भाग नाही. पण रस्त्यावरून त्या भागात संध्याकाळच्या वेळी वावरणारी माणसं थोडी संशयास्पद वाटावी अशीच होती. गावात नवीन असल्यामुळे आम्ही रस्ता विचारत विचारत येत होतो. तेव्हा एक-दोन पत्ता सांगणाऱ्या व्यक्तींनी आमच्याकडे पाहून, ''तुम्ही? आणि त्या भागातल्या हॉटेलात?'' असा चेहरा केला होता. आणखी जवळ पोहोचलो तेव्हा जवळपास एक-दोन ठिकाणी डिस्को आणि कॅबरेची हॉटेलं असल्याचं जाणवलं. त्या ठिकाणी वाजणारं कर्कश वाद्यसंगीत आणि केलेली दिव्यांची रोषणाई बरंच सांगत होती. कदाचित असंही असेल, हॉटेल मूळ चांगल्या पण कमी वस्तीच्या भागात बांधलेलं असेल आणि नंतर ही 'अशी' वस्ती वाढली असेल.

काहीही असो. नुसता फोटो बघून मुलगी करणं जेवढं धोक्याचं असतं तेवढंच हॉटेल निवडणंही वेडेपणाचं असतं हे जाणवलं. मुलीचं

कुटुंब आणि कुळशील पाहण्याइतकंच हॉटेलचा परिसर पाहून निवड करणं आवश्यक आहे हा धडा शिकलो.

आता काय करायचं? हॉटेल सोडायचं तर एक दिवसाचे पैसे फुकट जाणार होते. शिवाय दुसऱ्या हॉटेलातच जायचं तर तो हॉटेलवालाही त्या दिवसाचं भाडं घेणारच हो. म्हणजे दुप्पट भुर्दंड, आणि त्याच हॉटेलात राहायचं म्हटलं तर रात्रभर झोप लागणार नव्हती.

शेवटी पुन्हा एकदा त्या सकाळच्या पत्त्यावर फोन करून बघायचं ठरवलं. हॉटेलच्या बाहेरूनच त्या गृहस्थांना फोन केला आणि सुदैवाने आता ते घरी आढळले. आम्ही सुटकेचा एक निःश्वास टाकला.

त्या गृहस्थांचं नाव होतं, लुडविग म्हणजे लुगी. लुगी ताबडतोब आम्हाला आमच्या हॉटेलवर भेटायला येतो म्हणाले.

थोड्या वेळाने लुगी हॉटेलवर आलेसुध्दा. सकाळी आम्ही फोन केला तेव्हा ते घरी नव्हते. वास्तविक ते आमची वाटच पाहत होते. पण मध्येच अचानक एक अनपेक्षित घटना घडली होती.

लुगी आता पन्नाशीच्या पुढे गेलेले गृहस्थ होते. तारुण्यात ते फुटबॉल खेळत असत. ते ज्या टीमतर्फे खेळत त्या टीमचे कोच - जे त्यांच्यापेक्षा जवळ जवळ वीस वर्षांनी मोठे होते, अचानक वारले होते. लुगींना आपल्या गुरुच्या अंत्ययात्रेला जावं लागलं होतं. त्यांचा इलाज नव्हता. पण ते परत परत आमची क्षमा मागत होते. ''तुम्ही उद्यापासून माझ्याकडे राहायला या,'' लुगींनी आमंत्रण दिलं, ''उद्या सकाळी मी गाडी घेऊन इथे येतो. मग आपण तुमचं सामान डिकीत टाकू. दिवसभर फिरू. तुम्ही सकाळीच हॉटेल सोडा - संध्याकाळी आपण थेट घरीच जाऊ.'' लुगी सुचवत होते.

मनात आलं - उद्यापासून बोलावतोय तर हा सज्जन गृहस्थ आताच या असं का म्हणत नाही? आमची हॉटेलची निवड चुकली होती हे त्यांनाही दिसत होतं. मग आजची रात्र आम्हाला इथेच राहण्याची शिक्षा देण्यात काय गंमत होती? अर्थात, या प्रश्नाचं उत्तर आम्हाला दुसऱ्या दिवशीच मिळालं.

# आल्पसदर्शन

दुसऱ्या दिवशी सकाळी लुगी गाडी घेऊन आले. आम्ही लुगींना विचारलं, 'लुगी, कुठे जायचं ?'

लुगी म्हणाले, 'सॅण्टिस.'

आल्प्स पर्वत स्वित्झर्लंडच्या मध्यभागी पसरलेला आहे. त्यात खूप शिखरं आहेत. आणि त्यातल्या प्रत्येक शिखराचा स्विस लोकांनी एकेक पिकनिक पॉईंट करून टाकलेला आहे. जुंगफ्राऊ, पिटॅलस, टिटलिस, ग्रुंटेन हुंडस्टेन अशी कितीतरी छोटी-मोठी शिखरं जगभरच्या पर्यटकांना कायम आकर्षित करत असतात, त्यातलंच एक - सॅण्टिस.

लुगी १२०च्या स्पीडने गाडी चालवत होते. स्वच्छ, नितळ, रुंद रस्ता. बाजूला मधून मधून हिरवळ, मधून मधून झाडी. झाडांमध्ये बुव्हे, थाने या जातीच्या झाडांची संख्या अधिक, आम्ही ऑक्टोबरच्या मध्यावर गेलो होती. लुगी म्हणाले, 'तुम्ही चांगल्या सीजनला आलात. हिवाळ्यात आला असतात तर या रस्त्यावर एक ते दीड मीटर उंचीचं बर्फ आढळलं असतं. वसंत ऋतूत आला असतात तर आता दिसतायत त्यापेक्षा फुलं अधिक दिसली असती हे खरं आहे पण झाडांचा रंग सर्वत्र हिरवा, हिरवा आणि हिरवाच दिसला असता. आता थोडीफार फुलं तर दिसतायतच पण आता खरं तर झाडंच फुलं झालेयत.' लुगीचं म्हणणं खरं होतं. हिवाळ्याला नुकती कुठे सुरुवात होती. कित्येक ठिकाणी अख्ख्या झाडाचा पर्णसंभार पिवळा झालेला होता. काही ठिकाणी तो तांबूस तर काही ठिकाणी तो तपकिरी झाला होता. त्यामुळे प्रत्येक झाडाला स्वतंत्र व्यक्तिमत्व आल्यासारखं वाटत होतं.

दिवस चांगला होता. सूर्यमहाराजांच्या कृपेमुळे सर्वत्र ऊन पडलं होतं. त्या उन्हात झाडं सतेज दिसत होती. मध्येच गावं लागायची. प्रत्येक घराभोवती बाग दिसायची. उंच बिल्डिंगमधल्या प्रत्येक फ्लॅटमधील प्रत्येक खिडकीत छोटी छोटी फुलझाडं हमखास लावलेली दिसायची. ती सुध्दा एवढी विविध रंगी, ताजी-टवटवीत आणि इतकी भरघोस! दुरून ती बिल्डिंगच फुलल्यासारखी वाटायची! आम्ही रस्त्यात दोन-तीन वेळा लुगींना गाडी थांबवायला लावून अशा घरांचे कौतुकाने फोटो काढले.

आज चांगलं ऊन पडल्यामुळे पर्यटकांचे लोंढेच्या लोंढे आल्प्स पर्वताच्या या ना त्या शिखराकडे धाव घेत होते. त्यामुळे रस्त्यावर रहदारी चांगली होती. रस्ता वळणावळणाचा होता. चढाचा होता. रस्त्यावर ठिकठिकाणी बोगदे होते. काही बोगदे तर ५-६ किलोमीटर्स लांबीचे होते. पण बोगद्यांत विजेच्या दिव्यांनी प्रकाशाची उत्तम सोय केलेली होती. शिवाय दर चार-पाचशे यार्डावर एका इमर्जन्सी

टेलिफोनची सोय होती. रहदारीला कोठेही अडथळा येऊ नये म्हणून किती दक्षता घेतलेली होती! मध्येच शशी मला म्हणाली, 'अहो, तुम्ही मला एक गोष्ट दाखवलीत तर मी तुम्हाला बक्षीस देईन.'

मी विचारलं, 'काय?'

'रस्त्यावरचा खड्डा.' ती म्हणाली.

'सॉरी, हरलो. हे बक्षीस जिंकणं मला शक्य नाही.'

एका ठिकाणी एका छोट्याश्या पुलावरून जाताना लुगी म्हणाले, 'ही खाली वाहतेय ना, ती ऱ्हाईन नदी आहे.'


नदी कसली त्या ठिकाणी तर तो एक छोटासा ओढा होता. ऱ्हाईन आल्प्स पर्वतात उगम पावते. स्वित्झर्लंड आणि जर्मनीमधून वाहते आणि अखेर हॉलंडमध्ये रॉटरडॅमपाशी उत्तर समुद्राला जाऊन मिळते. अगदी ख्रिस्त जन्माच्या पूर्वीपासून म्हणजे रोमन साम्राज्याच्या काळापासून युरोपच्या इतिहासाची कित्येक पानं या ऱ्हाईन नदीच्या तीरावर लिहिली गेली आहेत. जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारे काही प्रसंग या नदीच्या तीरावर घडले आहेत. तिने कितीतरी साम्राज्यं घडताना आणि विलयाला जाताना पाहिली आहेत. प्रसंगी त्या साम्राज्यांच्या सीमारेषांचं काम केलेलं आहे तर प्रसंगी आपल्या पाण्याबरोबर इटलीची कला संस्कृती आणि ज्ञान युरोपातील इतर देशांकडे वाहून नेलेलं आहे. याच ऱ्हाईन नदीने ख्रिस्ती धर्मातील प्रोटेस्टंट पंथाला जन्म दिला आहे. या साऱ्या घडामोडींमुळेच आपल्याला गंगा जेवढी जवळची वाटते तेवढीच मध्य युरोपला ऱ्हाईन आपली वाटते. त्या भागातील, विशेषतः जर्मन साहित्यात ऱ्हाईनचा अनेक वेळा उल्लेख येतो. त्या ऱ्हाईनचं एखाद्या किरकोळ ओढ्यासारखं स्वरूप पाहून गंमत वाटली.

सॅण्टिसला पोहोचण्यापूर्वी आणखी एक गमतीदार अनुभव आला. वाटेवर एक गाव लागलं. त्याचं नाव वाडूज. ही एका स्वतंत्र देशाची राजधानी आहे. या देशाची (!) वस्ती वीस-पंचवीस हजाराहून जास्त नाही. पण या देशाला आजही राजा आहे. त्याचा स्वतंत्र राजवाडा आहे. राजघराण्याचं चर्च आहे. या राज्यात डोंगराळ भागातली पाच-पंचवीस खेडी येतात. या राज्याला स्वतंत्र चलन नाही, त्याला संरक्षण व्यवस्थेची गरजच लागत नाही. पण या राज्याची स्वतःची स्वतंत्र पोस्टाची तिकिटं आहेत. या राज्याचं प्रमुख उत्पन्न ही पोस्टाची तिकिटं पर्यटकांना विकून मिळतं. आपल्या देशातही अशी चिल्लर संस्थानं होती. आपण ती स्वातंत्र्यानंतर खालसा केली. पुढच्या पंचवीस-तीस वर्षांत आपण त्या संस्थानिकांचे तनखेही बंद केले. पण स्वित्झर्लंडमध्ये ऐन विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकातही हा मध्ययुगीन संस्थानी जीवनाचा अवशेष अजून शिल्लक ठेवलेला आहे.

सॅण्टिस शिखर २५०१ मीटर्स उंच आहे. त्याच्या पायथ्यापर्यंत कारने जाता येतं आणि त्यानंतर सुमारे अर्धा तास तारेवर टांगलेल्या विजेच्या सरकत्या पाळण्यातून जायचं असतं. शेवटचे दीड-दोनशे फूट चढून जायला लिफ्ट आहेत. एकेका लिफ्टमध्ये पन्नास-साठ माणसं राहतील एवढ्या मोठ्या.

आम्ही सरकत्या पाळण्यात पर्वताच्या शिखराकडे तोंड करून उभे राहिलो. पाळणा चारी बाजूंनी बंद होता. पण त्याला सर्वत्र काचेच्या खिडक्या होत्या. पाळण्याने हळूहळू शिखराच्या दिशेने वर वर सरकायला सुरुवात केली आणि ते भव्य शिखर आपल्या अंगावर येतंय असं वाटू लागलं. नियतीच्या निश्चित क्रमाप्रमाणे आता आपला

पू-प्रवास
८२९
२०५००
५।२।९८



*सॅंटिस शिखरावरील पाळणा*

कपाळमोक्ष अटळ आहे असं वाटू लागलं.

मध्येच अर्ध्या रस्त्यावर पाळणा मुद्दामच थांबवला गेला. त्यावेळी चारी बाजूच्या खिडक्यांतून फक्त आल्प्स पर्वताची शिखरंच शिखरं दिसत होती. कुठेही झाड नाही, झाडोरा नाही. इतकंच काय, गवताचं पातसुद्धा नाही. सर्वत्र फक्त पांढऱ्या शुभ्र बर्फाचं साम्राज्य पसरलेलं दिसत होतं. स्वच्छ सूर्यप्रकाशात ते पांढरंशुभ्र बर्फ चकाकत होतं. भणभणणाऱ्या वाऱ्याबरोबर बर्फाची धूळ भुरूभुरू उडत होती. त्या अक्राळविक्राळ निसर्गात खालच्या जमिनीपासून १०० ते १५० फूट उंचीवर हवेत अधांतरी टांगलेले आम्ही माणूस नावाचे पन्नास-साठ जीव अगदीच किरकोळ, नगण्य वाटत होतो. ते क्षण अविस्मरणीय होते. निर्सगाच्या रौद्र रूपाचं कौतुक करावं की त्या विराट, रौद्र निसर्गात आपल्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ठाम पाय रोवून उभ्या राहिलेल्या साडेपाच फुटी जिवांचं कौतुक करावं, हेच समजत नव्हतं. शिखरावर एक विस्तीर्ण केबिन आहे. त्या केबिनमध्ये तिथलं तापमान दाखवणारा थर्मामीटर भिंतीवर टांगून ठेवलेला होता. तो तापमान दाखवत होता - शून्य अंश सेल्सियस.

आम्ही त्या केबिनच्या बाहेर खुल्या शिखरावर गेलो. वर भणाणणारा वारा होता. उघडे हात क्षणार्धात बधिर होत होते बर्फावरून बूट घसरत होते. मधून मधून बर्फाखालचे कातळ उघडे पडलेले दिसत होते त्यांच्यावर पाय ठेवत जपून चालावं लागत होतं. नवल म्हणजे या एवढ्या थंड वातावरणातही तिथे पक्षी होते. त्याचं नाव टोळ. बिचारे थंडीत पार गारठलेले होते. भुकेलेलेही होते आणि त्यामुळेच पर्यटक लाह्या, पाव वगैरे काही देत असतील तर त्याच्या अगदी जवळ येत होते. प्रसंगी त्यांच्या हातावर बसून पावाचे तुकडे खायला तयार होत होते. भुकेने लाचार झालेल्या माणसांसारखेच मला ते वाटले आणि त्यांची चक्क कीव आली. खाली येताना लिफ्टमध्ये एका विशिष्ट तऱ्हेचं टेप्ड संगीत लावलेलं होतं. बॅग पाईप, ड्रम वगैरे असलेलं. कानाला ते फारच गोड वाटत होतं. 'हे इथल्या डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांचं म्हणजे हायलॅण्डर्सचं पारंपरिक संगीत.' लुगींनी सांगितलं.

परतीच्या वाटेवर कॉन्स्टन्स नावाचं एक फार मोठ्या आकाराचं तळं लागलं. तळं कसलं ते?... छोटासा समुद्रच... फक्त लाटा नसलेला. ते तळं ऱ्हाईन नदीच्या पाण्याने बनलेलं आहे. त्याच्या एका बाजूला स्वित्झर्लंड, दुसऱ्या बाजूला ऑस्ट्रिया आणि तिसऱ्या बाजूला

जर्मनी आहे. या तलावात ऱ्हाईनचं पाणी खूप मोठ्या प्रमाणावर साचतं. तळ्यात प्रवेश करतो तो ऱ्हाईन नावाचा ओढा असतो... तळ्यातून बाहेर पडते ती ऱ्हाईन नावाची नदी असते. पंधरा-सोळाव्या वर्षी बघता बघता आपल्या नजरेसमोर एखाद्या अल्लड किशोरीचं तरुणीत रूपांतर व्हावं तसं हे स्थित्यंतर घडत.

अर्थात, ऱ्हाईनच्या अंगातला तारुण्यसुलभ अवखळपणा संपून तिची संथगतीने चालणारी प्रौढा बनलेली नसते. आपल्यातला अवखळपणा शिल्लक आहे हे ती लगेचच काही किलोमीटर्स अंतरावर दाखवते.

त्या ठिकाणाचं नाव ऱ्हाईन फॉल्स.. ऱ्हाईन धबधबा. आम्ही आता त्याच दिशेला जायला निघालो होतो.

ऱ्हाईनचा धबधबा आपल्या जोगच्या शरावतीच्या धबधब्यासारखा सरळसोट उंच नाही... उलट त्यात वळणं आहेत. एका उंच कड्याभोवती शरीर गुरफटून कड्याच्या कातळावर आदळत-आपटत धसमुसळेपणा करीत ऱ्हाईन खाली झेपावते. इथे पाण्याला विलक्षण वेग आहे. ऱ्हाईनला जणू कड्यावरून उडी टाकायची जीवघेणी ओढ लागलेली आहे. धबधब्याच्या संपूर्ण उंचीवर तीन-चार ठिकाणांहून तो पाहण्याची सोय आहे. आम्ही सर्वात खालच्या ऑब्झर्वेशन पॉइंटवर जाऊन उभे राहिलो.

रोरावत फेसाळत पाणी खाली पडत होतं. त्यात मध्ये मध्ये मोठमोठे भोवरे तयार झाले होते. खडकांच्या चट्टानांवर कायम आपटत असल्यामुळे त्या पाण्याचा एक अव्याहत ध्वनी तयार झाला होता. एखाद्या खोल गाभाऱ्यात मंत्रघोष घुमावा तसा तो वातावरण व्यापून टाकीत होता. कानात घुमत होता. मधल्या खडकांवर आपटणाऱ्या पाण्याचे तुषार अविरतपण तीस-चाळीस फूट उंच उड़त होते. त्यांचा एक अखंड झिरझिरीत पडदा बनल्यासारखं वाटत होतं आणि त्या पडद्यातून धबधब्याच्या दुसऱ्या कड्यावरचं दृश्य सिनेमात दाखवतात तसं स्वप्नदृश्यासारखं वाटत होतं. पाण्याच्या प्रवाहावर दोन ठिकाणांहून मोठमोठे प्रकाशझोत टाकलेले होते. हवेत उंच उडणाऱ्या तुषारांच्या सूक्ष्म जलबिंदूंमुळे त्या प्रकाशाचं पृथक्करण होऊन धबधब्याच्या फेसाळत वाहणाऱ्या प्रवाहावर जणू इंद्रधनुष्याचा पूल बांधल्यासारखं वाटत होतं. त्या इंद्रधनुष्याच्या पायऱ्यांवरून हलकेच पावलं टाकीत आपण तुषारांच्या झिरझिरीत पडद्यातून दिसणाऱ्या पैलतीराला पोचलो तर तिथे नक्कीच स्वप्नभूमी असेल असं वाटत होतं.

किती वेळ झाला तरी त्या जागेवरून आमचा पाय निघत नव्हता.

रात्री लुगींच्या घरी गेलो आणि मग त्यांनी आम्हाला आदल्या दिवशी रात्रीच का बोलावलं नाही याचं कारण कळलं. लुगी अविवाहित होते, एकटेच राहत होते. तशी तरुणपणी त्यांची एक गर्ल फ्रेंड होती. पण ती आयुष्यभर त्यांची फ्रेंडच राहिली. त्यांची सहधर्मचारिणी व्हायला तिने नकार दिला होता.

आम्हा दोघांना - एका दाम्पत्याला आपल्या घरी राहायला बोलवायचं तर आपल्या घराच्या फर्निचरमध्ये, डेकोरेशनमध्ये काही बदल करणं आवश्यक आहे, चार एरवी न लागणाऱ्या वस्तू आणणं आवश्यक आहे याची त्यांना जाणीव झाली होती. आदल्या रात्री लुगी ते काम करत होते.

लुगींचं भारतावर अतोनात प्रेम आहे. ते किमान सहा-सात वेळा भारतात आले आहेत. एकदा ते असेच भारतात आलेले असताना

त्रिवेंद्रमला राहत होते. तेव्हा त्यांना एक क़िरकोळ अपघात झाला आणि त्रिवेंद्रमच्या हॉस्पिटलात न्यावं लागलं. मिलिटरीतून निवृत्त झालेल्या एका डॉक्टरांनी तिथे त्यांच्यावर उपचार केले आणि त्यातून त्यांच्या अपघातावर इलाज झालाच पण एक पायाचा दीर्घ आजारही बरा झाला! आधीच लुगींना भारत आवडला होता. आता तर त्यांचं भारतावर प्रेमच बसलं. लुगींच्या बोलण्याचा एक विशिष्ट ढंग आहे, ते ड ला द, ट ला त आणि ज ला य म्हणतात. त्यांना चांगलं इंग्लिश येत नाही. काही मोजक्या शब्दांच्या सहाय्याने ते बोलतात. त्यांनी अख्ख्या जगाची दोन भागात विभागणी केलेली आहे. एक 'गुद' आणि दुसरा 'नो गुद.' 'इंदिया आणि ऑल इंदियन पीपल' हे त्यांच्या मते 'गुद' होते.



*लुगी आणि आल्प्स · दोघांनी मनात घर केले*

दुसऱ्या दिवशी लुगींनी आम्हाला आल्प्सच्या दुसऱ्या एका शिखरावर नेलं. त्या शिखराचं नाव होतं, पिलॅटस.

सकाळी नऊ-साडेनऊच्या सुमारास नाश्ता करून आम्ही निघालो. पण आज हवा एकदम बदलली होती. कालचा सूर्यप्रकाश आज गायब झाला होता. सर्वत्र दाट धुकं पसरलं होतं. आकाशातही ढगच ढग होते. त्या ढगांच्या आवरणातून सूर्यबिंब चंद्राच्या तबकडीसारखं रुपेरी दिसत होतं. अगदी दुपारचे अकरा-बारा वाजायला आले होते तरी आम्ही गॉगल वगैरे न लावता त्याच्याकडे पाहू शकत होतो. पंडुरोग झालेल्या व्यक्तीसारखा सूर्य पांढरा फटक, निस्तेज दिसत होता. आम्ही लिमाट नदीच्या तीरावरून आल्प्सकडे जात होतो. ऱ्हाईन जशी कॉन्स्टन्स या तळ्याला जाऊन मिळते तशी लिमाट झुरिचबाहेरच्या तळ्याला जाऊन मिळते. आम्ही घाट चढायला सुरुवात केली तेव्हा वास्तविक अकरा वाजून गेले होते. पण सूर्य ढगांबाहेर यायच्याऐवजी आणखीनच अंधारून आलं होतं. या रस्त्यावर प्रचंड वळणं होती, बोगदे होते. रस्त्याच्या बाजूला कधी डोंगराचे उंच सुळके तर कधी खोल दऱ्या होत्या. काही ठिकाणी त्या अंधारलेल्या अवस्थेतही अंधुक स्वरूपात डोंगरमाथे दिसत होते. तर काही ठिकाणी अपुऱ्या प्रकाशामुळे ते दिसतच नव्हते. पायापासून धडापर्यंतचा माणूस दिसावा आणि वरचं डोकंच दिसू नये असं दृश्य जसं भेडसावणारं होईल तसं झालं होतं. काल घाटातही १००हून जास्त स्पीडने

धावणाऱ्या लुगींच्या गाडीचा वेग आज जेमतेम ३५-४०वर आला होता.

आणि जसजसे आम्ही घाटात वरवर चढत गेलो तसतसं खालचं, जमिनीवरचंही दिसेनासं झालं. आता तर वर धुकं, खाली धुकं, उजव्या, डाव्या सगळ्या बाजूंना धुकंच धुकं झालं होतं. धुक्याच्या समुद्रात आम्ही पार बुडून गटांगळ्या खात आहोत असं वाटत होतं. पुढे, मागे, खाली, वर काही काही दिसत नव्हतं. कारचे दिवे लावावे लागले होते तरी त्या दिव्यांच्या प्रकाशात पुढच्या केवळ चार हातांवरचाच काय तो रस्ता दिसत होता. रात्रीच्या अंधारात जंगलात किंवा खंडाळ्याच्या घाटात आपण एकटेच कारने प्रवास करत असलो तर आपल्याला सर्वत्र काळोखाचा दर्या पसरल्यासारखं वाटतं. पण हा अनुभव त्या अनुभवाहूनही निराळा होता. कारण त्या मिट्ट अंधारातही गाडीचे दिवे लावले तर प्रकाशाचा दूरवर अंधार चिरत जाणारा झोत आपल्याला दिसतो. इथे धुकं इतकं दाट होतं की कारच्या दिव्याचा प्रकाशझोत ती धुक्याची भिंत भेदून जाण्याचा केविलवाणा पण असफल प्रयत्न करत असल्याचं फक्त दिसत होतं.

मला एकदम वाटलं, ते वातावरण मानवी जीवनावरच भाष्य करणारं आहे! मानवी जीवनाची स्थितीही अशीच असते. भविष्यकाळ अज्ञात असतो. पूर्वजन्मही (असल्यास) आपल्याला आठवत नसतो. ह्या दोन गूढतेत अदृश्य झालेल्या टोकांमध्ये आपल्याला जीवनाचा 'चार घडीचा' डाव मांडायचा असतो. जे काही चार दिवसांचं आयुष्य मिळेल ते 'जपून पावलं टाकत' घालवायचं असतं. एका सूफी पंथीय संतकवीच्या प्रार्थनेच्या मराठी अनुवादाच्या ओळी मला आठवल्या-

तेजोनिधे दयाळा। दाखीव मार्ग माते॥
जांवोत ना पदें ही। सोडून सत्पथाते॥
मी दूरचीच दृश्यें। पाहावया न वांछी॥
भूमी पुढे दिसावी। एकाच पावलाची॥

घाट चढता-चढता एका विशिष्ट वळणावर थोडी पठारासारखी सपाट जागा लागली. लुगींनी थोडा वेळ तिथे गाडी थांबवली. घाटात वळणावरच्या त्या सपाट जागी एक छोटं चर्च होतं. किती छोटं? गावी छोटंसं मारुतीचं देऊळ असावं तेवढं. मला आठवलं, खंडाळ्याच्या घाटातही असंच एक छोटंसं देऊळ आहे. घाट चढता उतरताना अनेक वाहनचालक आणि प्रवासीही देवाची प्रार्थना करतात, तिथे पैसे फेकतात. पर्वत शिखरांवर माणसाला ईश्वराची आठवण व्हावी असा संकेत आहे का? आणि मला असंही वाटतं की आमच्या नास्तिक मित्रांनी या भावनेला नाकं मुरडूं नयेत. नाहीतरी घाटाचा रस्ता सुरू होतो तेव्हा 'धोक्याची वळणे - वाहने हळू हाका' अशा सूचनेनंतर 'आपला प्रवास सुखाचा होवो' अशी 'सेक्युलर' शुभेच्छा व्यक्त केलेली असतेच ना? - आणि देव म्हणजे तरी काय? माणसाच्या मनातल्या मांगल्याचं मूर्तिमंत प्रतीक!

पिलॅटस शिखर सँटिस शिखराएवढं उंच नाही. ते फक्त २१३२ मीटर्स म्हणजे सुमारे ७००० फूट उंच आहे. पिलॅटसवर बऱ्याच उंचीपर्यंत खूप झाडं आहेत. मनुष्यवस्तीही आहे. आम्ही पोचलो तेव्हा पिलॅटसवर बर्फ पडायला सुरुवात झालेली नव्हती. पिलॅटसवरही विजेरी पाळण्यातूनच वर जायचं असतं. हा विजेचा पाळणा जमिनीवरून जवळजवळ १०० फूट उंचीवरून शिखराकडे जात होता. पाळण्याखाली ८० ते ९० फूट उंच वृक्षांची दाट झाडी वाढलेली होती.

त्रिवेंद्रमला राहत होते. तेव्हा त्यांना एक किरकोळ अपघात झाला आणि त्रिवेंद्रमच्या हॉस्पिटलात न्यावं लागलं. मिलिटरीतून निवृत्त झालेल्या एका डॉक्टरांनी तिथे त्यांच्यावर उपचार केले आणि त्यातून त्यांच्या अपघातावर इलाज झालाच पण एक पायाचा दीर्घ आजारही बरा झाला! आधीच लुगींना भारत आवडला होता. आता तर त्यांचं भारतावर प्रेमच बसलं. लुगींच्या बोलण्याचा एक विशिष्ट ढंग आहे, ते ड ला द, ट ला त आणि ज ला य म्हणतात. त्यांना चांगलं इंग्लिश येत नाही. काही मोजक्या शब्दांच्या सहाय्याने ते बोलतात. त्यांनी अख्ख्या जगाची दोन भागात विभागणी केलेली आहे. एक 'गुद' आणि दुसरा 'नो गुद.' 'इंदिया आणि ऑल इंदियन पीपल' हे त्याच्या मते 'गुद' होते.



*लुगी आणि आल्प्स दोघांनी मनात घर केले*

दुसऱ्या दिवशी लुगींनी आम्हाला आल्प्सच्या दुसऱ्या एका शिखरावर नेलं. त्या शिखराचं नाव होतं, पिलॅटस.

सकाळी नऊ-साडेनऊच्या सुमारास नाश्ता करून आम्ही निघालो. पण आज हवा एकदम बदलली होती. कालचा सूर्यप्रकाश आज गायब झाला होता. सर्वत्र दाट धुकं पसरलं होतं. आकाशातही ढगच ढग होते. त्या ढगांच्या आवरणातून सूर्यबिंब चंद्राच्या तबकडीसारखं रुपेरी दिसत होतं. अगदी दुपारचे अकरा-बारा वाजायला आले होते तरी आम्ही गॉगल वगैरे न लावता त्याच्याकडे पाहू शकत होतो. पंडुरोग झालेल्या व्यक्तीसारखा सूर्य पांढरा फटक, निस्तेज दिसत होता. आम्ही लिमाट नदीच्या तीरावरून आल्प्सकडे जात होतो. ऱ्हाईन जशी कॉन्स्टन्स या तळ्याला जाऊन मिळते तशी लिमाट झुरिचबाहेरच्या तळ्याला जाऊन मिळते. आम्ही घाट चढायला सुरुवात केली तेव्हा वास्तविक अकरा वाजून गेले होते. पण सूर्य ढगांबाहेर यायच्याऐवजी आणखीनच अंधारून आलं होतं. या रस्त्यावर प्रचंड वळणं होती, बोगदे होते. रस्त्याच्या बाजूला कधी डोंगराचे उंच सुळके तर कधी खोल दऱ्या होत्या. काही ठिकाणी त्या अंधारलेल्या अवस्थेतही अंधुक स्वरूपात डोंगरमाथे दिसत होते. तर काही ठिकाणी अपुऱ्या प्रकाशामुळे ते दिसतच नव्हते. पायापासून धडापर्यंतचा माणूस दिसावा आणि वरचं डोकंच दिसू नये असं दृश्य जसं भेडसावणारं होईल तसं झालं होतं. काल घाटातही १००हून जास्त स्पीडने

धावणाऱ्या लुगींच्या गाडीचा वेग आज जेमतेम ३५-४०वर आला होता.

आणि जसजसे आम्ही घाटात वरवर चढत गेलो तसतसं खालचं, जमिनीवरचंही दिसेनासं झालं. आता तर वर धुकं, खाली धुकं, उजव्या, डाव्या सगळ्या बाजूंना धुकंच धुकं झालं होतं. धुक्याच्या समुद्रात आम्ही पार बुडून गटांगळ्या खात आहोत असं वाटत होतं. पुढे, मागे, खाली, वर काही काही दिसत नव्हतं. कारचे दिवे लावावे लागले होते तरी त्या दिव्यांच्या प्रकाशात पुढच्या केवळ चार हातांवरचाच काय तो रस्ता दिसत होता. रात्रीच्या अंधारात जंगलात किंवा खंडाळ्याच्या घाटात आपण एकटेच कारने प्रवास करत असलो तर आपल्याला सर्वत्र काळोखाचा दर्या पसरल्यासारखं वाटतं. पण हा अनुभव त्या अनुभवाहूनही निराळा होता. कारण त्या मिट्ट अंधारातही गाडीचे दिवे लावले तर प्रकाशाचा दूरवर अंधार चिरत जाणारा झोत आपल्याला दिसतो. इथे धुकं इतकं दाट होतं की कारच्या दिव्याचा प्रकाशझोत ती धुक्याची भिंत भेदून जाण्याचा केविलवाणा पण असफल प्रयत्न करत असल्याचं फक्त दिसत होतं.

मला एकदम वाटलं, ते वातावरण मानवी जीवनावरच भाष्य करणारं आहे! मानवी जीवनाची स्थितीही अशीच असते. भविष्यकाळ अज्ञात असतो. पूर्वजन्मही (असल्यास) आपल्याला आठवत नसतो. ह्या दोन गूढतेत अदृश्य झालेल्या टोकांमध्ये आपल्याला जीवनाचा 'चार घडीचा' डाव मांडायचा असतो. जे काही चार दिवसांचं आयुष्य मिळेल ते 'जपून पावलं टाकत' घालवायचं असतं. एका सूफी पंथीय संतकवीच्या प्रार्थनेच्या मराठी अनुवादाच्या ओळी मला आठवल्या-

तेजोनिधे दयाळा। दाखीव मार्ग माते॥
जावोत ना पदें ही। सोडून सत्पथाते॥
मी दूरचीच दृश्यें। पाहावया न वांछी॥
भूमी पुढे दिसावी। एकाच पावलाची॥

घाट चढता-चढता एका विशिष्ट वळणावर थोडी पठारासारखी सपाट जागा लागली. लुगींनी थोडा वेळ तिथे गाडी थांबवली. घाटात वळणावरच्या त्या सपाट जागी एक छोटं चर्च होतं. किती छोटं? गावी छोटंसं मारुतीचं देऊळ असावं तेवढं. मला आठवलं, खंडाळ्याच्या घाटातही असंच एक छोटंसं देऊळ आहे. घाट चढता उतरताना अनेक वाहनचालक आणि प्रवासीही देवाची प्रार्थना करतात, तिथे पैसे फेकतात. पर्वत शिखरांवर माणसाला ईश्वराची आठवण व्हावी असा संकेत आहे का? आणि मला असंही वाटतं की आमच्या नास्तिक मित्रांनी या भावनेला नाकं मुरडूं नयेत. नाहीतरी घाटाचा रस्ता सुरू होतो तेव्हा 'धोक्याची वळणे - वाहने हळू हाका' अशा सूचनेनंतर 'आपला प्रवास सुखाचा होवो' अशी 'सेक्युलर' शुभेच्छा व्यक्त केलेली असतेच ना? - आणि देव म्हणजे तरी काय? माणसाच्या मनातल्या मांगल्याचं मूर्तिमंत प्रतीक!

पिलॅटस शिखर सँटिस शिखराएवढं उंच नाही. ते फक्त २१३२ मीटर्स म्हणजे सुमारे ७००० फूट उंच आहे. पिलॅटसवर बऱ्याच उंचीपर्यंत खूप झाडं आहेत. मनुष्यवस्तीही आहे. आम्ही पोचलो तेव्हा पिलॅटसवर बर्फ पडायला सुरुवात झालेली नव्हती. पिलॅटसवरही विजेरी पाळण्यातूनच वर जायचं असतं. हा विजेचा पाळणा जमिनीवरून जवळजवळ १०० फूट उंचीवरून शिखराकडे जात होता. पाळण्याखाली ८० ते ९० फूट उंच वृक्षांची दाट झाडी वाढलेली होती.

पण ती धुक्यात पार गुरफटलेली होती. फक्त पायथ्यापासून शिखरापर्यंत या पाळण्याच्या मार्गावर ती झाडी तोडलेली होती आणि पाळण्याला जायला मार्ग केलेला होता. एखाद्या स्त्रीच्या केसातल्या भांगासारखी ती दिसत होती. इथे वारा नव्हता. झाडांची पानंही त्यामुळे हलत नव्हती.

पिलॅटस शिखरावर एक हॉटेल आहे आणि रेल्वे स्टेशनही आहे. जगातली सर्वात जास्त चढ असलेली रेल्वे या शिखरावर येते. ती जमिनीशी ४८ अंशांचा कोन करते.

आम्ही वर पोचल्यावर अगदी थोडा वेळ म्हणजे फक्त पाच-सात मिनिटांसाठीच सूर्य ढगातून बाहेर आला. आणि एकदम लख्ख प्रकाश पडला. सारं आसमंत स्वच्छ, स्पष्ट दिसू लागलं. फक्त काही वेळासाठीच आम्हाला आजूबाजूला पसरलेल्या विराट आल्प्सचं दर्शन झालं. समोर असणाऱ्या हॉटेलच्या भिंतीची कडा दिसली. आजूबाजूच्या शिखरांनी क्षितिजावर काढलेली रेघ दिसली. मनात आलं, साक्षात्काराचा अनुभव असाच असेल का? भगवान गौतम बुध्दांना बोधिवृक्षाखाली ज्ञान झालं तेव्हा अशाच प्रकारचा अनुभव आला असेल का? सांगणं कठीण आहे.

आम्हाला मात्र या साक्षात्कारी अनुभवात बाकी कसलं नाही पण चौफेर पसरलेल्या आल्प्सचं विराट दर्शन झालं. काही वेळासाठीच फक्त समोरच्या कड्यावरच्या हॉटेलच्या भिंतीची कडा स्पष्टपणे दिसली. आजूबाजूच्या शिखरांनी आकाशावर कोरलेली क्षितिजाची रेषा दिसली. - आणि पाच मिनिटांत पुन्हा सगळं धुक्याच्या विरविरीत पडद्यामागे लपलं. सकाळच्या साखरझोपेतून जागं व्हावं, नेणिवेच्या राज्यातून जाणिवेच्या राज्यात प्रवेश झाल्यासारखा वाटावा आणि पुन्हा डोळे जडावून डोळ्यांवर झापड यावी तसं झालं.

खाली उतरताना तर धुकं एवढं वाढलं होतं की ज्या तारेवर आमचा पाळणा लोंबकळत होता ती तारसुध्दा आता दहा हातांपलिकडे दिसत नव्हती. धुक्याच्या समुद्रात आम्ही जणू गटांगळ्या खात होतो. मनात विचार येत होते, वरच्या बेसवरून आमचा पाळणा तर खाली ढकलून दिला गेला होताच. आम्ही खाली खाली घरंगळत होतो. खालीच काय, आजूबाजूलाही काही दिसत नव्हतं, आम्ही जणू अज्ञातात उडी घेतली होती. कशाच्या जोरावर आम्ही हे असं स्वतःला अज्ञातात झोकून दिलं होतं? एकाच विश्वासावर. या पाळण्याचं वजन, तारेची वजन वाहून नेण्याची क्षमता, तार ज्या धातूची बनवलेली होती त्या धातूची ताण सहन करण्याची ताकद, तारेच्या दोन्ही टोकांचा विजेचा दाब हे सर्व काही लक्षात घेऊन हा पाळणा बनवला गेलेला आहे. तो कार्यक्षम आहे याची तपासणी झालेली आहे. त्यात कुठेही चूक झालेली नाही. हाच तो विश्वास. मानवाच्या तंत्रज्ञानावरचा विश्वास.

घरी परत जाताना लुगींनी कारमधला रेडिओ लावला होता. दर दहा-पंधरा मिनिटांनी त्याच्यावर सूचना दिली जात होती. - झुरिच शहराबाहेर अमुक नंबरच्या हायवेवर दोन किलोमीटर्स लांबीचा ट्रॅफिक जॅम झालेला आहे. आश्चर्य ट्रॅफिक जॅमचं नव्हतं. आश्चर्य एकही मोटरिस्ट आपली लाइन सोडून रस्त्याच्या दुसऱ्या अर्ध्या भागात घुसून आपलं घोडं पुढे दामटण्याचा प्रयत्न करत नव्हता याचं होतं. छे! आपली गाडी अशा रीतीने पुढे काढण्याचा प्रत्येकाने प्रयत्न केला की ट्रॅफिकचं काय छान कडबोळं करता येतं, ट्रॅफिक पोलीस आल्याशिवाय तो गुंता कसा बिलकुल सोडवता येत नाही, या सगळ्यातून एकमेकांना शिवीगाळ करण्याची कशी छान संधी उपलब्ध

होते आणि दहा मिनिटांत सुरळीत होऊ शकणाऱ्या गुंत्यात तासन् तास आपण आणि आपल्याबरोबर सगळ्यांना अडकवून टाकण्यात काय मजा असते ते या स्विस लोकांना कधी कळणार देव जाणे! केवढया एका राष्ट्रीय आनंदाला ते मुकतात हे बिचाऱ्यांना माहीतही नाही. त्यासाठी या भारतमातेच्या कुशीत जन्म घेण्याची पुण्याईच करावी लागते.

लुगींकडे दोन दिवस राहून झालं होतं. ते शनिवार-रविवार होते. लुगींना सुट्टी होती. तिसरा दिवस सोमवार होता. लुगींना कामावर जायचं होतं. शिवाय याच दिवशी रात्रीच्या ट्रेनने आम्हाला रोमकडे प्रयाणही करायचं होतं.

लुगींनी सुचवलं, 'तुम्ही आज आपले आपण फिरा. सामानाची चिंता करू नका. मी रात्री सामान घेऊन तुमच्या गाडीवर येतो.' दोन दिवस आम्ही आल्प्सच्या शिखरांवर गेलो होतो. दोन दिवशी आल्प्सने आम्हाला दोन निरनिराळे अनुभव दिले होते. एक स्वच्छ सूर्यप्रकाशाचा आणि दुसरा धुक्यात हरवलेल्या दिवसाचा. दोन्ही दिवस अविस्मरणीय ठरले होते. तरी अजूनही पर्वतातच जावंसं वाटत होतं. म्हणून आम्ही टुरिस्ट ऑफिसात जाऊन टिटलिस अथवा जुंगफ्राऊच्या कंडक्टेड टूरची चौकशी केली.

पण तिसऱ्या दिवशी मात्र आमचं नशीब जोरावर नव्हतं. आदल्या दिवशीच्या ढगाळ, थंड वातावरणामुळे टिटलिस आणि जुंगफ्राऊ या दोन्ही शिखरांवर हिमवृष्टी होऊन वर जाण्याचे रस्तेच बंद झाले होते.

नाइलाजाने आम्हाला आल्प्सचा नाद सोडावा लागला. मग ठरवलं - जिनिव्हा. हा अगदी आयत्या वेळचा निर्णय होता. जिनिव्हा का ठरवलं, बर्न का नाही, या प्रश्नाला काहीही, सयुक्तिक उत्तर नाही. पण मग अशा प्रवासाची हीच तर मजा असते. आणि खरं तर अख्ख्या स्वित्झर्लंडमध्ये कुठेही फिरलं तरी आपण एखाद्या मोठ्या बागेतून फिरत आहोत असाच अनुभव येतो. वास्तविक जिनिव्हाला जाण्या-येण्यातच चांगले पाच-सहा तास मोडणार होते. प्रत्यक्ष जिनिव्हात फारच थोडा वेळ मिळणार होता. शिवाय 'जिनिव्हा' हे परिषदांचं शहर आहे. अनेकांनी सांगितलं होतं, 'तिथे जाऊन काय पाहणार? लेक जिनिव्हाशिवाय तिथे पाहण्यासारखं काही नाही.' पण म्हणून काय झालं? स्विस रेल्वेमध्ये खिडकीपाशी बसून बाहेरचा निसर्ग पाहत बसणं हाही एक निखळ आनंदाचा अनुभव असू शकतो.

जिनिव्हाला फुलांचं घड्याळ, इंग्लिश गार्डन, बोटिंग या प्रवाशांना नेहमी दाखवल्या जाणाऱ्या गोष्टींवर टिक मारली आणि संध्याकाळी काळोख पडल्यावर झुरिच स्टेशनात पोहचलो.

ठरल्याप्रमाणे लुगी सामान घेऊन आले होते.

सामान गाडीत चढविलं. जागा पकडल्या. गाडी सुटायला अजून अवकाश होता. आम्ही लुगींचा निरोप घेत होतो.

फक्त दोनच दिवसांचा सहवास पण मैत्रीच्या धाग्यांची ताकद काळावर अवलंबून नसतेच मुळी. कधी कधी वर्षानुवर्षे शेजारी राहणारी माणसंही 'परिचित' या संज्ञेच्या पलीकडे जात नाहीत. तर दोन दिवसांच्या सहवासानेही घट्ट मैत्री जुळू शकते. आमचं लुगींच्या बाबतीत तसं झालं होतं. त्यांनी आम्हाला खूपच आपुलकीने वागवलं होतं. आम्ही त्या दोन दिवसांत त्यांच्या घरात घरच्यासारखे वागलो होतो. ते वर्षानुवर्ष एकटे राहतायत. त्यांनी कुटुंब केलं नसलं तरी त्यांना माणसांची ओढ होती हे स्पष्टच दिसत होतं. साधी सकाळच्या चहाची गोष्ट. आम्ही दोन दिवस तिथे होतो तेव्हा त्यांना सकाळी उठल्याबरोबर गरम गरम चहाचा कप मिळत होता. आपल्या

आजूबाजूला आपली काळजी घेणाऱ्या 'आपल्या' चार माणसांचं कुटुंब असणं हेही सुख केवढं मोठं असतं, हे असं कुटुंब ज्याला नसतं त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं कीच कळतं. किंबहुना सर्वच सुखांच्या बाबतीत माणसाची 'अतिपरिचयात् अवज्ञा' अशी अवस्था असते. ते नाहीसं झालं कीच त्याच्या आस्तित्वाची जाणीव होते! आम्ही निघत असताना लुगींच्या डोळ्यात पाणी का आलं हे कळणं कठीण नव्हतं.

आमच्या दृष्टीने स्वित्झर्लंडच्या अनुभवाइतकाच लुगींचा सहवासही गोड आणि अविस्मरणीय ठरला होता.

भारतात युरेलचा जो 'सेव्हर पास' दिला जातो, तो वास्तविक फर्स्ट क्लासचा असतो. पण युरोपातील काही रात्रीच्या गाड्यांना मुळी फर्स्ट क्लासचे डबेच नसतात. त्या गाड्यांतून प्रवास करायचा असला तर तुम्हाला फर्स्ट क्लासचा पास असला तरी सेकंड क्लासनेच प्रवास करावा लागतो. आमची झुरिचहून रोमला जाणारी गाडी अशी फर्स्ट क्लास नसलेली होती. त्यामुळे आम्ही सेकंडमध्ये होतो. पण आपण सेकंडमध्ये आहोत याचं बिल्कुल दुःख वाटू नये इतक्या सोयी आणि सुविधा या गाडीत होत्या. झोपायला (न मागता आणि कोणताही जादा आकार भरावा न लागता) दिल्या गेलेल्या चादरी, पलंगपोस आणि उशा पांढऱ्या स्वच्छ होत्या. प्रत्येक प्रवाशासाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची बाटली आणि एकेक ग्लास ठेवलेला होता. सहा प्रवाशांनी एकत्र झोपण्याची सोय होती. वरच्या बर्थवर चढण्यासाठी फोल्डिंग शिडी होती. डब्यातच आरशांची सोय होती. प्रत्येक प्रवाशासाठी झोपेतून उठल्यावर फ्रेश वाटावं म्हणून कागदाचा कोलन वॉटर मारलेला टॉवेल एका कागदाच्या पिशवीत बद करून ठेवलेला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर लागणारा चहा किंवा कॉफी आणि नंतरचा नाश्ताही फुकट (म्हणजे तिकिटाच्या किंमतीत) होता. गाडीत असलेला रेल्वे कर्मचारी तर इतका आतिथ्यशील आणि हसरा होता, की पाच मिनिटांच्या सहवासात तो तुम्हाला आवडलाच समजा.

'सर, तुम्ही तुमचा पासपोर्ट आणि तिकीट माझ्याकडे देऊन ठेवा. आपण अपरात्री केव्हातरी स्वित्झर्लंडची सरहद्द ओलांडून इटलीत प्रवेश करू, त्यावेळी तुम्ही गाढ झोपेत असाल. मी तुमचा पासपोर्ट, तिकीट इटालियन अधिकाऱ्यांना दाखवीन, बहुधा मग ते मुद्दाम तुम्हाला उठवणार नाहीत.' अतिशय मृदू स्वरात केलेली विनंती. हे करण्याने जणू त्याचाच काही फायदा होणार होता... शिवाय या सेवेसाठी कोणत्याही 'टिप' ची अपेक्षा नाही.

स्वित्झर्लंडने आदरातिथ्य करणं हा 'धंदा' नव्हे व्यवसाय बनवला आहे हेच खरं. रोम सकाळी सव्वानऊला येणार होतं. पण सकाळी साडेसहालाच जाग आली. गाडीने नुकतंच फ्लॉरेन्स स्टेशन सोडलं होतं. बाहेर उजाडूही लागलेलं होतं. उठलो, तोंड धुतलं, हसतमुखाने दिलेला चहा घेतला आणि खिडकीतून बाहेर पाहू लागलो.

# इतिहासाच्या खुणा

**इ**टली हा देश युरोपात मोडत असला तरी तो आल्प्स पर्वताच्या दक्षिणेला आणि भूमध्य समुद्राच्या जवळ आहे. त्यामुळे हवामान युरोपच्या मानाने उष्ण म्हणावं असंच आहे.

फ्लॉरेन्स ते रोम हा प्रवास पुणे ते मुंबई या प्रवासासारखाच आहे. वेळ साधारणपणे तीन-साडेतीन तास. गाडी कायम एक मोठा घाट उतरते. पुण्या-मुंबईसारखे या प्रवासात खूप बोगदे लागतात. इतके की, अकरा-बारा बोगदे मोजल्यावर मी मोजणं सोडून दिलं. घाटात मध्ये मध्ये डोंगराच्या, जंगलाच्या कुशीत वसलेली छोटी छोटी गावं दिसतात.

आणि बघताबघता आपण रोमला कधी येऊन पोहोचतो समजतच नाही.

लक्षाधीश नव्हे, अगदी कोट्याधीश होण्याचा सर्वात सोपा मार्ग तुम्हाला हवा आहे?... तर इटलीला जा आणि तुमच्याकडले डॉलर्स इटालियन लिरे या चलनात बदलून घ्या. एका डॉलरला साधारणपणे ११५० लिरे या भावाने फक्त ८७ डॉलर बदललेत की तुम्ही इटालियन चलनात फाटकन लाखोश्री बनता. आपल्या एका रुपयाला चांगले ३७-३८ लिरे मिळतात. आपल्या एक हजार-पाच हजार रुपयांची नोट सर्वसामान्य माणूस फार जपून हाताळतो. तिथे दहा-दहा हजारांच्या नोटा सहजपणे हाताळण्याची सवय करून घ्यावी लागते. आमच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मी रोमला पोहोचल्यावर आधी चलन बदलून लक्षाधीश झालो. हातातल्या नोटा पाहून खूप समाधान वाटलं. नंतर आठवलं, आपल्या एका बॅगेचं कुलूप हरवलं आहे. हॉटेलचा ठावठिकाणा शोधण्यापूर्वीच कुलूप घेऊन टाकायचं ठरविलं. तिथे स्टेशनवर विविध तऱ्हेची दुकानं असतात. एका स्टोअरमध्ये गेलो. बॅगेसाठी एक छोटंसं कुलूप निवडलं आणि विक्रेत्या बाईला खुणेनंच त्याची किंमत विचारली. बाईने ओळखलं, गिऱ्हाईकाला इटालियन भाषा येत नाहीये. तिने खाणाखुणांच्या भरीस न पडता सरळ कागदावर त्या कुलुपाची किंमत लिहून तोच माझ्यासमोर धरला.

लिरे ३०००/- फक्त.

एका अगदी छोट्या कुलुपाची किंमत ३००० लिरे होती! एकूण काय, लंकेत सोन्याच्या विटा मिळून काही फायदा नसतो हेच खरं.

'रोम एका दिवसात बाधलं गेलं नाही' अशी इंग्लिशमध्ये म्हण आहे. कांद्यामध्ये जसे एकावर एक पापुद्रे असतात तसे रोम शहरावर इतिहासाचे पापुद्रे चढलेले आहेत. रोमखेरीज उर्वरित युरोपच्या इतिहासात इसवीसनापूर्वीच्या काळासंबंधी सांगण्यासारखं काही नसलं तरी बेथलेहेममध्ये जीझस ख्राइस्टने पहिला टाहा फोडण्यापूर्वीच रोम ही एका प्रचंड साम्राज्याची वीस लाखाहून जास्त लोकवस्ती असलेली राजधानी होती. रोमच्या इतिहासातल्या त्या सुवर्णकाळाच्या अनेक खुणा दाखविणारा एक भाग आजच्या रोममध्ये जतन करून ठेवलेला आहे. आम्ही तोच भाग प्रथम पाहिला. रोमच्या या भागाला फोरम असं म्हणतात. आपल्या दादरएवढा तरी हा परिसर आहे. हा इसवीसनापूर्वीच्या रोमचा मुख्य चौक. याच्या दोन टोकाला दोन कमानी आहेत. या टायटस आणि टाबेरियस नावाच्या दोन सम्राटांनी आपले युध्दातले विजय साजरे करण्यासाठी उभारल्या. या दोन टोकांमध्ये अनेक छोटे-मोठे अवशेष पसरलेले आहेत.


अशा भग्नावशेषांच्या जागा मी जेव्हा पाहतो तेव्हा डोळ्यांना दिसणाऱ्या गोष्टी पाहून झाल्या की मी डोळे मिटून घेतो. मग माझ्या अंतःचक्षूंसमोर तो इतिहास जागा होतो. मी जणू भूतकाळात जातो. रोमने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करण्यापूर्वीचा तो काळ होता. त्या काळात इटालियन लोकही पृथ्वी आणि आकाशात दिसणाऱ्या सूर्य, चद्र, शनी आदी ग्रहगोलांना देवता मानत असत. आता मी डोळे मिटून घेतल्यावर मला त्या जागी अशा विविध देवतांची मंदिरं दिसू लागली. त्या काळातली गजबजलेली बाजारपेठ दिसू लागली. त्या काळच्या ज्युलियस सीझर, ऑगस्टस, नीरो अशी विविध सम्राटाच्या विजयी फौजांचे उधळणारे घोडे दिसू लागले. गुलामांचे तांडे दिसू लागले. सारा परिसर डोळ्यांसमोर सजीव झाला.

फोरमच्या शेजारीच कोलोस्सियम नावाची एक भव्य वास्तू अवशेष स्वरूपात उभी आहे. पन्नास हजार माणस एकावेळी बसू शकतील असं इसवी सनाच्या पहिल्या शतकात बांधलेलं हे स्टेडियम. याच्या प्रवेशद्वाराला म्हणे त्या काळी सोनं लावलेलं होतं. आज ते प्रवेशद्वार मोडकळलेल्या अवस्थेत कसंबसं उभं आहे. रोमच्या नागरिकांच्या मनोरंजनासाठी या भव्य वास्तूत त्या काळात जनावरांच्या साठमाऱ्या लावल्या जात. रोमच्या सम्राटांचा ख्रिस्ती धर्मावर राग होता त्या काळात याच स्टेडियममध्ये ख्रिस्ती लोकांना भुकेलेल्या वाघ-सिंहांच्या तोंडी दिलं जाई. हजारो रोमन्स तो प्रकार मिटक्या मारीत पाहत. अशा क्रूर वन्य पशूना त्या स्टेडियमच्या तळघरात डांबून ठेवलेलं असे. तळघरांचे ते भागही आज उघडे पडलेले आहेत. या भव्य वास्तूला बाहेरून प्रचंड उंचीची तटबंदी आहे आणि त्या तटबंदीवर रोमन साम्राज्य कसकसं वाढत गेलं हे दाखविणारे त्या काळातले नकाशे आहेत.

शहर म्हणून रोमच्या वैभवाला उतरती कळा लागली सम्राट कॉन्स्टन्टाईनच्या कारकीर्दीत. इसवी सन ३१५ मध्ये त्याने आपली विजयी कमान उभारली. ती आजही तिथे पाहायला मिळते. नंतर इसवी सन ३२३ मध्ये त्याने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायाने त्याच्या पाठोपाठ अनेक रोमवासियांनी ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली आणि बघता बघता रोम ख्रिस्ती धर्माचं सर्वात पवित्र स्थान बनलं. ख्रिस्ती धर्मातील कॅथॉलिक या पंथाचे

सर्वोच्च धर्मगुरू पोप आज याच शहरात राहतात. धर्मपीठाच्या त्या वास्तूकडे आम्ही दुसऱ्या दिवशी वळलो.

ख्रिस्ती लोकांचं धर्मपीठ असलेल्या जागेला 'व्हॅटिकन सिटी' असं म्हणतात. केवळ एक चौरस मैल क्षेत्रफळ असलेल्या या भूभागावर ख्रिस्ती धर्माच्या रोमन कॅथॉलिक या पंथाचे सर्वोच्च नेते पोप यांची सत्ता चालते. या भूभागाला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा देण्यात आला आहे. व्हॅटिकनचं स्वतःचं पोस्ट ऑफिस आहे. त्यांच्यातर्फे त्यांचे स्वतंत्र स्टॅम्प्स काढले जातात. व्हॅटिकनमधील सर्वात महत्त्वाची वास्तू सेंट पीटरचा चौक आणि चर्च.




*कोलॅसियम · इसवी सनाचे पहिले शतक*

सेंट पीटरचा चौक (स्क्वेअर) चौकोनी नाही, ती एक खूप मोठी म्हणजे शिवाजी पार्कच्या दुप्पट-तिप्पट आकाराची लंबवर्तुळाकृती मोकळी जागा आहे. त्याच्या मध्यभागी एक खूप उंच स्तंभ आहे आणि त्याच्या दोन बाजूंना दोन भव्य कारंजी आहेत. त्या मोकळ्या जागेच्या परिघावर उंच स्तंभांवर उभारलेली एक अर्धवर्तुळाकृती भव्य कमान आहे. कमानीच्या प्रत्येक स्तंभावर ख्रिस्ती धर्मातील महत्त्वाच्या संतांचे पुतळे आहेत. चर्चच्या पायऱ्यांवर उभं राहून या अर्धवर्तुळाकृती कमानीकडे पाहिलं तर जणू काही तिथे येणाऱ्या सर्वांना आलिंगन देण्यासाठी संत पीटरने आपले बाहू फैलावले आहेत असा भास होतो. स्थापत्याची ही कल्पना बर्निनी या मध्ययुगीन कलाकाराची.

सेंट पीटरच्या चौकात मी उभा होतो तेव्हा माझ्या मनात विचारांनी गर्दी केली होती. एकीकडे मी त्या वास्तूतील अप्रतिम शिल्पकृतींच्या सौंदर्याचा आस्वाद घेत होतो. आणि त्याच वेळी

व्हॅटिकन . पोपचे राज्य



प्रवासाला निघण्यापूर्वी त्या वास्तूच्या इतिहासाविषयी वाचन केलेलं असल्यामुळे जीवनविषयक काही मौलिक विचारही मनात उभे राहत होते. कोणी सांगावं, ती जगातील सर्वात जास्त अनुयायी असलेल्या धर्माच्या सर्वोच्च पीठाची वास्तू होती या गोष्टीचाही माझ्या मनावर परिणाम झाला असावा. मनात येत होतं, मानवी जीवनात 'नशीब' या विचाराला कितपत महत्त्व द्यायचं ? नशीब ही संकल्पना मानवी प्रयत्नांच्या आड येते का ? ही मानवाला न सुटलेली कोडी आहेत. नाव काहीही द्या, नशीब म्हणा, दैव म्हणा, मानवाच्या भवितव्यावर अधिसत्ता गाजवणारी मानवाहून श्रेष्ठ अशी एखादी शक्ती म्हणा - ती शक्ती 'देव' या संकल्पनेत अध्याहृत आहे आणि ती भक्तीने प्रसन्न होणारी असते असं माना किंवा ती भक्तीनेही अपरिवर्तनीय अशी 'नियती' असते असं समजा - ही सगळी जीवनातल्या अनिश्चिततेला विविध प्रवृत्तीच्या माणसांनी दिलेली नावं आहेत. ही अनिश्चितता एवढी विचित्र आहे की जीवन कोठे कसं वळण घेईल हे सांगता येत नाही आणि जे व्यक्तिजीवनात आढळतं तेच समाजजीवनातही आढळतं. हे सारे विचार मनात यायचं कारण मी ज्या जागी उभा होतो त्या जागी घडलेला इतिहास. ज्या सेंट पीटरच्या नावाने आज ही वास्तू ओळखली जाते, त्या सेंट पीटरला इसवी सन ६८ मध्ये याच जागी त्या काळचा रोमन सम्राट नीरो याने वधस्तंभावर चढवलं होतं. त्या काळात अशी शिक्षा जाहीर स्वरूपात दिली जाई. नीरोला ही कल्पना नसेल की पुढली हजारो वर्षं या स्थळाला पीटरच्या नावाने एका पवित्रस्थळाचा दर्जा मिळेल आणि नीरोची एक क्रूर सम्राट म्हणून आठवण काढली जाईल ! नियतीच्या लीलेचं ते उदात्त उदाहरण पाहून असे विचार माझ्या मनात न येणंच अशक्य होतं.

अलीकडेच आयव्हरी कोस्ट या देशात बांधल्या गेलेल्या याच चर्चच्या भ्रष्ट नकलीमुळे ही चर्च जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी चर्च ठरली आहे. पण आकाराचा मुद्दा सोडला तर ही जगातील सर्वात महत्त्वाची चर्च आहे. या चर्चची पायाभरणी १५०६ साली झाली होती आणि ती १२० वर्षं बांधली जात होती. इसवी सन १७०० मध्ये एक इमारत म्हणून तिची किंमत साडेचार कोटी डॉलर्स केली गेली होती. तिच्या भव्यतेची यावरून कल्पना यावी.

आतापर्यंत चाळीस पोप या चर्चमध्ये होऊन गेले. त्यापैकी बहुतेकांचे अंत्यसंस्कारही याच चर्चमध्ये झाले आणि त्यांच्या समाध्याही याच ठिकाणी आहेत.

ही चर्च मध्ययुगीन वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. चर्चमध्ये ७५० खांब आहेत आणि प्रत्येक खांबावर नक्षीकाम केलेले आहे. आत कितीतरी भव्य शिल्पं आहेत. मायकेल ॲन्जेलोचं 'पिएटा' नावाचं जगप्रसिध्द शिल्प याच चर्चमध्ये आहे. भगवान येशूंना क्रूसावर ठार मारण्यात आल्यानंतर त्यांचा मृतदेह मांडीवर घेऊन शोक करणाऱ्या मेरीचा तो पुतळा आहे. प्राणहीन झालेलं आपल्या मुलाचं शरीर मांडीवर घेतलेल्या त्या मातेच्या चेहऱ्यावर शोक जरूर आहे पण त्याचबरोबर मानवी जीवन व्यापारातील नश्वरपणाची जाण आल्यावर येणारं एक तटस्थ औदासीन्यही आहे. प्रेमाची शिकवण देण्याचा एकमेव 'गुन्हा' केलेल्या आपल्या थोर पुत्राचा हाल हाल करून केला गेलेला मृत्यू पाहण्याचं प्राक्तनात आल्यावर झालेल्या वैफल्याचा एक प्रकारचा विरागी स्वीकार केल्याचा मायकेल ॲन्जेलोने दाखवलेला मेरीच्या चेहऱ्यावरील भाव अप्रतिम आहे.

मायकेल ॲन्जेलोने हे शिल्प तयार केलं त्यावेळी तो केवळ पंचवीस वर्षांचा होता.

या शिल्पाचं आणखी एक मजेदार वैशिष्ट्य आहे. यात येशूंची आई मेरी ही जेमतेम पंचविशीची तरुणी दाखवली आहे, तर येशू पन्नाशीच्या पुढच्या वयाचे दाखवले आहेत. मायकेल ॲन्जेलोसारख्या थोर कलाकाराच्या हातून इतकी ढोबळ 'चूक' घडणं शक्य आहे का? कलेचे इतिहासकार या प्रश्नाचं मोठं मजेशीर उत्तर देतात. असं म्हणतात की खुद्द मायकेलची आई त्याच्या बालपणी म्हणजे तिच्या वयाच्या पंचविसाव्या वर्षाच्या आसपास मरण पावली होती. त्यामुळे त्याच्या मनात 'आई'ची प्रतिमा ही नेहमीच पंचविशीच्या तरुणीची होती.

आम्ही व्हॅटिकन पाहायला गेलो तो बुधवार होता. व्हॅटिकन पाहायला आलेल्या सर्व भाविकांना दर बुधवारी 'दर्शन' द्यायचा पोपचा शिरस्ता आहे. तो समारंभ चांगला तीन-साडेतीन तास चालतो. अक्षरशः जगाच्या कानाकोपऱ्यातून अनेक भाविक या कार्यक्रमाला गर्दी करतात. सहज सुमारे नऊ-दहा हजारांचा समुदाय जमतो. त्यात साती खंडातले विविध वंशाचे लोक गोळा होतात. समारंभाचं कामकाज पाच-सहा भाषांतून चालतं. गटागटाने आलेल्या ख्रिस्ती लोकांना त्यांचा उल्लेख करून पोप आशीर्वाद देतात.

भव्यपणासाठी हा समारंभ बघण्यासारखा असतो. हा समारंभ पाहायला पास लागतो.

मूळ वसईचे आणि आता व्हॅटिकनमध्ये काम करणारे एक धर्मगुरु फेलिक्स मच्याडो यांनी आमची पासाची सोय केलेली होती. विविध धर्मांचा अभ्यास करून त्यांच्यामध्ये परस्पर संवाद घडवून आणण्याचा प्रयत्न करणारे एक कमिशन पोपनी निर्माण केलेलं आहे. फादर मच्याडो त्या कमिशनमध्ये काम करतात. त्यांचा हिंदू धर्माचा

अभ्यास आहे. किंबहुना त्यांचा पीएच. डी. प्रबंध ज्ञानेश्वरीच्या अभ्यासावर आधारित आहे. भारताच्या प्राचीन परंपरा आणि इतिहास यांचे अभ्यासक आणि अभिमानी असलेले फादर मच्याडो आपल्या तेथल्या सहकाऱ्यांना ठणकावून सांगतात - 'येशू ख्रिस्त आणि ख्रिस्ती धर्म हा अखिल मानवजातीचा अमोल ठेवा आहे. त्याला युरोपियन किंवा इटालियन एवढ्या संकुचित आकाराचा बनवू नका. आणि तसं समीकरणही मांडू नका.

युरोपबाहेरच्या एका समृद्ध संस्कृतीचा वारसा घेऊन मी येथे आलेलो आहे. मी इथे ख्रिस्ती धर्माचं अध्ययन करायला आलो असलो तरी माझ्या भारतीय संस्कृतीपाशी तुम्हाला देता येण्यासारखंही खूप काही आहे हे विसरू नका.' भारतात हिंदू धर्म केव्हा आला - की मुळातल्या इथल्या संस्कृतीतूनच उत्पन्न झाला हे सांगणं कठीण आहे. इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म भारतात केव्हा आले हे इतिहासाला ज्ञात आहे. आजच्या या दोन्ही धर्मांच्या अनुयायांचे पूर्वज हिंदूच होते. त्यामुळेच पूर्वजांनी इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यापूर्वीच्या आपल्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा या धर्माच्या आजच्या अनुयायांनी हिंदूंइतकाच आदर बाळगला आणि हिंदूंमधल्या मूलतत्त्ववाद्यांनीही 'धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर' असल्या आचरट कल्पना सोडल्या तर आजचे बरेचसे धार्मिक झगडे आपोआप मिटतील आणि देश एकसंध व्हायला मदत होईल असं मला फादरांशी चर्चा करताना राहून राहून वाटत होतं.

त्या दिवशी संध्याकाळी काळोख पडू लागल्यावर व्हॅटिकनमधल्या एका छोट्याशा 'उडप्या'चं वाटावं अशा हॉटेलच्या बाहेर फूटपाथवर टाकलेल्या लाकडी खुर्च्यांवर बसून कॉफी पिता पिता भारतीय समाज आणि युरोपीय समाज, पश्चिम आणि पूर्व यांची संस्कृती यावर फादर मच्याडो यांच्या बरोबर केलेली चर्चा हा माझ्या रोमच्या वारीतला एक अविस्मरणीय अनुभव आहे.

# तळ्यात मळ्यात

**आ**मचा पुढचा मुक्काम होता - व्हेनिस.

व्हेनिस हे एक जगातलं अद्वितीय शहर आहे म्हटलं तर त्यात तिळभराचीही अतिशयोक्ती नाही. तसं प्रत्येकच शहर अद्वितीय असतं. एकासारखं दुसरं शहर असणं कसं शक्य आहे?


पण व्हेनिस खरोखरच एकमेवाद्वितीय आहे. ऐन विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात एकही मोटरकार नसलेलं शहर पृथ्वीच्या पाठीवर असू शकेल का? -- आहे, आणि ते म्हणजे व्हेनिस. तिथे मुळी मोटरकार्सना पूर्ण मज्जाव आहे. तुम्ही जर कार घेऊन आला असाल तर तुम्हाला ती शहराबाहेरच्या एका भव्य कारपार्कमध्ये पार्क करून ठेवावी लागते. शहर सोडताना ती तुम्ही परत घ्यायची. जवळ जवळ दहा चौरस किलोमीटर्सहून जास्त क्षेत्रफळात पसलेल्या या शहराचे सर्व व्यवहार बोटीने चालतात. या शहरात रस्ते नाहीतच. सगळी वाहतूक होड्यांतून चालते. इथली मुलं बोटीने शाळेत जातात आणि चाकरमाने बोटीनेच हाफिसात जातात. लग्नाची वरात पण पाण्यावरून आणि मयताची (अंत्ययात्रा) मिरवणूकही पाण्यावरूनच. इथले गल्ली, बोळ, हमरस्ते सगळं सगळं काही कालवेच आहेत.

हे शहर गेल्या पाचशे वर्षात बदललंच नाही. पाचशे वर्षांपूर्वी कोलंबसाने त्या ऐतिहासिक जलप्रवासासाठी आपली गलबतं हाकारली तेव्हापासून, त्याच्या पूर्वीपासून हे शहर असंच आहे. तेलाच्या दिव्यांऐवजी वीज आली आणि शिडाच्या जहाजांऐवजी डिझेलच्या इंजिनांवर चालणाऱ्या बोटी आल्या. एवढाच काय तो बदल.

आम्ही सकाळी व्हेनिसला पोहोचलो. आम्हाला तिथे राहायचं नव्हतं. रेल्वे स्टेशनवरच्या लॉकरमध्ये सामान टाकलं आणि स्टेशनबाहेर आलो. समोरच शहरातला मुख्य हमरस्ता म्हणजे कालवा पसरलेला होता. सेंट मार्कचा चौक या शहरातील मुख्य चौकात जाणाऱ्या 'बसेसचा स्टॉप' म्हणजे बोटींचा धक्का स्टेशनबाहेरच होता. आम्ही दोन नंबरची 'लिमिटेड बोट' पकडली.

या ग्रँड कॅनॉलमधून बोटीने फिरणं हाही एक निराळाच अनुभव असतो. असं म्हणतात की तुम्ही आशावादी आहात की निराशावादी ते तुमच्या भाषेवरून ओळखता येतं. माझा पेला अर्धा रिकामा आहे असं म्हणतो तो निराशावादी. पण त्याच पेल्याकडे बघून 'वा, माझा अर्धा पेला भरलेला आहे की' असे उद्‌गार काढतो तो आशावादी असं म्हणतात. ग्रँड कॅनॉलमधून आपली बोट पुढे पुढे सरकू लागली की मात्र आपण पार गोंधळून जातो. सर्वत्र पाणीच पाणी आणि त्यात मध्ये मध्ये इमारती दिसतात. कधी वाटतं श्रीकृष्णाच्या द्वारकेसारखी ही नगरी पाण्यातून वर येतेय. तर कधी वाटतं ही नगरी आता आपल्या डोळ्यादेखत पाण्यात बुडणार! आम्ही गेलो त्यावेळी व्हेनिसला पाऊस पडत होता. त्यामुळे तर या आधीच गोंधळात टाकणाऱ्या

*व्हेनिसमधील 'गल्ली'*



भासात आणखी एका भासाची भर पडली होती. वाटत होतं, पूर आलाय. पुराचं पाणी शहराच्या गल्ल्या-बोळांमध्ये शिरलंय. पूर ओसरला की कदाचित खालचं शहर दिसू लागेल.

एकूण काय, व्हेनिस तुम्हाला प्रथमदर्शनीच हे असं चकवा देतं.

व्हेनिस शहराचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. रोमन साम्राज्याच्या ऐन बहराच्या काळात इसवी सनाच्या सुरुवातीला जेव्हा रोम हे एक भरभराटीला आलेलं शहर होतं तेव्हा व्हेनिस अस्तित्वातही आलं नव्हतं. तिथे ११८ छोटी छोटी बेटं होती आणि आजूबाजूला सर्वत्र दलदल होती. रोमन साम्राज्य कोसळलं. रोमचा ऱ्हास झाला आणि व्हेनिस अपघाताने वसलं. तिथे संपूर्ण दलदल असल्यामुळे, जमीन खारी असल्यामुळे शेती होणं अगदी अशक्य होतं. म्हणून व्हेनिसचे नागरिक उपजीविकेसाठी शेजारच्या समुद्राकडे वळले आणि त्यातच त्यांचं भाग्य फळफळलं. मध्य युगात व्हेनिस हे युरोपचं पूर्वेच्या भारत-चीनसारख्या महत्त्वाच्या देशांशी व्यापार करण्याचं महत्त्वाचं केंद्र बनलं. व्हेनिसची एवढी भरभराट झाली की शेक्सपियरसारख्या दूर देशच्या प्रतिभावंताने आपल्या दोन नाटकांसाठी या शहराची पार्श्वभूमी निवडली.

व्हेनिस शहरात १५० कालव्यांचं जाळं आहे आणि त्यांच्यावर एकूण ४०० पूल आहेत. प्रत्येक पूल ही एक कमान आहे.

व्हेनिस शहराच्या बाहेर समुद्रात एक जमिनीचा लांबच लांब अरुंद पट्टा आहे. ती व्हेनिसची चौपाटी, म्हणजे लिडो बीच. या बेटावरच व्हेनिसचा विमानतळ आहे. या बेटावर महागडी हॉटेलंही आहेत आणि दुकानंही आहेत.

व्हेनिसच्या बाहेर समुद्रात मुरानो, बुरानो, टॉरसेल्लो अशी छोटी छोटी बेटं आहेत. आम्ही त्यातल्या मुरानो बेटावर गेलो. या बेटावर वितळवलेल्या काचेपासून सुंदर-सुंदर आकर्षक वस्तू, खेळणी बनवण्याचा पिढीजात व्यवसाय करणारे कलाकार आहेत. ही कला मध्य युगात व्हेनिसचे लोक अरबांपासून शिकले. पुढे काही शतकं त्यांनी ही कला एखाद्या व्यावसायिक गुपितासारखी इतर युरोपियन राष्ट्रांपासून दडवून ठेवली.

मुरानोच्या धक्क्याला आपली बोट लागली की पाच-दहा तरी एजंट्स 'आमच्या दुकानात या. प्रत्यक्ष तुमच्या डोळ्यांसमोर वस्तू बनवून दाखवतो.' म्हणत आपल्याला त्यांच्या दुकानात खेचून न्यायला येतात. आपल्याला त्यांच्यापैकी एखाद्याबरोबर जावंच लागतं. तो आपल्याला एखाद्या कोंदटलेल्या जागी घेऊन जातो. आत कोळशाची भट्टी पेटलेली असते. वरच्या भांड्यात वितळलेली तप्त काच असते. साखरेच्या घट्ट पाकाची तार निघावी तशी तो कलाकार एका चिमट्याच्या टोकाने वितळलेल्या काचेची तार काढतो आणि ती थंड होऊन घट्ट व्हायच्या आत दुसऱ्या हातातल्या चिमट्याने त्या काचेला आकार देत देत क्षणार्धात तो त्यापासून चौखूर उधळलेला घोडा करून आपल्यासमोर ठेवतो.

एकीकडे भट्टीत कोळसा टाकत-टाकत त्याची बायको तोडक्या-मोडक्या इंग्रजीत कॉमेंटरी देते. कलाकार घोडा बनवत असताना प्रवासी पटापट फोटो काढतात. पाच मिनिटात सारा खेळ संपतो. आत्ताच आपण तयार केलेली वस्तू गिऱ्हाइकं घेतील अशा आशेने तो कलाकार गिऱ्हाइकांकडे पाहतो, पण त्याने सांगितलेली किंमत एवढी जास्त असते की बरेचसे टूरिस्ट्स एक फुकट पाहायला मिळालेला खेळ असं समजून त्याच्या समोरून निघून जातात. कलाकार हिरमुसला होऊन एजंट पुढलं गिऱ्हाईक कधी आणतोय याची वाट पाहत बसतो.

सर्व ठिकाणच्या हस्तव्यवसायांची एकच रडकथा आहे.

इटालीचा निरोप घेण्यापूर्वी एका प्रसंगाचा उल्लेख मला केलाच पाहिजे. या प्रसंगाचा उल्लेख मी काहीशा अपराधीपणाच्या भावनेतून करत आहे. झालेल्या घटनेबद्दल वाईट वाटतं पण त्या बाबतीत काही इलाज नव्हता असंही वाटतं.

युरोपात येण्यापूर्वी युरोपविषयी वाचलेल्या सर्व पुस्तकांत इटालीविषयी एक इशारा माझ्या वाचनात आला होता. फ्रॉमरनेही हा इशारा दिला होता. युरोपात माझ्यापूर्वी जाऊन आलेल्या परिचितांनी, मित्रांनी बजावून सांगितलं होतं. झुरिच सोडताना लुगींनीही तेच सांगितलं होतं. इतकंच काय, फादर मच्याडोंसारख्या व्यक्तीनेही आम्हाला सावध केलं होतं. सगळ्यांचं सांगणं एकच होतं - 'इटालीत जपून राहा. खिसा-पाकीट सांभाळा. आजूबाजूला लक्ष ठेवा.'

व्हेनिसला आल्या आल्या सकाळीच रात्रीच्या व्हिएन्नाला जाणाऱ्या गाडीचं तिकीट काढायचं होतं. तीन-चार निरनिराळ्या खिडक्या होत्या. प्रत्येक खिडकीसमोर क्यू होता. म्हणून मी आणि शशी दोन निरनिराळ्या खिडक्यांसमोर क्यूमध्ये उभे राहिलो. हेतू हा, की ज्याचा नंबर आधी येईल त्याने तिकीट काढायचं आणि मग दुसऱ्याने आपला क्यूमधला नंबर सोडून द्यायचा. थोड्या वेळाने शशीच्या लाईनीत तिच्यामागे एक निग्रो बाई येऊन उभी राहिली. तिच्या उभं राहण्यात नागरी सफाई नव्हती म्हणा किंवा तिचं वागणं, हालचाल थोडी विचित्र होती म्हणा, मी पटकन शशीला इशारा करून सुचवलं, शशी, क्यूमधली जागा सोड. शशीला इशारा कळला आणि

ती क्यू सोडून माझ्याजवळ आली.

- वाईट गोष्ट ही झाली की माझा इशारा त्या निग्रो बाईनेही पाहिला. आणि नुसता पाहिलाच नव्हे तर त्या इशाऱ्याचा अर्थही तिच्या ध्यानात आला.

त्या क्षणी त्या बाईने माझ्याकडे ज्या नजरेने पाहिलं ती नजर मी आयुष्यात कधीही विसरणार नाही. त्या नजरेत राग होता. चीड होती. संताप होता आणि त्याचबरोबर एक अपार मूक वेदनाही होती. ती जणू नजरेने मला विचारत होती. 'का रे बाबा, माझ्या कातडीचा रंग काळा आहे म्हणून संशयाने पाहतोयस ? - तू स्वतःच्या कातडीचा रंग पाहिलायस ना आरशात ?'

पुढल्याच क्षणी माझ्या ध्यानात आलं, तिच्याही हातात माझ्यासारखाच युरेलचा पास होता. तीही माझ्याइतकीच प्रामाणिक पॅसेंजर होती.

# जर्मनी

काही व्यक्तींना त्यांच्या अगदी लहान वयातही कसं वागावं हे समजतं. उलट काही व्यक्तींना वयाची पन्नाशी उलटली, म्हणजे अर्ध अधिक आयुष्य निघून गेलं तरी शहाणपण येत नाही. आमच्या युरोपच्या प्रवासात एका बाबतीत माझी या दुसऱ्या वर्गातल्या माणसात गणना करायला हरकत नाही.

आतापर्यंत नेदरलॅण्ड, फ्रान्स, स्वित्झरलण्ड आणि इटाली असे चार देश पाहून झाले होते. युरेलच्या पंधरा दिवसांच्या पासातले दहा दिवस संपले होते. एवढ्या दिवसात मी निरनिराळ्या चार-पाच महत्त्वाच्या स्टेशन्सवर आमच्या सामानाची हलवाहलव केली होती. त्यासाठी स्टेशनवरच्या ट्रॉलींचा वापर केला होता. पण या स्टेशनवरच्या ट्रॉलींच्या बाबतीत एक साधासुधा धडा शिकायला मला जर्मनीत म्युनिकपर्यंत यावं लागलं.

काय गम्मत झाली बघा. आम्ही व्हेनिसचा निरोप घेऊन रात्रीच्या गाडीत बसलो आणि दुसऱ्या दिवशी सकाळी जर्मनीच्या म्युनिक शहरात येऊन दाखल झालो. गाडीचं ते शेवटचं स्टेशन होतं. आम्ही आमचं सामान प्लॅटफॉर्मवर उतरविलं आणि मी स्टेशनवर कोठे ट्रॉली दिसते का ते पाहू लागलो. दूरवर ट्रॉलीचा स्टॅण्ड दिसला.

युरोपातील बहुतेक सर्व स्टेशन्सवर असा ट्रॉलींचा एक स्टॅण्ड असतो. त्या ठिकाणी एकामागे एक अशा ट्रॉलीज अडकवून ठेवलेल्या असतात. प्रत्येक ट्रॉलीच्या हॅण्डलला एक फट असते. आपल्या सार्वजनिक टेलिफोन्सच्या खोकड्यांना असते तशी. आपल्याला जेव्हा टॉली हवी असेल तेव्हा आपण स्टॅण्डला अडकवलेल्या शेवटच्या ट्रॉलीच्या फटीत एक विशिष्ट नाणं सरकवायचं की एक खटक असा आवाज होतो आणि ती ट्रॉली तिच्या पुढच्या ट्रॉलीपासून मोकळी होते. मग आपल्याला हवी तिथे ती आपण नेऊ शकतो.

मी ट्रॉली स्टॅण्डकडे जाऊ लागलो. आणि मला माझ्या पुढे जेमतेम पाच-दहा हातांच्या अंतरावर एक अतिशय वृद्ध (बहुधा) जर्मन स्त्री एक रिकामी ट्रॉली त्या स्टॅण्डच्या दिशेने घेऊन जाताना दिसली. मी धावत धावत त्या म्हातारीपाशी गेलो आणि खुणेने तिच्यापाशी ती ट्रॉली मागितली. तिने माझ्याकडे पाहिलं. मला जर्मन भाषा येत नसली तरी मी ट्रॉली मागत आहे हे तिला माझ्या खाणाखुणांवरून आणि हावभावांवरून समजल्याचं तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. तरीही तिने माझ्या विनंतीकडे पार दुर्लक्ष केलं आणि ती ट्रॉली स्टॅण्डकडे ढकलीतच राहिली.

मला तिचा वेडेपणा समजेना. तिला ती ट्रॉली नको होती हे स्पष्ट दिसत होतं. पण तरीही ती परस्पर मला न देता स्वतः ती त्या स्टॅण्डपर्यंत नेऊन ठेवण्यात काय हशील होतं? आपलं काम झाल्यावर सार्वजनिक वापराची वस्तू जागच्या जागी नेऊन ठेवण्यात

शिस्त होती हे मला पटत होतं. आपल्या मुंबई आणि इतर एअरपोर्टवर आपलं काम झाल्यावर प्रवाशांनी कोठेही रस्त्यात, प्लॅटफॉर्मवर, टॅक्सी स्टॅण्डवर सोडून दिलेल्या आणि त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या माणसांच्या पायात अडथळा निर्माण करणाऱ्या ट्रॉलीज मी पाहिल्या होत्या त्यामुळे आपलं काम झाल्यावर तिने ती जागच्या जागी ठेवण्यात शिस्त होती. पण दुसऱ्या व्यक्तीला ती वस्तू हवी असताना ती स्टॅण्डवर नेऊन ठेवणं आणि त्या गरजू व्यक्तीला स्टॅण्डपर्यंत चालायला लावण्यात मात्र शिस्तीचा अतिरेक होत होता असं मला वाटलं.

तिला माझं म्हणणं कळलं नसेल असं समजून आणि माझी त्या ट्रॉली स्टॅण्डपर्यंतची खेप वाचावी म्हणून मी म्हातारीला पुन्हा एकदा खुणा करून सांगून पाहिलं. तेव्हा तर तिने खुणेनं तो ट्रॉली स्टॅण्ड दाखवून 'तिथपर्यंत ये, म्हणजे मिळेल.' असं सुचवलं. मी मनातल्या मनात त्या शिस्तीच्या अतिरेकाला कोपरापासून नमस्कार केला आणि पुटपुटलो, 'तिथपर्यंत पोचल्यावर मला तुझ्या हातातलीच कशाला, तिथे असलेली कोणतीही ट्रॉली नाही घेता येणार?'

अखेर नाइलाज म्हणून मी त्या म्हातारीपाठोपाठ त्या ट्रॉली स्टॅण्डपर्यंत पोहोचलो. आणि क्षणार्धात मला म्हातारीच्या वागण्याचा उलगडा झाला. कारण म्हातारीने आपल्या हातातली ट्रॉली तिथे आधीच उभ्या असलेल्या शेवटच्या ट्रॉलीत खोचताच तिने ट्रॉली घेताना अडकवलेलं नाणं खटकन बाहेर आलं. म्हातारीने ते खिशात टाकलं आणि ती टुकूटुकू चालू लागली. आता माझ्या डोक्यात प्रकाश पडला. आतापर्यंतच्या प्रवासात मी ट्रॉली स्टॅण्डवरून काढून घेतली होती. घेताना त्या त्या देशातलं योग्य ते नाणं खाचेत अडकवलेलंही होतं. कारण एरवी मला ती काढताच आली नसती. पण ट्रॉली परत स्टॅण्डला नीट अडकवून ठेवण्याचे कष्ट घेतले नव्हते. मी फक्त ट्रॉली त्या ठिकाणी नेऊन ठेवीत असे. ट्रॉली नीट लावून ठेवल्यावर आपलं नाणं आपल्याला परत मिळतं हे ज्ञान मला नवीन होतं. याचा अर्थ ते नाणं हे त्या ट्रॉलीचं रेल्वेने घेतलेलं भाडं नव्हतं तर ते तुम्ही जेवढा वेळ ट्रॉली वापरणार तेवढ्या वेळेपुरेसं घेतलेलं डिपॉझिट होतं!

मला एकूणच त्या व्यवस्थेचं कौतुक वाटलं. कारण ती निर्माण करणाऱ्या माणसाला मनुष्य स्वभावाचं नेमकं ज्ञान होतं. त्या व्यवस्थेत ट्रॉली वापरणाऱ्या माणसाला त्याचं नाणं परत मिळण्याची सोय करून शिस्त पाळायला आपोआपच उद्युक्त केलेलं होतं. अशी सोय नसल्यामुळे आणि आपल्या एअरपोर्ट्सवर ट्रॉली सर्व्हिस 'फ्री' ठेवलेली असल्यामुळे जो तो आपलं काम झालं की तिथेच ट्रॉली सोडून चालता होतो आणि मग त्या ट्रॉलीज पुन्हा जाग्यावर आणून ठेवायला स्वतंत्र नोकर नेमावे लागतात.

जर्मनीचं पहिलं दर्शन घडलं ते हे असं.

एकाच वेळी साऱ्या जगाच्या तिरस्काराला तसंच कौतुकाला पात्र झालेला देश म्हणजे जर्मनी. या शतकात मानव जातीला दोन वेळा युद्धाच्या खाईत लोटायला कारणीभूत झालेला आणि दोन वेळा पराभूत आणि बेचिराख झालेला; पण दोन्ही वेळा राखेतून पुन्हा जिवंत होणारा देश म्हणजे जर्मनी. हिटलर नावाचा मानवी मनाच्या क्रूर विकृतीचा नमुना मानवजातीला जर्मनीनेच पेश केला आणि विश्वाचं रहस्य उलगडून सांगणाऱ्या आइनस्टाईनच्या बुद्धिमत्तेचा नमुनाही जर्मनीचाच. ऱ्हाईनच्या पाण्यावर पोसलेला हा देश मला अगदी बालपणापासून आकर्षित करत होता. तुम्ही जर्मनीवर प्रेम करायचं की जर्मनीचा द्वेष करायचा हा तुमचा वैयक्तिक प्रश्न आहे. पण एक गोष्ट निश्चित, तुम्ही 'मेड इन जर्मनी' हा शिक्का असलेली चीज,

मग ती वस्तू असो वा माणूस, दुर्लक्षित करू शकत नाही !

जर्मनीत आम्ही म्युनिक हे मुक्कामाचं शहर केलं. म्युनिकला जर्मनीची सांस्कृतिक राजधानी म्हणतात. बघायला खूप होतं पण वेळ कमी होता. म्हणून आतापर्यंतच्या प्रवासात जाणीवपूर्वक टाळलेली एक गोष्ट आम्ही केली. आम्ही शहराची कंडक्टेड सिटी टूर घेतली. आणि फसलो.

मला कंडक्टेड सिटी टूर हा प्रकार अजिबात आवडत नाही. बरेच वेळेला जास्तीत जास्त 'पॉईंट्स' दाखवायच्या नादात ते जास्त जागा दाखवतात आणि प्रत्येक जागेवर अन्याय करतात. आणखी एक छळ असा होतो की जी वस्तू, जे स्थळ आपल्याला जास्त वेळा पहायला आवडलं असतं त्या स्थळाला ते कमीत कमी वेळ देतात आणि ज्या स्थळाला आपण कमी वेळ दिला असता, प्रसंगी टाळलंही असतं ती जागा पाहण्यावर आपल्याला आपल्यापाशी असलेल्या अपुऱ्या वेळातला खूप वेळ खर्च करावा लागतो. या टूरचीच गोष्ट घ्या ना.

या टूरमध्ये आमचा सर्वात जास्त वेळ एक राजवाडा पाहण्यावर गेला. त्याचं नाव निंफेनबर्ग पॅलेस. एक वास्तू म्हणून ती अप्रतिम सुंदर जागा होती याबद्दल दुमत होणंच शक्य नाही. खुद्द राजवाड्यात प्रवेश करून त्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्यापूर्वीच आपल्यावर त्या वास्तूच्या सौंदर्याचा प्रभाव पडू लागतो तो त्याच्या भोवतालच्या विशाल बागेमुळे. राजवाड्याच्या प्रवेशद्वाराच्या नेमका समोर अगदी नजर पोहोचेल इतक्या दूरवर दिसणारा नितळ पाण्याचा पट्टा, त्या पाण्याच्या दोन्ही बाजूला हिरवळीचे वाफे, वाफ्यांच्या कडेकडेने छोटी, पुरुषभर उंचीची फुलझाडं. आसमंतात हिरव्या, तांबूस, पिवळ्या रंगाच्या पानांनी भरगच्च डंवरलेली वृक्षराजी, ठिकठिकाणी उभारलेले पुतळे आणि कारंजी, या सगळ्यामुळे मध्यभागी असलेल्या राजवाड्याच्या सुंदर वास्तूचं सौंदर्य अधिकच खुलवतात. जात्याच सुंदर असलेल्या स्त्रीचं सौंदर्य भरजरीच्या वस्त्रांनी किंवा अलंकारांनी खुलावं तसं. पाणी, हिरवळ, फुलं यांच्या कोंदणात राजवाडा शिंपल्यातल्या मोत्यासारखा वाटू लागतो. राजवाड्याच्या त्या सुंदर वास्तूचं प्रतिबिंब पाण्यात पडलं असेल तर ती सौंदर्यवती आरशात डोकावतेय असं वाटू लागतं आणि त्यातून काळोख झालेला असला, त्या राजवाड्यावर रोषणाई केलेली असली आणि तिचं प्रतिबिंब पाण्यात पडलेलं असलं तर ? - खैर, ते सौंदर्य नेमकं तसंच होतं - डोळ्यात आणि मनात साठवण्यासारखं.

अशा वास्तू मला बाहेरून पहायला आवडतात. मी तिथं रंगूनही जातो. मला कंटाळा येतो तो अशा वास्तूंचं अंतरंग पहायला. कारण अशा राजवाड्यांमध्ये आणि महालांमध्ये त्या राजवंशातल्या पुरुषांचे आणि स्त्रियांचे कपडे, अलंकार, मुकुट, शस्त्रं वगैरे गोष्टी ठेवलेल्या असतात. 'हा फलाण्या राजाचा पलंग, हे अमुक राणीचं न्हाणीघर.' हा प्रकार मला ताप आणतो. हां, त्यातही इतिहास घडवणारा कोणी महापुरुष असेल तर गोष्ट वेगळी. पण तशी व्यक्तिमत्वं थोडीच असतात. बाकी सगळ्या मध्ययुगीन राजाचं जीवन सारखंच एकसुरी असलेलं आढळतं. मग ते युरोपातले राजे असोत की, भारतातले इंग्रजांचे मांडलिक होऊन गोचिडीचं आणि जळवेचं जीवन जगणारे राजे महाराजे असोत. काय केलं या राजांनी ? मोठमोठाले वाडे, हवेल्या बाधल्या. जिरेटोप घातले. मुकुट-रत्नं जमवली. प्रेमं केली, रखेल्या ठेवल्या. आपली गादी राखण्यासाठी युद्धं केली. त्यातली बरीचशी सख्ख्या भावांमधली, बाप आणि मुलगी यांच्यामधली यादवी युद्धं होती. क्रूरपणे त्यांनी या आप्तस्वकीयांना बंदीत टाकलं. प्रसंगी

त्यांची कत्तल करायलाही मागे पुढे पाहिलं नाही. मौजमजेचं, अतिशय स्वार्थी, लफडच्या-कुलंगडयानी भरलेलं आयुष्य ते जगले. मला असल्या राजघराण्याचं वैभव पाहण्यात बिलकुल स्वारस्य वाटत नाही.

ब्रिटिशांचं मांडलिकत्व पत्करलेल्या आणि १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धात ब्रिटिशांना मदत करणाऱ्या एका तथाकथित राजघराण्याचा वाडा पाहायला मी एकदा गेलो होतो. गाईड मोठ्या उत्साहाने तो राजा कसा शूर होता आणि त्याने कोणत्या तरी जंगलातल्या एका वाघाला कसं ठार मारलं याचं वर्णन करून सांगत होता. तेव्हा मी चारचौघांसमोर त्या गाईडला मोठ्याने विचारलं होतं... 'वाघाचं काय सांगतोयस, ते बिचारं जंगली श्वापद, तुझ्या या शूर राजाने किती इंग्रजांना मारलं ते सांग.'

वास्तविक याच कंडक्टेड टूरमध्ये आम्हाला अशाही काही ऐतिहासिक महत्त्वाच्या जागा दुरून दाखवल्या गेल्या की त्या मला अधिक तपशीलवार पाहायला आवडल्या असत्या.

उदाहरणार्थ, १९७२ साली म्युनिकमध्ये ऑलिम्पिक खेळ झाले होते. त्यावेळी बांधण्यात आलेलं स्टेडियम वास्तविक पाहण्यासारखं आहे. त्याचं छप्पर पारदर्शक आहे आणि ते वाऱ्यावर हेलकावे खातं. तिथला टॉवरही पाहण्यासारखा आहे. या दोन्ही गोष्टी आम्हाला दुरूनच दाखवल्या गेल्या.

हवी ती गोष्ट मनसोक्त पाहण्याच्या या पहिल्या दिवशी झालेल्या उपासमारीचा वचपा आम्ही दुसऱ्या दिवशी भरून काढला. केवळ दोन-तीन तास ज्या जागी घालवायचे असं मी माझ्या प्लॅनिंगमध्ये ठरवलेलं होतं ती वास्तू पाहायला आम्ही ती सकाळी उघडली तेव्हा गेलो आणि संध्याकाळी रखवालदाराने हाकलून बाहेर काढलेले शेवटचे प्रेक्षक आम्ही होतो. ती वास्तूच तशी होती. त्या जागेचं नाव डॉयचेस म्युझियम.

विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावरचं डॉयचेस म्युझियम हे जगातलं सर्वात मोठं म्युझियम आहे. या म्युझियममध्ये सुमारे १३ एकर जागेवर कायम स्वरूपाच्या वस्तू मांडून ठेवलेल्या आहेत. त्याशिवाय वेळोवेळी निरनिराळी प्रदर्शनं मांडण्यासाठी कित्येक हॉल आहेत. या व्यतिरिक्त फिल्म्स आणि इतर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी दालनं आहेत. एक नक्षत्रालय आणि समृद्ध ग्रंथालयही या इमारतीत आहेत.

या म्युझियममध्ये तीस निरनिराळे विभाग आहेत. वानगीदाखल त्यातील काही विभागांची नावं सांगायची तर ती अशी सांगता येतील,... नौकानयन, अवकाशयुग, विमाने, मोटरकार्स, रस्ते आणि पूल, रेल्वे; यातील प्रत्येक विभागात त्या त्या विषयात इतिहासातील अगदी पहिल्या प्रयत्नापासून ते आजतागायत मानवाने केलेली प्रगती अगदी तपशीलवार पाहायला मिळते. ही प्रगती समजण्यासाठी बऱ्याच बाबतीत त्या त्या काळात मानवाने वापरलेल्या प्रत्यक्ष वस्तूच ठेवलेल्या आहेत. काही ठिकाणी त्या वस्तूंची अतिशय सुबक अशी मॉडेल्स ठेवलेली आहेत. उदाहरणच घ्यायचं तर विमान विभागाचं घेता येईल, राईट बंधूंनी १९०५ साली प्रत्यक्ष पहिलं विमान उड्डाण करण्यापूर्वी मानवाने हवेत उडण्याचे काही धाडसी प्रयत्न केले होते. अगदी सुरुवातीला चक्क पक्ष्यासारखे कापडाचे पंख स्वतःच्या शरीराला छातीपाशी बांधून उडण्याचा केलेला प्रयत्न आपल्याला इथे मॉडेल स्वरूपात पाहायला मिळतो. नंतर मानवाने तप्त हवा किंवा हैड्रोजन यांच्यासारख्या हवेपेक्षा हलक्या वायूच्या फुग्याला टोपली

बांधून त्या टोपलीत बसून हवेत उडण्याचे प्रयत्न केले होते. त्या टोपल्यांना गोंडोला म्हणत. या विभागात असे काही गोंडोले प्रत्यक्ष ठेवलेले आहेत. नंतर राईट बंधूंचं खुद्द विमानच इथे ठेवलेलं आहे. असं करता करता लुफ्थांझाच्या आजच्या अद्ययावत जेट लाइनरपर्यंत आपण केव्हा येऊन पोहोचतो ते आपल्याला कळतच नाही.

जे विमानांचं तेच नौकांचं. आदिमानवाने केव्हातरी हजारो वर्षांपूर्वी प्रत्यक्ष वापरलेली एक नौका या विभागात प्रथमदर्शनीच आपलं स्वागत करते आणि वाटेवर आपल्याला शिडाची गलबतं भेटतात, कोलंबसाने अमेरिका शोधून काढताना ज्या सांता मारिया या गलबतातून प्रवास केला ते भेटतं, विविध प्रकारच्या युद्ध नौका, मालवाहू बोटी, पॅसेंजर शिप्स, तेलाचे टँकर्स सगळं सगळं भेटतं.

साधी गोष्ट. रस्ते आणि पूल या विभागात आपल्याला काय विशेषसा इंटरेस्ट वाटणार ? वाटेवरच आहे म्हणून पाच मिनिटं शिरून पुढे जाऊ असा विचार करून त्या विभागात शिरलेले आम्ही चक्क तास-दीड तास त्या विभागात रमलो... का ? कारण त्या विभागातल्या पुलांच्या मॉडेलशेजारी असलेली बटणं दाबली की त्या पुलांची हालचाल सुरू होई. खालून जाणाऱ्या जहाजाला वाट करून देण्यासाठी काही पूल उचलले जात, काही अर्ध्यावर मोडत, तर काही सरकू लागत. या प्रत्येक मॉडेलपाशी अशा प्रकारचा पूल जगात प्रत्यक्ष कोठे आहे याची अतिशय मनोरंजक माहिती दिलेली असे.

अवकाशयुगावरच्या विभागात पहिल्या रॉकेटपासून आपण प्रवासाला सुरुवात करतो ते चंद्रावरचा दगड प्रत्यक्ष पाहून पार सूर्यमालेच्या बाहेर जातो.

हे म्युझियम पाहत असताना मला आठ-दहा वर्षांच्या जर्मन मुलांचा चक्क हेवा वाटला. मानवाच्या विज्ञान तंत्रज्ञानाचा इतिहास इतक्या मनोरंजक पद्धतीने त्या म्युझियममध्ये मांडून ठेवला होता की शंभर पुस्तकं वाचून जे विज्ञानप्रसाराचं कार्य होणार नाही ते त्या एका म्युझियमने होतं. या प्रदर्शनातील प्रत्येक विभागाला दिलेल्या ऐतिहासिक परिमाणामुळे आदिमानवापासून ते आजतागायत मानवाने केलेल्या तांत्रिक प्रगतीचा एक भव्य आलेख आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. भारावलेल्या मनस्थितीतच आपण म्युझियममधून बाहेर पडतो.


एका अगदी निराळ्या संदर्भातली म्युनिकची एक आठवण सांगण्यासारखी आहे. मला माझ्या मुलीसाठी इंग्लिश-जर्मन, जर्मन-इंग्लिश अशी एक डिक्शनरी विकत घ्यायची होती. कॉलिनने संपादित केलेली डिक्शनरी आणा, असं तिने सुचवलं होतं म्हणून मी एका पुस्तकांच्या दुकानात शिरलो. तिथे मला कॉलिनची डिक्शनरी दिसेना. तिथे भलत्याच एका संपादकाची डिक्शनरी होती. त्या दुकानात असलेली डिक्शनरी कॉलिनच्या डिक्शनरीपेक्षा मोठी आहे की छोटी आहे, अधिक उपयुक्त आहे किंवा कसे हे कळायला काहीच मार्ग नव्हता. त्यामुळे मी अखेर त्या विक्रेत्या बाईकडेच चौकशी केली. त्या विक्रेतीने काय करावं ? मी एक परदेशी आणि त्यातूनही अज्ञ गिऱ्हाईक होतो हे उघड होतं. आमच्याकडे आहे ती डिक्शनरीच सर्वात चांगली आहे असं सांगून तिने माझ्या गळ्यात तिच्याकडली डिक्शनरी मारली असती तर मी नंतर भांडायलाही जाणं शक्य नव्हतं.

पण त्या बाईने असं केलं नाही. उलट मुलगी जर्मनचा अभ्यास स्कूल लेव्हलला करते की कॉलेज लेव्हलला याची तिने माझ्यापाशी चौकशी केली. 'आमच्याकडे असलेली डिक्शनरी शाळेच्या मुलांना

चांगली आहे पण तुमच्या मुलीला कॉलेज लेव्हलला डिक्शनरी हवी असल्यामुळे तुम्ही अमुक संपादकाची डिक्शनरी घ्या,' असं तिने सुचवलं. ती डिक्शनरी आमच्याकडे नाही पण ती तुम्हाला अमुक दुकानात मिळेल असं सांगून त्या बाईने त्या दुसऱ्या दुकानाचा पत्ताही मला दिला.

तिने माझी इतकी काळजी का घेतली या प्रश्नाला 'व्यावसायिक नीतिमत्ता' याशिवाय दुसरं उत्तर असूच शकत नाही.

*बर्लिनची भिंत*



जर्मनीत जाऊन बर्लिनला न जाणं म्हणजे दिल्लीला जाऊन लाल किल्ला न पाहताच येण्यासारखं आहे असं मला वाटतं. इतिहासाचाच विचार केला तर विसावं शतक हे बर्लिनचं शतक आहे. या शहराने या शतकात इतिहास घडवला आणि बिघडवला. या शहराने जगाला खूप काही सोसायला लावलं आणि स्वतःही खूप सोसलं. दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामी कितीतरी देशांची शकलं झाली. पण एका शहराची शकलं होऊन छातीत खुपसलेल्या सुऱ्यासारखी २९ मैल लांब आणि १३ फूट उंच भिंत उभारून दोन तुकडे केले गेलेलं शहर बर्लिनच. आणि कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाची सत्तेवरून कायमची उचलबांगडी करण्याच्या ऐतिहासिक प्रक्रियेची सुरुवात बर्लिननेच केली. बर्लिनच्या भिंतीचा अखेरचा चिरा काढला जाऊन तिथे 'या जागी पूर्वी भिंत होती,' असा फलक लागण्यापूर्वी मला तिथे जायला मिळत होतं याचंच मला बरं वाटत होतं.

बर्लिनची ही भिंत बर्लिन रेल्वे स्टेशनच्या खूपच जवळ आहे. आम्ही स्टेशनवर उतरलो तेव्हा कडाक्याची थंडी पडली होती. अगदी बाहेर जाऊ नये असं वाटत होतं. पण बाहेर तो इतिहास खुणावत होता. आता टाळलं आणि समजा सुदैवाने अगदी परत बर्लिनला येण्याची संधी मिळाली तरी त्यावेळी ती भिंत पाहायला मिळेलच अशी शाश्वती नव्हती. 'आता; किंवा मग कधीच नाही,' या दोन पर्यायातून निवड करायची होती.

थंडी, वारा, पाऊस यांना न जुमानता बाहेर पडलो.

भिंतीपाशी आलो. पडक्या भिंतीच्या पलीकडे 'नो मॅन्स लॅण्ड' होती. त्यापलीकडे अगदी चार वर्षांपूर्वीपर्यंत वॉर्सा

करारातील राष्ट्रांच्या फौजा युद्धसज्ज अवस्थेत चोवीस तास उभ्या असत. ही भिंत म्हणजे मानवी विकृतीचं एक प्रतीक होती. भिंत घालून पलीकडून येणाऱ्या वाऱ्याला आणि उजेडालाही जणू अडवण्याचा प्रयत्न केला गेला होता. भिंत घालून वारा अडवता आला तरी विचार अडवता येत नाहीत, विचारांना बंदिवान करता येत नाही हे शाश्वत सत्य अखेर विजयी झालं आणि त्या शाश्वत सत्याच्या झंझावातापुढे मानवी इतिहासातील ही विकृती कोसळली. आम्ही जेव्हा ती भिंत पाहिली तेव्हा 'नो मोर वॉर्स, नो मोर वॉल्स' अशा मानवतेने मारलेल्या किंकाळ्यांची भिंतीवर चितारलेली अक्षरं काही भागात पाहायला मिळाली.


त्या ऐतिहासिक भिंतीला भेट देऊन आम्ही परत स्टेशनात आलो. हवा इतकी खराब होती की स्वतंत्ररित्या फिरणं केवळ अशक्य होतं. त्यामुळे पुन्हा एकदा नाइलाजाने 'कंडक्टेड टूर' नावाच्या विनोदाला शरण जावं लागलं.

'ही राइशस्टॅगची जुनी इमारत, याच इमारतीला १९३३ साली हिटलरने स्वतःच आग लावली. कांगावा मात्र कम्युनिस्टांनी आग लावली, असा करून कम्युनिस्टांच्या शिरकाणाला सुरुवात केली.'

'या ठिकाणी पूर्व जर्मनीच्या अनेक तरुणांनी वेळोवेळी भिंत क्रॉस करण्याचा प्रयत्न केला. त्यांना गोळ्या घालून ठार मारण्यात आलं. ती तिथे दिसतायत ती त्या अनामिक स्वातंत्र्यप्रेमींची थडगी.'

गाईड एकेक ऐतिहासिक महत्त्वाची स्थळं नुसती खुणेने दाखवत होता. बाहेर चाललेल्या वादळवाऱ्याच्या थैमानात खाली उतरणं शक्य नव्हतं. चित्रपटात डोळ्यासमोरून दृश्यं सरकत जावी तसं घडत होतं.

पुढला तास-दीड तास गाडीत बसलेले विविध देशातले आम्ही पाच-पंचवीस टुरिस्ट्स 'निसर्गापुढे माणूस नगण्य आहे' हा धडा पुनः पुन्हा मनाच्या पाटीवर गिरवीत होतो.



*युरेल : जर्मनीमधील प्रदेश*

युरेल पासाचे पंधरा दिवस आता संपले होते. शेवटचा प्रवास बर्लिनहून फ्रँकफर्ट असा करायचा होता. कारण पुढे लंडनला जाणारी फ्लाइट फ्रँकफर्टला पकडायची होती. सहा तासांचा प्रवास होता. रात्री आठपर्यंत पोचण्याच्या दृष्टीने दुपारी दोनच्या सुमाराची गाडी पकडली.

ही ट्रेन आमच्या युरोपच्या सर्व प्रवासातील सर्वात सुंदर ट्रेन



होती. तिला 'इंटर सिटी एक्सप्रेस ट्रेन' म्हणतात. ही ट्रेन आणि विमान यांच्यात खूपच साम्य होतं. तिचा तोंडाकडचा भाग आकाराने विमानासारखा होता आणि रंग ॲल्युमिनियमच्या पत्र्यासारखा होता. आतील सर्व सुखसोयी थेट विमानाइतक्या चांगल्या होत्या. सीट्स मागे ढकलून अधिक आरामदायक करता येत होत्या. विमानासारखीच गाडीत टेप्ड संगीत ऐकण्याची सोय होती. लिहायचं, खायचं असल्यास हँडरेस्टला लागून एक छोटंसं टेबल होतं. गाडीचा वेग सहज ताशी दीडशे किलोमीटर्सच्या आसपास असावा. ती बंदुकीच्या गोळीसारखी हवेला भोक पाडत पुढे जातेय, असं वाटत होतं. गाडी इतक्या प्रचंड वेगाने जात असूनही तिचा आवाज बिलकुल जाणवत नव्हता. गाडीच्या खिडक्या बंद असल्यामुळे धूळ बीळ आत येण्याचाही काही प्रश्न नव्हता. आत माणसांची गर्दी नव्हती, त्यामुळे गोंगाट नव्हता की आरडाओरडा नव्हता. सारं कसं रेखीव होतं आणि अतिशय शिस्तीत, सुरळीत पण विलक्षण वेगाने चाललं होतं.

आता गाडी जर्मनीच्या जंगली भागातून जात होती. हे निसर्गक्रमात वाढलेलं जगल नव्हतं. नैसर्गिकपणे वाढलेल्या जंगलात झाडांमध्ये विविधता असते. झाडं अस्ताव्यस्त वाढलेली असतात. तिथे आंब्याशेजारी पांगारा वाढतो आणि चिंचेच्या शेजारी खैर असतो. इथे तसं नव्हतं. इथे सगळे एकाच प्रकारचे वृक्ष होते. म्हणजे तेही एक शिस्तीत वाढवलेलं जंगल होतं. त्यामुळे ते जंगलही रासवट न वाटता अतिशय सुबक वाटत होतं. कार्यक्षमता, शिस्त, सुबकपणा, वेग, उच्च दर्जा, वैभव या सर्वच बाबतीत ती ट्रेन, तो प्रवास आणि तो परिसर जर्मन जीवनाचं प्रतीक वाटत होता.

*एकाच प्रकारची झाडे असलेले जगल*

# हे इंग्लंड की भारत ?

इंदिराजींच्या काळात जेव्हा भारतातील राजेरजवाड्यांचे तनखे बंद करणारं बिल लोकसभेत मांडलं गेलं तेव्हा कोणीतरी विनोदाने म्हटलं होतं - ''राजे महाराजांचे दिवस आता गेले. काळाच्या प्रवाहात सरंजामशाहीचे हे अवशेष नष्ट होणारच. त्यांच्याबद्दल अश्रू ढाळण्याची काही गरज नाही. अखेर जगात फक्त अर्धा डझन राजे महाराजेच काय ते शिल्लक राहतील. पत्त्यातले चार राजे, एअर इंडियाचा महाराजा आणि इंग्लडंचा राजा !''

या वाक्यातला विनोदाचा भाग सोडून दिला तरी हे वाक्य उच्चारणाऱ्या व्यक्तीने इंग्लंडचं एक वैशिष्ट्य त्यात सहजपणे दाखवून दिलेलं आहे जगातल्या अनेक देशांनी लोकशाही राज्यपद्धती स्वीकारली तेव्हा जुन्या म्हणजे त्यापूर्वीच्या राजेशाही या राज्यव्यवस्थेचा त्याग केला. इंग्लिशांनी लोकशाही स्वीकारली पण राजेशाहीचा त्याग केला नाही. त्यांनी राजेशाहीवर लोकशाहीचं कलम केलं. वास्तविक आज ब्रिटिशांइतकी जुनी लोकशाहीही जगात नाही आणि त्यांच्या इतकी जुनी राजेशाहीही जगात कोठे अन्यत्र उपलब्ध नाही.

अर्थात, या राजेशाहीमुळेच नाही, तर अन्य किती तरी कारणांसाठी इंग्लंड देश युरोपातल्या इतर देशांहून निराळा आहे. भौगोलिकदृष्ट्या तर इंग्लिश खाडीमुळे तो उर्वरित युरोपपासून अलग पडलेला आहेच, पण परंपराना चिकटून राहण्याच्या आपल्या हट्टापायी साऱ्या जगाने चलन, लांबी, वजन, तापमान इत्यादी अनेक गोष्टीत दशमान पद्धती स्वीकारली तरी इंग्रजांनी अगदी कालपरवापर्यंत आपल्या कालबाह्य पद्धतीच चालू ठेवल्या होत्या.

हे सगळं खरं असलं तरी अख्ख्या युरोपात इंग्लंड हा देशच आपल्याला सर्वात जवळचा वाटतो. युरोपातल्या सहा देशांमध्ये फिरून आम्ही जेव्हा लंडनला पोचलो तेव्हा चक्क घरी आल्यासारखं वाटलं - आपल्या मुलखात आल्यासारखं वाटलं. याला अनेक कारणं आहेत. पण त्यातलं सर्वात प्रमुख कारण म्हणजे भाषा. आतापर्यंत डच, फ्रेंच, जर्मन आणि इटालियन या भाषा कानावर पडत होत्या. त्यामुळे लिहिलेलं कळत नव्हतं की बोललेलं समजत नव्हतं. आता आजूबाजूला लिहिलेलं, बोललेलं सगळं स्वच्छ समजू लागलं. शिवाय थोडंफार इंग्रजी साहित्य आणि इतिहास, विशेषतः सॉमरसेट मॉमच्या कादंबऱ्या वाचलेल्या असल्यामुळे हाईड पार्क, ट्राफल्गार स्क्वेअर, ऑक्सफर्ड सर्कस अशी ठिकाणं नावाने तरी आधीच परिचित झालेली होती. आतापर्यंत वावरलेल्या सर्व शहरात लोकवस्ती खूपच विरळ विरळ होती. खांद्याला खांदा लागण्याचा कुठे प्रश्नच उद्भवला नव्हता. पहिल्याच दिवशी लंडनच्या पिकॅडिली भागात पाय मोकळे करायला गेलो, त्या भागातली संध्याकाळच्या वेळची गर्दी मुंबईची आठवण

करून देणारी होती. इतकंच नाही तर ही वस्ती मुंबईच्या वस्तीसारखीच अतिशय कॉस्मॉपॉलिटन होती. इतकी की मुंबईत जसा मूळ मराठी माणूस शोधून काढावा लागतो तसाच लंडनमध्येही इंग्रज कोणता हे शोधावं लागतं. लंडन मुंबईची बऱ्याच बाबतीत आठवण करून देतं, लंडनमध्ये काही विशिष्ट भागात फिरताना मुंबईच्या फोर्ट भागातून फिरत असल्याचा भास होतो.

त्यामुळे नकाशा पाहून शहरात आत्मविश्वासाने वावरायला लागायला इतर शहरात मला किमान तीन-चार तास तरी लागत, पण लंडनला मात्र मी पहिल्या क्षणापासूनच आजोळी आल्यासारखा वावरायला लागलो.

पहिल्या दिवशीचा कार्यक्रमच एका परिचितांकडे जाणं आणि उरलेला वेळ निरुद्देश भटकणं असा ठेवलेला होता. आमचे परिचित आल्पर्टन भागात राहत होते. सकाळच्या लौकरच्या फ्लाईटने फ्रँकफर्टहून आलेलो असल्यामुळे दुपारपर्यंत त्यांच्या घरी पोहोचणं शक्य होतं.

टयूबने आल्पर्टन स्टेशनात उतरलो, स्टेशनच्या बाहेर पडलो आणि कळेच ना की आपण भारतात आहोत की इंग्लंडमध्ये? रस्त्यावरचे बहुतेक सर्व चेहरे भारतीय, दुकानं भारतीय, दुकानांमधला माल खास भारतीय, आजूबाजूच्या माणसांनी बोललेले कानावर पडणारे शब्द भारतीय भाषांमधले, विशेषतः गुजराथी. आम्ही लंडनला गेलो ते दिवाळीपूर्वीचे दिवस होते. त्यामुळे दुकानातून गिऱ्हाईकांची विशेषतः स्त्रियांची खूपच गर्दी होती. ऐन दुपारची वेळ असली तरी वातावरण लंडनचं खास, ढगाळ होतं. थंडीही बऱ्यापैकी होती. त्यामुळे त्या वेळीही रस्त्यावर माणसांचा पुरेसा वावर होता.

परिचितांच्या घराचा पत्ता शोधता शोधता मध्येच वाटेत चक्क एक देऊळ लागलं. तिथे हिंदू देवालय आहे हे कदाचित माझ्या लक्षातही आलं नसतं. कारण त्याचा बाह्य आकार देवळासारखा नव्हता. पण बाहेर चक्क देवळाची पाटीच लावली होती.

मुंबईत अभावानेच मी देवळात जातो. पण त्या दिवशी त्या लंडनमधल्या देवळात मात्र जावंसं वाटलं. आपल्या देशातली देवळं ही, हे रामाचं देऊळ, ते कृष्णाचं देऊळ अशी ओळखली जातात. परदेशी खुद्द देवांनाही ही जागेची चैन परवडणारी नव्हती. त्या एकाच देवळात राम, लक्ष्मण, सीता, शंकराची पिंडी, कृष्ण असे बरेच देव होते. इतकच नाही तर तिथे गुरु नानकांचाही फोटो होता आणि एक सरदारजी आपल्या पत्नीला आणि छोटया मुलीला घेऊन देवळात आले होते. भारतात घडत असलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर मला एका सरदारजींचं लंडनमध्ये का होईना एका देवळात येणं अतिशय शुभ वाटल.

मध्यान्हीची वेळ होती. देवाला दुपारचा नैवेद्य दाखवला जात होता. काही वृद्ध गुजराथी स्त्रियांनी त्या नैवेद्याच्या वेळचं गीत म्हणायला सुरुवात केली :

जमो जमो रे जगना स्वामी।<br>
जमाडुं तमने।

मला त्या स्त्रियांचे ते कातर स्वरातले विनंतीवजा आळवणीचे शब्द कानाला फार गोड वाटले. खरंच, पोटासाठी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही जातो. माणूस नावाच्या या रोपाची जिजीविषा जबरदस्त आहे. पण तो जातो तिथे आपली संस्कृती, धर्म बरोबर घेऊन जातो. पारशी नाही आपल्याकडे रुजले? मॉरिशसला नाही आपल्या मराठी बांधवांनी आपला धर्म नेला? धर्माला अफू मानून मार्क्ससारख्या मोठ्या विचारवंताने मोठीच चूक केली हे इतिहासाने

आता सिद्धच केलंय म्हणा. त्यामुळे धर्म पुरून टाकायच्या ऐवजी किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष करायच्या ऐवजी नव्या युगातल्या नव्या गरजांनुसार त्याचा नवा अर्थ लावणं आवश्यक आहे.

माझ्या मनात हे विचार चालू असेपर्यंत तिकडे देवाचं जेवण झालेलं होतं आणि भक्तांनी जयघोष केला होता :

क्रश्न कन्हैयालाल की जै।

मीही माझा स्वर त्या स्वरात मिसळला.

लंडनमध्ये क्रॉमवेल रोडवर एक चौक आहे. त्या चौकाला म्युझियम चौक म्हणतात. काळाच्या ओघात बरेच वेळेला रस्त्यांची, चौकांची नावं विनोदी वाटावी एवढी असंबद्ध झालेली असतात. 'धोबी तलाव' हे असं एक नाव. आता तिथे धोबीही नाहीत आणि तलावही नाही. लंडनचा म्युझियम चौक मात्र आपलं नाव सार्थ करतो. तिथे एक नाही, दोन नाही, अतिशय महत्त्वाची चार म्युझियम्स आहेत. तीन विज्ञान विषयाला वाहिलेली आणि एक इतिहासाला. चारी तर पाहणं शक्यच नव्हतं. त्यामुळे निवड करणं आलं आम्ही एक विज्ञानाचं आणि दुसरं इतिहासावरचं पाहायचं अस ठरवल.

'दी नॅचरल हिस्टरी म्युझियम'मध्ये आमचे जवळजवळ पाच तास कसे गेले कळलंच नाही. म्युझियमच्या तळमजल्यावर एका मोठ्या हॉलमध्ये डायनॉसॉरचा एक प्रचंड सांगाडा ठेवलेला आहे. प्राणी जगतातल्या या आज अस्तित्वात नसलेल्या आपल्या पूर्वजाच्या भेटीपासून नॅचरल हिस्टरीची सुरुवात करण्याची कल्पना मला आवडली. म्युझियममध्ये मानवी शरीरशास्त्र, खनिजं, पक्षी, प्राणी जगतातील मानवाचं स्थान, पृथ्वीची कूळकथा असे अनेक विभाग आहेत. प्रत्येक विभागात प्रदर्शनात मांडून ठेवलेला प्रत्येक नमुना अतिशय सुबकपणे ठेवलेला आहे. त्याच्यावर योग्य दिशेने प्रकाशझोत टाकलेले आहेत. शेजारी त्या नमुन्याची माहिती अतिशय चटकदार पद्धतीने लिहिलेली आहे. इतकंच नव्हे, तर पक्ष्यांच्या विभागात बहुतेक सर्व पक्ष्यांचे टेप केलेले आवाजही फोनवर ऐकण्याची सोय आहे. शिवाय तो नमुना सजीवाचा असेल तर बहुतेक सर्व ठिकाणी स्थिर चित्राबरोबरच त्या जीवाची छोटीशी फिल्मही पाहण्याची सोय आहे. काही ठिकाणी पक्ष्यांची, प्राण्यांची शरीरंच भुसा भरून ठेवलेली आहेत. त्यांच्या आजूबाजूचं डेकोरेशन असं आहे की ते ते प्राणी त्यांच्या नैसर्गिक वातावरणात राहात असल्याचाच भास होतो. बरं, या प्रत्येक विभागाला इतकी मनोरंजक शीर्षकं दिलीयेत! उल्कांवरच्या विभागाचं नाव आहे - 'फ्री सँपल्स फ्रॉम स्पेस.' या म्युझियममधला मला सर्वात जास्त आवडलेला विभाग म्हणजे पर्यावरणाचा. या विभागाच्या सुरुवातीलाच प्रेक्षकाला स्वतःपासून खूप दूर अंतरावर असल्याचा भास होईल अशा अंतरावर पृथ्वीगोल फिरताना दिसतो. काळ्या अंतराळाच्या पार्श्वभूमीवर चंद्रावरून पृथ्वी जशी दिसते तसा हा पृथ्वीगोल आपल्याला दिसतो. त्या कपाटावर लिहिलेलं आहे -

'विश्वाच्या अफाट आणि भयावह पसाऱ्यात एक छोटासा गोलक तरंगतोय. त्याला आपण आपली पृथ्वी म्हणतो.'

आणि या पहिल्या नमुन्यापासूनच हा विभाग आपल्या मनाची पकड घेतो. त्यानतर एका मागोमाग आपण एकेका दालनात फिरू लागतो. छाया-प्रकाश, रंग, प्रत्यक्ष वस्तू, आवाज यांचं एक विश्वच आपल्या भोवती फेर धरतं. आपण जलचक्र या विभागात जातो तेव्हा विजा कडाडू लागतात, ढग गडगडतात, पावसाचा ध्वनी सुरू होतो. आपल्या डोळ्यांसमोर त्या पाण्यापासून नदी बनते, धबधबाही तयार

होतो. नदी सागराला जाऊन मिळते. समुद्राच्या लाटा उसळतात. समुद्राच्या पाण्याची वाफ होऊ लागते. एक चक्र पूर्ण होतं. आभासात्मक सत्याचा (Virtual Reality) एवढा सुंदर आविष्कार यापूर्वी मला कुठेच बघायला मिळाला नव्हता. अशा रीतीने नैसर्गिक घटनांचा चक्रीय क्रम, प्राणी जगतातलं वैविध्य, सर्व जीवांचं एकमेकांवर अवलंबून असणं हे प्रेक्षकाच्या मनावर बिंबत असतानाच अखेर आपण मानवाकडे येतो. इथे आधुनिक मानवाचा, त्याने आपल्या अतिलोभापायी पृथ्वीला इतर प्राणी जगताला पोचवलेल्या हानीचा अगदी झडझडीत शब्दात आपल्यासमोर पंचनामा मांडला जातो.

मानव निसर्गाचा स्वामी नसून एक भाग आहे आणि चंगळवादापायी मानवाने चालवलेली पृथ्वीची आणि इतर प्राणीमात्रांची पिळवणूक थांबवलीच पाहिजे, हा या विभागाचा संदेश आपल्या मनावर अगदी ठसठशीतपणे कोरण्यात म्युझियम यशस्वी झालं आहे.

विज्ञानावरचं इतकं सुंदर म्युझियम पाहिल्यावर आम्ही व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ट म्युझियम हे इतिहासावरचं म्युझियम पाहायला जायला नको होतं. माणसाच्या अनुभव घेण्यालाही मर्यादा असाव्यात, गंभीर स्वरूपाचे, विचार करायला लावणारे अनुभव एकामागोमाग मध्ये खंड न पाडता घेणं मला तरी फार कठीण जातं. सुट्टीत केवळ गमतीखातर काही लोकांकडे व्हीसीआर आणून एकामागोमाग दोन, तीन चित्रपट पाहतात तोही मला वेडेपणा वाटतो. त्यामुळेच त्या दिवशी मी त्या म्युझियमचा रसास्वाद घेऊ शकलो नाही. त्याच्याविषयी काहीही लिहिणं त्या म्युझियमवर अन्यायकारक ठरेल. पण एक ठळकपणे जाणवलेली गोष्ट नमूद केल्याशिवाय राहवत नाही.

या म्युझियममध्ये भारताच्या इतिहासावर आधारित असं एक विस्तीर्ण दालन होतं. त्यात भारताच्या इतिहासातील, विशेषतः ब्रिटिश आणि भारतीय यांच्या परस्परसंबंधांवर आधारित अशा वस्तू, चित्रं ठेवलेली होती. त्यात मुगल कालखंड होता, दक्षिणेकडील राज्य म्हणून टिपू सुलतान वगैरेंवरही नमुने होते. फक्त मराठा कालखंडावर काहीही नव्हतं. मला तरी हा जाणूनबुजून केलेला खोडसाळपणा वाटला. हे दालन तयार करण्याचं काम कदाचित तिथल्या भारतीय हायकमिशनकडे सोपवलेलं असावं. जाता जाता हेही नमूद करावसं वाटतं की या दालनाचं नाव 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' असं होतं.

मध्ययुगीन राजे रजवाड्यांच्या लफड्या कुलंगड्यांनी भरलेल्या आयुष्यांच्या गोष्टी ऐकण्यात मला यत्किंचितही गोडी वाटत नाही हे माझं अगदी ठाम मत असलं तरी या नियमाला मला एक अपवाद करावासा वाटतो तो म्हणजे 'टॉवर ऑफ लंडन' मध्ये आम्हाला टॉवरची कुळकथा सांगणाऱ्या गाईडचा.

वास्तविक टॉवर ऑफ लंडन ही एक तद्दन मध्ययुगीन वास्तू आहे. इसवी सन १०६६ मध्ये फ्रान्सच्या उत्तरेकडील नॉर्मंडी या परगण्याच्या एका सरदाराने इंग्लंडवर हल्ला केला. इंग्लंडवर कब्जा केला आणि मग स्वतःचं एतद्देशीय म्हणजे 'नेटिव्ह' इंग्रजांपासून संरक्षण व्हावं म्हणून एक भक्कम वास्तू बांधली, ती म्हणजे 'टॉवर ऑफ लंडन.' पुढे काही शतकं इंग्लिश राजघराणं या वास्तूत नांदत होतं. त्यामुळे गादीसाठी भावाभावातली भांडणं, खून वगैरे सगळे सीन्स इथेही घडले. मग मला कौतुक वाटण्यासारखं या अनुभवात

काय होतं?

टॉवरच्या कथेच्या माझ्या कौतुकाची सुरुवात कथेच्या निवेदकापासूनच होते. हा निवेदक साधासुधा नव्हता. तुम्ही टॉवर बघण्यासाठी टॉवरच्या कंडक्टेड टूरचे पैसे भरतो आणि पंधरा-वीस जणांचा एक ग्रुप तयार झाला की अचानक टॉवरच्या अंगणातल्या एखाद्या कोपऱ्यात एखाद्या छोट्याशा स्टुलावरून तुम्हाला हळी ऐकू येते - 'तर मग जेहेत्ते काळाचे ठायी लोकहो . . .'

असंच काहीसं तो इंग्लिशमध्ये बोलतो. तुमचं लक्ष त्याच्याकडे वेधलं जातं. लाल सोनेरी लेसने भरलेला पायघोळ कोट, त्याच्यावर शोभेल अशी पारशांसारखी टिपिकल टोपी घातलेला एक माणूस तुम्हाला बोलावत असतो. त्याचा वेष पाहून तुम्हाला वाटतं - अरेच्चा, हा चार-पाचशे वर्षांपूर्वीच्या जमान्यातला वाटावा असा माणूस इथे कुठून आला? जेव्हा राजा इथे राहत असे त्या काळात राजाच्या संरक्षणासाठी संरक्षकांची एक स्वतंत्र तुकडी निर्माण केलेली होती. आता राजा दुसऱ्याच महालात राहतो. पण परंपरा जतन केलेली आहे. त्या संरक्षक तुकडीतला हा एक असतो. एके काळचा राजाचा रक्षक. आता तुमचा गाईड.

आमचा गाईड म्हणजे चक्क एक कथेकरी होता. डोळे मिचकावत, कधी एखाद्या लहान मुलाचं नाक ओढत, कधी एखाद्या तरुण-तरुणीची थट्टा मस्करी करत गप्पा गोष्टी कराव्या तशा पद्धतीने तो त्या वास्तूत घडलेल्या ऐतिहासिक घटनांबद्दल सांगत होता. सांगण्याची पद्धतही अतिशय चटकदार आणि गंमतीदार.

'बरं का महाराजा, इथे आमच्या फलाण्या राजाला फाशी दिली. ती एक गंमतच झाली बरं का, इकडे राजाला फाशी दिली म्हणजे काय, त्याचं मुंडकं धडावेगळं केलं आणि नंतर कोणाच्या तरी लक्षात आलं की आपल्याकडे या राजाचं चित्रच काढलेलं नाही. त्या काळात आता तुमच्याकडे आहेत तसे कॅमेरे नव्हते. चित्रकाराकडूनच चित्र काढून घ्यावं लागे. म्हणून त्याचं मुंडकं मग परत धडाला शिवलं बरं का! अशा मानेपाशी शिवण घातलेल्या अवस्थेत मृत शरीर परत सिंहासनावर ठेवण्यात आलं. म्हणजे मृत्यूनंतर गादीवर चढणारा हा महापुरुष! मग आर्टिस्ट बोलावण्यात आला. आर्टिस्टने चित्र काढलं. कसं? असं की त्या चित्रात त्या राजाच्या गळ्याची ती शिवणही दिसतेय. हुबेहुबपणा म्हणजे शंभर टक्के हुबेहूबपणा. व्यक्तिचित्राचा हा अप्रतिम नमुना तुम्हाला आजही अमुक ठिकाणी पाहायला मिळेल.

'आमच्या विलियम द काँकरर या राजाच्या काळात हा खंदक खणला बरं का. कशासाठी? भरतीच्या वेळी नदीच्या पाण्याने तो भरावा आणि बाहेरची गलबतं थेट आत घेता यावीत, पण ओहोटीच्या वेळी तो कोरडा व्हावा. हेतू स्तुत्य. पण राजाचे इंजिनीयर्स भलतेच उत्साही निघाले. त्यांनी उत्साहाने खंदक एवढा खोल खणला की ओहोटीच्या वेळी पाणी बाहेर जाईना. उलट ते तिथेच साचून दलदल मात्र माजली.

'या ठिकाणी खाली तुरुंगाच्या कोठड्या आहेत. इतिहासकाळात इथे बऱ्याच चांगल्या आणि काही वाईट माणसांना डांबून ठेवण्यात आलेलं आहे.'

निवेदनाची अशी शैली कायम ठेवत गप्पा-गोष्टी करीत त्याचं निवेदन चाललं होतं. ते फक्त निवेदन नव्हतं, तो एक 'परफॉर्मन्स' होता. मला तो निवेदक खूप आवडला. त्याच्या गप्पा ऐकत मी पुन्हासुद्धा तो इतिहास ऐकायला तयार आहे.

याच टॉवरच्या तळघरात इंग्लिश राजघराण्यातल्या राजे आणि राण्यांचे मुकुट आणि इतर अलंकार ठेवलेले आहेत. मला त्या

तळघरात जायची काय गरज होती? पण तरीही मी गेलो. मध्य युगातल्या इतर कोणत्याही राजा राणीच्या रत्नालंकारात मला इंटरेस्ट नव्हता तर मग ब्रिटिश राजघराण्याच्याच अलंकारांचं मला एवढं कौतुक का म्हणून वाटावं?


कारण तिथे ब्रिटिशांनी भारतातून लुटून नेलेला कोहिनूर हिरा ठेवलेला होता. तो पाहिला आणि उगीचच खिन्न व्हायला झालं. तो एकेकाळी भारताचा होता या म्हणण्याला आता काही अर्थ नव्हता, हे कळत असूनही खिन्नता वाटायची ती वाटलीच.

टॉवर ऑफ लंडन आणि त्याच्या शेजारचाच लंडन ब्रिज पाहून आम्ही तमसेच्या तीरावर आलो. या टॉवरच्या जवळूनच थेम्स नदीवरच्या तासा-दीड तासाच्या सफरीसाठी बोटी सुटतात. आम्ही अशाच एका बोटीत बसलो.

# तमसेच्या तीरावर

**प**श्चिमेच्या दिशेने बोट निघाली.

थेम्स नदीच्या तीरावर इंग्रजांच्या आणि पर्यायाने जगाच्या इतिहासावर आपली कायमची छाप पाडलेल्या व्यक्तींची, घटनांची स्मारकं जागोजागी विखुरलेली आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचं स्थळ म्हणजे ब्रिटिश पार्लमेंटची इमारत. ही इमारत म्हणजे मानवाच्या इतिहासातील लोकशाही या संकल्पनेची गंगोत्री. आज आपण लोकशाही हा शब्द वापरून वापरून इतका गुळगुळीत केलेला आहे, आणि त्या संकल्पनेचं इतकं विकृत स्वरूप आपल्याला जागोजागी पाहायला मिळतंय की त्या शब्दाचं पावित्र्यच हरवल्यासारखं वाटतं. पण मानवाच्या सांस्कृतिक विकासातील तो किती महत्त्वाचा टप्पा आहे! या देशाने तो क्रांतिकारक टप्पा प्रथम ओलांडला आणि सर्वसामान्यांच्या विकासाला वाव दिला, समानतेची संधी दिली. खुद्द राजाच्या विरुद्धही प्रजेतल्या सामान्यातल्या सामान्य माणसाला हक्क दिले. मताचा अधिकार दिला. या सगळ्याचं प्रतीक म्हणजे ती भव्य दगडी इमारत · ब्रिटिश पार्लमेंट.



या पार्लमेंटच्या बिल्डिंगच्या आसपासच दुसऱ्या महायुद्धाशी संबंधित अशा दोन जागा आहेत. त्यातली एक कॅबिनेट वॉर रूम, म्हणजे ऐन युद्ध चालू असताना ब्रिटिश

मंत्रिमंडळाच्या मीटिंग्ज घेतल्या जात ती अंडरग्राऊंड जागा. या ठिकाणी उभारलेल्या तात्पुरत्या रेडिओ केंद्रावरून चर्चिलने इंग्रजी भाषेत अजरामर झालेली, युद्धात जनतेला धीर देणारी, युद्धप्रवृत्त करणारी कितीतरी भाषणं केली होती.

या जागेपासून जवळच शिलालेखासारखं एक स्मारक आहे. त्याला 'सेनोटाफ' म्हणतात. युद्धात मरण पावलेल्या सगळ्या सामान्य नागरिकांची आठवण म्हणून उभारलेलं हे स्मारक. 'नाही चिरा नाही पणती' अशा सगळ्यांची भावी पिढ्यांनी कृतज्ञतापूर्वक केलेली आठवण.

असं म्हटलं जातं की ब्रिटिशांइतकं इतिहासाचं भान जगातल्या कोणत्याच लोकांना नव्हतं, आणि ते अगदी खरं आहे. ब्रिटिशांनी आपल्या इतिहासातल्या सर्व महत्त्वाच्या क्षणांची आठवण अतिशय साक्षेपीपणे जपून ठेवलेली आहे. त्यांच्या सुदैवाने त्यांना जवळजवळ दोन शतकं जगाच्या रंगमंचावर अतिशय महत्त्वाची कामगिरी बजावायची संधी मिळाली. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने अतिशय महत्त्वाची, अगदी निर्णायक भूमिका बजावली असली तरी त्या युद्धाचा हीरो ब्रिटिशांचा पंतप्रधान चर्चिल हाच ठरला. तोंडात अखंड चिरूट घेऊन वावरणाऱ्या चर्चिलचा पार्लमेंटच्या इमारतीबाहेरचा पुतळा ही एक जगाच्या कायमच्या कौतुकाची बाब आहे.

दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या ब्रिटनच्या इतिहासाशी संबंधित अशा दोन महान योद्ध्यांची स्मारकंही या नदीच्या आसपासच आहेत. फ्रान्सचा जगज्जेता सम्राट नेपोलियन याच्याशी युद्ध खेळलेले आणि जिंकलेले हेच ते दोन महान योद्धे : नेल्सन आणि वेलिंग्टन.

पण या साऱ्या युद्धखोर नेत्यांपेक्षा अगदी निराळ्या एका व्यक्तीच्या नावाशीही हा सारा परिसर निगडित आहे. त्याच्या उल्लेखाशिवाय थेम्स नदीकाठचं हे वर्णन संपविणं योग्य होणार नाही. या व्यक्तीचं नाव आहे सर ख्रिस्तोफर रेन. या सरसाहेबाने एकही लढाई खेळली नाही की एकही युद्ध जिंकलं नाही. त्यांनी फक्त घडवलं, निर्माण केलं.

इसवी सन १६६५ साली लंडनमध्ये प्लेगची साथ पसरली. हजारो माणसं मृत्युमुखी पडली. लोक गाव सोडून गेले. पण हे दुर्दैव छोटं वाटावं असं दुर्दैव १६६६ साली ओढवलं. या वर्षी लंडनमध्ये प्रचंड मोठी आग लागली. या आगीत १३००० इमारती, ८७ चर्चेस आणि हजारो माणसं मरण पावली. या दोन दुर्दैवी प्रसंगांनी लंडन शहरावर प्रेतकळा पसरली. एक अख्खं शहरच जणू मरू घातलं होतं. पुन्हा एकदा सर्व काही निर्माण करणं आवश्यक होतं. हे नवनिर्मितीचं आव्हान सर ख्रिस्तोफर रेन या प्रतिभावान आर्किटेक्टने स्वीकारलं. थेम्सच्या किनाऱ्याचं वैभव ठरावं अशा सेंट पॉलच्या भव्य चर्चपासून अनेक सुंदर सुंदर इमारती या निर्मात्याने प्लॅन केल्या, निर्माण केल्या. रेन मरण पावल्यावर त्याला याच चर्चमध्ये पुरण्यात आलं. त्याच्या थडग्यावर लिहिलं आहे – 'तुम्हाला त्याचं स्मारक पाहायचं असेल तर आजूबाजूला कुठेही नजर टाका.'

पण ब्रिटिशांना फक्त इतिहासाचंच भान होतं असं म्हणणं ब्रिटिशांवर अन्याय करणारं होईल.

पंधराव्या आणि सोळाव्या शतकात जगातील नवनव्या भूभागांचा शोध घेऊन जगाचा नकाशा पूर्ण करण्याच्या कामात महत्त्वाचा वाटा स्पेन आणि पोर्तुगाल या राष्ट्रांचा आहे. त्या बाबतीत ब्रिटिशांचा हातभार फारच थोडा. असं असलं तरी इहिसासासारखंच जगाच्या भूगोलाचंही भान सर्वात प्रथम ब्रिटिशांनाच आलं हे शंभर टक्के खरं

आहे. या विधानाचा पुरावा लंडनपासून फक्त काही मैलांच्या अंतरावर मिळतो. त्या ठिकाणाचं नाव आहे . ग्रीनविच.

ग्रीनविच मध्य लंडनपासून म्हणजे पिकॅडिलीपासून जेमतेम आठ-दहा किलोमीटर्स अंतरावर आहे. पण तिथे जायचं म्हणून आम्ही एक दिवसाची छोटीशी पिकनिकच काढली म्हणा ना! लंडन टॉवरजवळच टॉवर गेटवे नावाचं स्टेशन आहे. तिथे डॉकलँड लाईट रेल्वे ही आपल्या हार्बर रेल्वेसारखी ट्रेन पकडली आणि आयलँड गार्डन्स या स्टेशनावर उतरलो. या ठिकाणी एक आश्चर्य आपल्याला पाहायला मिळतं.

चांगली दोन-तीन किलोमीटर्स रुंद असलेली एखादी नदी आपण कशी पार करतो? पूल असला तर पुलावरून किंवा होडीतून, हो की नाही? इथे थेम्स नदीच्या खालून बोगदा खणलेला आहे - पार या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत. एखादा रुंद रस्ता क्रॉस करण्यासाठी सब-वे बांधावा तसा. आपल्याकडे असे रुंद रस्त्याखालचे सब-वे आहेत. त्यांचा आकार चौकोनी असतो. या थेम्सखालच्या बोगद्याचा आकार गोल आहे म्हणून घुशीने पोखरून बीळ करावं तशातलाच प्रकार वाटतो. बोगद्यातून जाणारा रस्ता फक्त पादचाऱ्यांसाठीच खुला आहे. शिवाय आपल्या डोक्यावरून नदीचा प्रवाह वाहतोय, ही बोगद्यातून जाताना होणारी जाणीवच एवढी अनोखी असते !

या शिवाय या बोगद्याच्या संदर्भात लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे बोगद्यात एकटाच फिडल वाजवत बसलेला एक आवारा तरुण. दाढी वाढलेली, अंगावरचे कपडे जुनेपाने आणि चेहेऱ्यावर जगाविषयी संपूर्ण बेफिकिरीचा आणि तुच्छतेचा भाव. त्या तरुणाने समोर आपली हॅट ठेवली होती. जाणाऱ्या येणाऱ्या लोकांनी त्या हॅटमध्ये पैसेही टाकले होते. तो त्या पैशांवरच गुजराण करणार होता हेही स्पष्ट होतं. पण त्याला भिकारी म्हणणं हा त्याचा अपमान होता. तो एक आदर्श आवारा होता. कारण त्याच्या चेहऱ्यावर जी तल्लीनता दिसत होती ती एखाद्या मुक्तात्म्याची होती, सिद्ध पुरुषाची होती. पोटाची दीड वितीची खळगी भरण्यासाठी तो वाजवीत नव्हता. अशा पोटार्थी वादकाचं लक्ष कोण किती पैसे टाकतोय याकडे असतं. उलट त्या तरुणासारख्या अस्सल.आवारा व्यक्तीच्या वादनामध्ये एकतारी घेऊन भजन गाणाऱ्या भक्ताचा भाव असतो.

थेम्सखालच्या बोगद्यातून आपण पलीकडच्या किनाऱ्यावर ग्रीनविच गावात बाहेर पडतो आणि किनाऱ्यावर आणून ठेवलेल्या दोन होड्या आपलं स्वागत करतात. त्यापैकी कटी सार्क ही १८६९ साली स्कॉटलंडमध्ये बांधली गेली होती. गेल्या शतकात या बोटीचा वापर चीनचा चहा आणि ऑस्ट्रेलियातील लोकर इंग्लंडमध्ये आणायला केला जात होता . या बोटीशेजारीच जिप्सी मॉथ ही होडी नांगरून पडलेली आढळते. या छोट्याशा होडीने सर फ्रान्सिस कायचेस्टर यांनी एकट्याने पृथ्वीप्रदक्षिणा केली होती.

ग्रीनविच गाव तसं फारच लहान आहे. मध्यभागी पुण्याच्या पर्वती इतपत छोटीशी टेकडी आणि तिच्या चारी बाजूला पसरलेलं गाव. या टेकडीवरच रॉयल वेधशाळेची इमारत आहे आणि त्या वेधशाळेच्या अंगणातल्या बागेत जमिनीवर भौगोलिक दृष्ट्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाची एक रेघ आखलेली आहे.

या रेषेचा इतिहास फार मनोरंजक आहे. एखादं ठिकाण पृथ्वीच्या पाठीवर उत्तरेला किंवा दक्षिणेला किती अंतरावर आहे हे सांगणं सोपं

आहे. कारण पृथ्वीचा अक्ष आणि गोलाकार यामुळे विषुववृत्तासारखी एक खूण नैसर्गिकरित्याच तयार झालेली आहे. त्यामुळे विषुववृत्ताचा संदर्भ धरून ते ठिकाण विषुववृत्ताच्या उत्तरेला किंवा दक्षिणेला किती अंतरावर आहे हे सांगितलं की काम भागतं. पण भूपृष्ठावर तेच ठिकाण पूर्वेला किंवा पश्चिमेला किती अंतरावर आहे हे सांगणं कठीण जातं. त्या ठिकाणाची नेमकी जागा कळण्यासाठी ते 'कशाच्या' पूर्वेला किंवा पश्चिमेला हे सांगण्यासारखी विषुववृत्तासारखी एखादी उत्तर-दक्षिण दिशेत पृथ्वीवर आखलेली नैसर्गिक खूण उपलब्ध नाही. पण एखादं ठिकाण पूर्वेला किंवा पश्चिमेला कोठे आहे हे कळणं महत्त्वाचं तर असतं, कारण या पूर्वेला किंवा पश्चिमेला असण्यावर मध्यान्हीची वेळ निश्चित होत असते. पृथ्वी स्वतःभोवती पश्चिमेकडून पूर्वेकडे या दिशेनं फिरते या भौगोलिक सत्याचा तो अपरिहार्य परिणाम असतो.

नैसर्गिकरित्या अशी एखादी रेघ उपलब्ध नसल्यामुळे पंधरा-सोळाव्या शतकात युरोपबाहेर पडलेल्या, दर्यावर दूर दूर नावा हाकारणाऱ्या युरोपच्या व्यापाऱ्यांना त्रास होत होता. त्यांचा गोंधळ उडत होता. पूर्व पश्चिम अंतरांचा काहीही अंदाज बांधता येत नव्हता. केवळ दिशा आणि अंतर यांच्याविषयी अचूक माहिती नसल्यामुळे काही वेळा नाविक भलत्याच दिशेला भरकटत जाऊन मृत्युमुखीही पडले होते. यावर काहीतरी निश्चित उपाय करणं आवश्यक होतं. इंग्लंडच्या व्यापाऱ्यांनी यात पुढाकार घेतला. राजाला साकडं घातलं. या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी रॉयल कमिशन नेमलं गेलं. आणि त्यांनी लंडनबाहेरच्या या छोट्याशा खेडेगावातून दक्षिणोत्तर अशी प्रत्यक्ष एक रेषा काढली. ही एक प्रमाण रेषा. आंतरराष्ट्रीय तिथिरेषा याच्या नेमकी विरूद्ध भागात आहे. ती बरीचशी समुद्रात पडते.

हे सार १६७५ साली घडलं.

कोण म्हणेल ब्रिटिशांना जागतिक भूगोलाचं भान नव्हतं? आपल्याकडे त्यावेळी नुकताच शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होत होता.

ग्रीनविचला या रेषेच्या एका बाजूला एक आणि दुसऱ्या बाजूला दुसरं पाऊल ठेवून तुम्ही उभे राहिलात तर तुमचं एक पाऊल पूर्व गोलार्धात आणि दुसरं पश्चिम गोलार्धात असतं.

ग्रीनविचमधून जाणाऱ्या रेखांशाने पृथ्वीचे पूर्व पश्चिम असे दोन भाग पाडले आहेत, असं मानायचं हे जसं ठरवण्यात आलं, तसंच ग्रीनविचची मध्यान्हीची वेळ ही जागतिक प्रमाण वेळ मानायची असंही ठरवण्यात आलं. कारण ग्रीनविचच्या नेमकी विरुद्ध असलेली रेषा आंतरराष्ट्रीय 'तिथिरेषा' होती. ग्रीनविचला दुपारचे १२ वाजतात तेव्हा तिथिरेषेवर रात्रीचे बारा बाजतात आणि तारीख बदलते. म्हणून ग्रीनविचची दुपारी १२ ची वेळ दाखवणाऱ्या घड्याळातली वेळ आंतराष्ट्रीय प्रमाण वेळ! (इंटरनॅशनल स्टँडर्ड टाईम.) ग्रीनविचच्या या वेधशाळेत सेकंदाचा शंभरावा भाग मोजणारं एक घड्याळ आहे.

मी ग्रीनविचला त्या घड्याळाचा फोटो काढला तो क्षण होता - येशू ख्रिस्ताच्या जन्मानंतर एक हजार नऊशे त्र्याण्णव वर्षानंतरच्या तीनशे चाराव्या दिवसाच्या दुपारचे तीन वाजून अठ्ठेचाळीस मिनिटं आणि चोपन्न पूर्णांक त्रेपन्न शतांश सेकंद हा!

# पुन:प्रत्ययाचा आनंद

**स**दतीस दिवसांचा विदेश दौरा संपला होता. पुन्हा एकदा मुंबईचं जीवन सुरू झालं होतं.

वास्तविक परदेशी जाणं ही आजकाल नवलाईची गोष्ट राहिलेली नाही. खुद्द मलाही यापूर्वी एक छोटासा परदेशप्रवासाचा अनुभव मिळालेला होता. त्या प्रवासानंतर मी प्रवासवर्णन वगैरे काही लिहिलं नव्हतं. या प्रवासामुळे मला युरोप पाहायची संधी मिळाली. अर्थात मी युरोप पाहिलं म्हणजे काय? तर सात देशांतली सरासरीनं प्रत्येकी दोन शहरं पाहिली आणि सगळा अनुभव कितीसा तर फक्त पंधरा वीस दिवसांचा. एवढ्या कमी अनुभवांवर काही निष्कर्ष काढणं योग्य नव्हे हे मलाही पटतं. पण तरीही काही निरीक्षणं नोंदवावीशी वाटतात. कथा काय, प्रवास वर्णन काय किंवा लेख काय, आतून लिहावासा वाटेपर्यंत लिहिण्यात अर्थ नसतो आणि आतून लिहावसं वाटलं की, कागदावर ते उतरेपर्यंत सुटका नसते. तोपर्यंत मन मोकळं होत नाही. युरोपच्या प्रवासाच्या स्मृतींनी असं केलं.

वास्तविक जगातल्या १५२ देशांपैकी एक भारत सोडला तर आपल्याला प्रत्येक इतर देश 'फॉरिन' म्हणजे परदेश आहे. पण आजकाल 'फॉरिन'ला जाणं म्हणजे अमेरिकेत जाणं असाच अर्थ जवळजवळ धरला जातो. अरबांनी तेलाचे भाव वाढविल्यामुळे मध्य पूर्वेत नोकऱ्यांचं प्रमाण प्रचंड वाढलं. त्यावेळेपासून 'फॉरिन' या शब्दाचा अर्थ मध्य पूर्वेतील अरब देश असाही होऊ लागला.

पण या सर्व घटना फार फार तर गेल्या पन्नास वर्षातल्या. त्यापूर्वी जवळजवळ तीन-साडेतीनशे वर्षं जगाचा गुरुत्वमध्य युरोपात होता. युरोपात घटना घडत होत्या आणि त्यांचे पडसाद जगात उमटत होते. युरोपातली, युरोपियन देशांची भांडणं जगाच्या पाठीवर कुठेही लढली जात होती. युरोपात विचार उदयाला पावत होते आणि उदबत्तीचा सुगंध खोलीभर पसरावा तसे जगभर पसरत होते.

शिवाय भारतावर ब्रिटिशांचं साम्राज्य असल्यामुळे तर आपण युरोपच्या खूपच जवळ गेलो होतो. एकेकाळी युरोपातील ब्रिटिश, फ्रेंच आणि पोर्तुगीज या तीन देशांनी आपल्या देशात सत्ता काबीज करण्यासाठी आट्यापाट्या खेळल्या होत्या. चौथे स्पर्धक डच - त्यांचंही भारताकडे लक्ष होतंच. पाचवा खेळाडू स्पेन - त्याने मात्र या चौघांना वॉक-ओव्हर दिलेला होता. नाही तर पंचरंगी सामनाच इथे रंगला असता.

इतिहासातील या संबंधांमुळे मला तरी युरोपाविषयी खूप आकर्षण वाटत होतं.

शिवाय मी माझ्या मनात अशी वर्गवारी केलेली होती : अमेरिका हे समृद्ध राष्ट्र. तिथे समृद्धीचा अगदी महापूर लोटला असेल, पण अमेरिकेला संस्कृती नाही, इतिहास नाही. याउलट पूर्वेकडले देश.

तिथे अगदी अजीर्ण होईल एवढी संस्कृती आहे. पाठ लवून जाईल इतकं हजारो वर्षांच्या इतिहासाचं ओझं त्यांच्या पाठीवर आहे. पण समृद्धीच्या नावाने (जपानचा सन्माननीय अपवाद सोडता) बोंब आहे. संस्कृती आणि समृद्धी यांचा सुरेख संगम पूर्व आणि पश्चिम या दोन टोकांमध्ये वसलेल्या युरोपात आहे. यामुळेही युरोपला भेट द्यायची ओढ मनात होती.

संस्कृती आणि समृद्धी या दोहोंचं दर्शन घडवण्याच्या बाबतीत युरोपने माझा अपेक्षाभंग केला नाही. युरोपात ड्रग्जच्या आहारी गेलेली तरुण मुलं, भसाभसा सिगरेटी ओढणाऱ्या मुली दिसल्या नाहीत, असं नाही. पण त्याचबरोबर काही कारण नसताना आमचं वजन उचलायला मदत करणारी मुलगीही भेटली. नकाशा पाहताना नक्की रस्ता सापडत नसल्यामुळे आमच्या चेहऱ्यावर उडालेला गोंधळ पाहून आपण होऊन 'मे आय हेल्प यू अंकल?' म्हणणारे आणि आमच्याजवळ बरंच सामान आहे, आणि आम्ही रेल्वेच्या डब्याच्या एका दरवाजातून उतरत असताना आम्हाला दरवाजातून उतरायला वेळ लागेल म्हणून आपण होऊन दूरच्या दरवाजाकडे जाणारेही भेटले. माझ्याकडे आहे त्याहून चांगली, तुमच्या उपयोगी डिक्शनरी तुम्हाला शेजारच्या दुकानात मिळेल असं सांगणारी विक्रेती ज्या समाजात सापडते, त्या समाजाची संस्कृती अजून जिवंत आहे असं खुशाल समजावं.

मी फिरलो त्या साती देशांमधली समृद्धी ठिकठिकाणी दिसत होती. भिकारी अगदी दोन-तीन ठिकाणीच दिसले. शिवाय त्या भिकाऱ्यांत आणि आपल्या भिकाऱ्यांत एक महत्त्वाचा फरक होता. आपल्याकडले भिकारी दीनवाणे, लाचार दिसतात. त्यातले बरेचसे समाजाने काळजी न घेतलेले अपंग असतात. तिथे असे भिकारी नव्हते. जे काही भीकमाग्ये दिसले ते बेकारीभत्त्याची रक्कम व्यसनात उडवल्यामुळे भीक मागणारे वाटत होते. ते आर्थिक दारिद्र्याचं प्रतीक नव्हतं, तर उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबपद्धतीमुळे चांगल्या संस्कारांपासून वंचित झालेल्या बाल्याचा तो परिपाक होता.

पण या व्यतिरिक्त सुबत्तेचा तिथे महापूर होता. दुकानं उत्कृष्ट दर्जाच्या सर्व प्रकारच्या मालाने दुथडी भरून वाहत होती. अगदी रेल्वेतल्या सीट्सपासून प्रत्येक गोष्ट प्रत्यक्ष लोकसंख्येच्या गरजांपेक्षा खूपच जास्त प्रमाणावर उपलब्ध होती. आणि त्यामुळेच बऱ्याच प्रमाणावर लोकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होतं.


खरं तर युरोपात संस्कृती आणि समृद्धी या गंगा-यमुनांचाच संगम होत नाही, तर त्यात सौंदर्याची सरस्वतीही येऊन मिळालेली आहे आणि त्रिवेणी संगम झालेला आहे. हे सौंदर्य कलापूर्ण इमारतींच्या स्वरूपातलं! पॅरिसला सीन नदीच्या तीरावर दिसतं ते मानवनिर्मित आहे. तसंच ते आल्प्सच्या शिखरांसारखं निसर्गनिर्मितही आहे. त्याची जपणूक करण्यासाठी 'संस्कृत' मन लागतं ते युरोपने नक्कीच जपलंय. आणि म्हणूनच तिथे काळजीपूर्वक वाढवलेली हिरवळ कोणी तुडवत नाही आणि बोर्ड लावलेला नसला तरी सार्वजनिक बागेतली फुलं कोणी तोडताना दिसत नाही. (आपल्याकडे मनाईचा बोर्ड लावलेला असून तोडतात.) रस्त्यावर कोणी थुंकताना दिसत नाही की, सार्वजनिक संडास अस्वच्छ दिसत नाहीत. - मग रस्त्यावर, पार्कच्या कडेला, अंधाऱ्या आडोशाला मलमूत्र विसर्जन करण्याची तर गोष्टच सोडा.

आम्ही ज्या पद्धतीने आमच्या दौऱ्याची आखणी केली, त्या पद्धतीमुळेही दौरा संस्मरणीय व्हायला मदत झाली. 'तुमचा तुम्हाला

दौरा आखता येईल' असा नुसता सल्लाच न देता मला आमचा दौरा आखायलाही माझ्यापूर्वी अशाच प्रकारे स्वत: ट्रिप आखलेल्या काही मित्रांनी मदत केली. इतर काही मित्रांनी खूप माहितीपत्रकं, नकाशे, पुस्तकं दिली. त्यामुळे ज्या ज्या शहरात मी गेलो त्या त्या शहराची बरीच माहिती मला त्या शहरात जाण्यापूर्वीच तोंडपाठ होती. परीक्षेसाठी अभ्यास करावा, नोट्स काढाव्या तशा मी प्रत्येक शहरावर, देशावर नोट्स काढल्या होत्या. माझा प्रत्यक्ष प्रवास जरी सदतीस दिवस झाला असला तरी हे दौऱ्यापूर्वीचे अभ्यासाचे दिवस आणि प्रवासाहून परत आल्यावर मित्र, नातेवाईक यांना प्रवासाच्या गमतीजमती सांगताना आणि हे प्रवासवर्णन लिहिताना घेतलेला आठवणींचा आणि पुनःप्रत्ययाचा आनंद हे जमेस धरलं तर मी मनाने एकंदर तीन महिने युरोपात होतो आणि प्रत्येक स्थळाला किमान तीन वेळा तरी भेट दिली असं म्हणायला हरकत नाही.

पर्यटनाच्या क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या कोणाही धंदेवाल्याशी भांडण नसून मला असं ठामपणे म्हणावंस वाटतं की, अशा कोणा टूर कंपनीबरोबर आम्ही प्रवास केला असता तर तो एवढा अविस्मरणीय झाला नसता. माझी प्रवासात एवढी इन्व्हॉल्व्हमेंट झाली नसती. आपण टुरिस्ट कंपनीबरोबर जातो तेव्हा तुम्हाला सबंध प्रवासात इटालियन माणसाशी इंग्लिश बोलण्याची संधी मिळत नाही की, स्वतंत्र रीतीने रस्ता शोधावा लागत नाही. अशा रीतीने प्रवास केला तर युरोप 'पाहून' होईल. पण 'अनुभवून' होणार नाही. यात्रा कंपन्यांबरोबर प्रवास करण्यात फक्त त्या प्रेक्षणीय स्थळाचं 'विंडो शॉपिंग' केल्यासारखं होतं. प्रत्यक्ष दुकानात शिरून वस्तू हाताळून नंतर घेण्यातली मजा त्यात कुठून येणार?

*निरोप : लंडनच्या आकाशातून*



# कितीतरी गोष्टी राहून गेल्या

**आ**मची युरोपची ट्रिप आम्ही प्लॅन केल्यामुळेच आम्हाला झुरिचच्या लेकच्या काठावरची भारतावर प्रेम करणारी थाय म्हातारी भेटली आणि पोपच्या भाषणाच्या वेळी स्वतःचा पत्ता लिहून देताना त्या कागदाच्या चिटोऱ्यावर 'पीस बी ऑन अर्थ - पीस बी इन इंडिया' अशा भारतासाठी अनाहूत शुभेच्छा देणारी जपानी मुलगी भेटली. पॅरिस स्टेशनवरच्या रेल्वेच्या खिडकीवरच्या एका मुलीने शशीकडून मोठ्या कौतुकाने कुंकवाच्या टिकल्यांचं पाकीट मागून घेतलं. अशा छोट्या छोट्या प्रसंगांनी आमच्या ट्रिपची गोडी वाढवली यात शंका नाही. आम्ही युरोपात कुठेही टॅक्सी केली नाही. सगळीकडे रेल्वे, बस, ट्राम अशा सार्वजनिक वाहनांनीच वावरलो. त्यामुळे त्या त्या दोन दिवसांपुरते आम्ही 'तिथले' झालो. प्रसंगी रस्ता चुकलो. पण त्यामुळेच रस्ता शोधून काढण्यातला आनंदही मिळाला. तसंच मनात आलं तेव्हा आमचा मार्ग आम्ही बदलूही शकलो.

आणि हे सगळं खरं असलं तरी या ट्रिपचा विचार करत एकटाच माझ्या घराच्या गॅलरीत आरामखुर्चीत बसलो की माझ्या मनात हुरहूरच दाटून येते. आयुष्य पुन्हा जगायला मिळालं तर याहून सुंदर रीतीने जगेन, जे करायचं राहून गेलं ते करीन असं प्रत्येकाला वाटतं, तसंच या ट्रिपच्या बाबतीतही वाटतं. किती तरी गोष्टी करायच्या राहून गेल्या. इंग्लंडमध्ये सावरकरांनी ज्या समुद्रकिनाऱ्यावर बसून 'ने मजसी ने परत मातृभूमीला। सागरा प्राण तळमळला' असे आर्त उद्गार काढले तो समुद्रकिनारा, शेक्सपियरचा गाव पाहायचा राहूनच गेला. परिकथेतच केवळ शोधून दिसतील असे जर्मनीतल्या लुडविग राजाचे किल्लेवजा महाल, फ्रान्समधील एखादा भव्य नाईट शो, ब्लॅक फॉरेस्ट, नॉर्वेचा मध्यरात्रीचा सूर्य, पिसाचा कलता मनोरा आणि असं आणखी कितीतरी.

पण या ट्रिपने मला जे दाखवलं, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

इतिहासाकडे बघण्याचा मला एक निराळाच दृष्टिकोन मिळाला. युद्धं किती निरर्थक असतात याचं जणू प्रात्यक्षिकच मिळालं. शतकांच्या अंतरावरून आज पाठीमागे वळून पाहताना माझ्यासारख्या त्रयस्थ व्यक्तीने काय इंग्लंडमध्ये असताना नेल्सनचं आणि फ्रान्समध्ये असताना नेपोलियनचं कौतुक करायचं? दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने केलेली दोस्त राष्ट्रांची हानी निंदास्पद आणि दोस्त राष्ट्रांनी जर्मनीच्या केलेल्या राखरांगोळीला आणि चिरफाडीला काय योग्य म्हणायचं? आणि जे युद्ध शतकांच्या अंतरावरून निरर्थक वाटतं ते वर्तमानातही तितकंच निरर्थक नसतं का? इराण आणि इराकच्या युद्धात दोन्ही बाजूच्या मुसलमानांनी आपली बाजू जिंकावी म्हणून एकाच अल्लाची प्रार्थना करणं विनोदीच नाही का वाटत?

तेव्हा युद्धाच काही खरं नाही. खर आहे मोनालिसाच्या

चेहऱ्यावरचं हास्य, जे चारी शतकातल्या माणसाला सारखंच आकर्षित करतं. खरं आहे ते मायकेल अँजेलोने 'पिएटा' या अजरामर कलाकृतीत दाखवलेलं मेरीच्या चेहऱ्यावरचं कारुण्य, जे पाहताना आजही प्रत्येक सहृदय माणसाचे डोळे भरून येतात. खऱ्या आहेत ख्रिस्तोफर रेनने उभ्या केलेल्या वास्तू आणि १६७५ साली ग्रीनविचला स्थापन झालेली वेधशाळा आणि आंतराष्ट्रीय तिथिरेषा, तिने माणसाला भूगोलाचं भान दिलं.

आणि जे जगाच्या इतिहासाच्या बाबतीत खरं आहे ते भारतीय उपखडाच्या बाबतीत.खोटं कसं असेल? मला तरी युरोपात भारतीय उपखंडातील भारत, पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका या चारी देशातील लोक विलक्षण एकोप्याने वागताना आढळले.

एक तर या उपखंडातील लोक एक दुसऱ्यापासून निराळे ओळखता येत नाहीत. फसगत व्हावी इतके ते सारखे दिसतात. पाकिस्तानमधला पंजाबी आणि भारतातला पंजाबी, श्रीलंकन आणि तमिळ आणि दोन्ही देशातले बंगाली बाबू यांच्यात काहीही फरक



*मायकेल ॲंजेलोचे शिल्प*

नाही. ॲमस्टरडॅमला मदुरोडॅमचं मिनी सिटी पाहत असताना मला त्यातल्या एका चांगल्याशा स्पॉटवर माझा आणि शशीचा फोटो काढायची इच्छा झाली. कोणाला विनंती करावी असा विचार करत होतो तेवढ्यात चार तरुण दिसले. भारतीय वाटले म्हणून त्यांच्यापाशी जाऊन विचारलं - 'इंडियन?'

'हां, वैसेही समझिये.' त्या तरुणाने हिंदीत उत्तर दिलं.

त्याच्या म्हणण्याचा अर्थ मला समजला नाही. मी गोंधळून विचारलं, 'मतलब?'

'भाई, पाकिस्तानी हूं. मतलब एकही मुल्क के तो हैं.'

म्युनिकला भेटलेल्या दुसऱ्या एका पाकिस्तानी तरुणाने कॉफीची ऑफर देत मला आपल्या खास पंजाबी ढंगात सांगितलं होतं - 'भाई, अपना आपस में झगडा कहां है? हम आपस में थोडेही लडते हैं - अपनी गर्व्हमेंट लडती है.'

हे सगळे छोटे-छोटे, पण बोलके अनुभव एकच विचार अधोरेखित करतात. बर्लिनच्या दगड-विटांच्या भिंतीसारख्या आणखी कितीतरी दृश्य आणि अदृश्य भिंती, ज्या कृत्रिम आहेत, मानवनिर्मित आहेत, त्याही पाडून टाकण्याची नितांत गरज आहे.

युरोपभेटीने मनावर ठसवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे भारतीय लोकसंख्येच्या भस्मासुराचं स्वरूप. आर्थिक प्रगतीचा वेग आजच्यापेक्षा खूप वाढला तरी आजच्या वेगाने लोकसंख्या वाढत राहिली तर भारतीय माणसाला युरोपियन माणसासारखं जीवनमान कधीही मिळणं शक्य नाही हे विधान शंभर टक्के खरं आहे. आतापर्यंत हा प्रश्न सरकारी पातळीवरच हाताळला जातोय आणि हे फार वाईट आहे. आता समाजातल्या प्रत्येक व्यक्तीनं हे मनावर घ्यायला हवंय.

तिथे चाळीस प्रवाशांसाठी आगगाडीत शंभर सीट्स उपलब्ध आहेत आणि इकडे शंभर माणसांच्या डब्यात चारशे माणसं कोंबली जातायत. जे रेल्वेतल्या जागांच्या बाबतीत आहे, तेच इतर बाबतीतही आहे. माणसं आणि सुखसोयी याचं हे व्यस्त प्रमाण लोकसंख्यावाढीच्या भस्मासुराला रोखल्यावाचून सुधारणंच शक्य नाही. लोकसंख्यावाढ हा जागतिक पातळीवरचा अखिल मानवजातीपुढला प्रश्न आहे असं मानलं जातं. पण खरं तर तो मुख्यत्वेकरून आपला, अविकसित देशांचा, भारताचा प्रश्न आहे.

भरमसाट लोकसंख्यावाढीच्या परिणामी संस्कृती, समृद्धी आणि सौंदर्य या तिन्ही गोष्टींपासून आपण दूर दूर जातोय. संख्यावाढीमुळे समृद्धीऐवजी दारिद्र्याचंच वाटप केलं जातंय, हे कळायला कठीण जात नाही. कारण ते उघडच दिसतं. पण अतिसंख्यावाढ जीवनाचा तीव्र संघर्ष निर्माण करते आणि त्यात संस्कृती आणि सौंदर्याचा बळी पडतो हे आपल्या पटकन लक्षात येत नाही.

अख्ख्या युरोपात फिरताना आपण एका सुंदर बागेतून फिरतोय असं वाटतं. ही भावना आपल्या देशातून फिरताना मनात का येत नाही? युरोप सुंदर दिसतं आणि आपला देश त्या देशांसारखा सुंदर का दिसत नाही, या प्रश्नाचं मला जाणवलेलं उत्तर ही भरमसाट संख्यावाढ हेच आहे. युरोपने ही जाणीव करून दिली. तेवढा एक फरक सोडला तर युरोपातला माणूस आपल्यासारखाच आहे.

मी युरोपात पोहोचल्यावर महाराष्ट्रात झालेल्या भीषण भूकंपाची चित्रं सी. एन. एन. दूरचित्रवाणीवर पाहत असताना माझ्या घशात दाटलेला आवंढा आणि ॲमस्टरडॅमच्या अपंगांच्या महोत्सवात पांगळ्या मुलीने भारतातल्या भूकंपाविषयी माझ्यापाशी दुःख व्यक्त करताना गिळलेला आवंढा या दोन्हींमध्ये काहीही फरक नव्हता.



यु-प्रवास
८२७
२९५७०७
५।३।९८

REFBK-0029507